21-07-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

VVK/ 10:00

21-07-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-1

VVK/ KTG/ AKN/ 10:00

उप सचिव : माननीय पीठासीन अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार सभागृहाची बैठक 10.30 वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 10.07 ते 10.30 वाजेपर्यंत स्थगित झाली)

या नंतर श्री.भोगले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)

विधिमंडळाच्या उप सचिवांनी सभागृहाची बैठक स्थगित करणे

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय,....

तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते) : सर्वप्रथम मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, पावसामुळे व ट्राफिकमुळे मला या ठिकाणी पोहचण्यास विलंब झाला. मी अगोदर निरोप दिला होता की, मी आज सकाळी वेळेवर पोहचेन. परंतु उक्त अडचणीमुळे मी वेळेवर पोहचू शकलो नाही म्हणून मी दिलगिरी व्यक्त करतो.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, हे सभागृह मघाशी उप सचिवांकडून स्थगित करण्यात आले. मी विचारु इच्छितो की, हे सभागृह स्थगित करण्याचा अधिकार नियमाने कोणाला आहे ? सभागृह स्थगित करण्याचा अधिकार नियमाने सचिवांना नाही, हे रेकॉर्डवर राहिले पाहिजे. शिवाय दुसरी बाब अशी की, सभापती महोदय, आपण एकटे तालिका सभापती नाहीत. सत्ताधारी आणि विरोधी बाजूचे प्रत्येकी दोन या प्रमाणे चार तालिका सभापती आहेत. असे असताना सचिवांनी सभागृह स्थगित करणे योग्य नाही. मी विचारु इच्छितो की, हे सभागृह सचिव चालवितात की माननीय सभापती चालवितात ? मी आपला सन्मान राखून सांगतो की, तालिका सभापती म्हणून आपल्याला सुध्दा दिवसाच्या सुरुवातीला सभागृह सुरु करण्याचा अधिकार नाही. विधानपरिषद नियमावलीतील नियम-8 मध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की, "प्रत्येक अधिवेशनाच्या सुरुवातीस, विधानपरिषदेचे सभापती विधानपरिषदेच्या सदस्यांमधून चारांहून जास्त नाहीत इतक्या सदस्यांची सभापती तालिका नामनिर्देशित करतील. त्यांच्यापैकी कोणत्याही एकास विधानपरिषदेच्या सभापतींच्या व उप सभापतींच्या अनुपस्थितीत विधानपरिषदेच्या सभापतींनी किंवा त्यांच्या अनुपस्थितीत उप सभापतींनी तशी विनंती केल्यावरुन, विधानपरिषदेचे सभापतीपद स्वीकारता येईल." असे नमूद केलेले आहे. वास्तविक पाहता दिवसाच्या कामकाजाची सुरुवात सभापती किंवा उप सभापतींनी केली पाहिजे. या ठिकाणी सभागृहाचे नेते उपस्थित आहेत. त्यांना या बाबतचा प्रदीर्घ अनुभव आहे. वास्तविक पाहता तालिका सभापती आले आहेत की नाहीत, या बाबतचा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील....

आढावा विधिमंडळ सचिवालयाने सभागृहाच्या बैठकीपूर्वी घ्यावयास पाहिजे. सभागृहाची बैठक सकाळी 10.00 वाजता असेल तर त्यांनी सकाळी 9.00 वाजेपासून या बाबतचा आढावा घेतला पाहिजे. मी विचारु इच्छितो की, आपले कार्यालय काय करीत आहे ? सभापती महोदय, सभागृह हे नियमाने चालले पाहिजे. तालिका सभापती सभागृहाच्या बैठकीची सुरुवात करु शकत नाही. प्रत्येक दिवशी सभागृहाची बैठक सभापती किंवा उप सभापतींनी सुरु करावयाची आणि त्यानंतर तालिका सभापतींनी सभागृह चालवावयाचे असते. त्यामुळे आपण ही परंपरा तोडू नका. आज तर कळस झालेला आहे. या ठिकाणी सचिवांनी माननीय सभापतींच्या आदेशानुसार सभागृहाची बैठक अर्ध्या तासासाठी स्थगित केली. हे चुकीचे आहे. यामध्ये सुधारणा झाली पाहिजे. त्यामुळे भविष्यात या प्रकाराची पुनरावृत्ती होता कामा नये, अशी मी विनंती करतो.

तालिका सभापती : मी पुन्हा एकदा सांगतो की, मी स्वतः निरोप दिला होता की, मी वेळेवर पोहोचतो. या ठिकाणी येण्यासाठी मी सकाळी 7.00 वाजता निघालो. परंतु तरीही मी वेळेवर पोहचू शकलो नाही. त्यामुळे मी दिलगिरी व्यक्त केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी आता हा विषय येथेच संपवावा, अशी विनंती आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, विधानपरिषद नियमावलीतील नियमामध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की, "अधिवेशनास प्रारंभ झाल्यानंतर", म्हणजे "अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी" होय. तसेच असेही नमूद आहे की, सभापती निर्देश देतील अशा दिवशी विधानपरिषदेची बैठक भरेल. याचाच अर्थ अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी सभापतींनी बैठकीची सुरुवात करावी असा नियम आहे. बैठकीची सुरुवात केल्यानंतर व तालिका सभापती नामनिर्देशित केल्यानंतर सभापती आणि उप सभापती प्रमाणेच तालिका सभापती समान धरले जावेत, असा त्याचा अर्थ आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी कामकाज नियमानुसार होते की नाही, या संदर्भातील महत्त्वाची त्रुटी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली आहे. सभागृहाची बैठक सुरु होताना सभापती, उप सभापती किंवा तालिका सभापती, यांच्यापैकी कोणीही उपस्थित नसेल तर सभागृहाची बैठक स्थगित करण्याचा अधिकार नियमाने नेमका कोणाला दिलेला आहे, याचा अगोदर खुलासा झाला पाहिजे. या परिस्थितीत कोणालाही अधिकार

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

दिले नसतील तर अशा परिस्थितीत किंवा यातून मार्ग काढण्यासाठी कोणता मार्ग उपलब्ध आहे या बद्दलचे मार्गदर्शन आपण केले पाहिजे. जेणेकरून या बाबतचा खुला सर्वांना सविस्तरपणे होऊ शकेल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझे म्हणणे एवढेच आहे की, या प्रकाराची पुनरावृत्ती होता कामा नये. सभापती किंवा उप सभापतींची प्रकृती ठीक नसेल तर सभागृहाचे कामकाज सुरळीपणे सुरु ठेवण्यासाठी चार तालिका सभापतींना नामनिर्देशित केलेले असते. माझे म्हणणे आहे की, विधिमंडळ सचिवालय हे सकाळी 8.00 वाजता सुरु केले पाहिजे. आम्हा सदस्यांना सुध्दा विविध कार्यक्रम असतात. तरी सुध्दा आम्ही रात्रभर अभ्यास करुन या ठिकाणी येत असतो. असा प्रकार पुन्हा होणार नाही, या दृष्टीने खबरदारी घ्यावी.

तालिका सभापती : ठीक आहे. या बाबत दक्षता घेतली जाईल .

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी. : रायगड जिल्ह्यातील मु.पो.चांभार्ली, ता. खालापूर येथील शांतिनिकेतन या बेकायदेशीर आश्रमशाळेत आठ अल्पवयीन मुलींचे झालेले लैंगिक शोषण

मु.शी. : रायगड जिल्ह्यातील मु.पो.चांभार्ली, ता. खालापूर येथील शांतिनिकेतन या बेकायदेशीर आश्रमशाळेत आठ अल्पवयीन मुलींचे झालेले लैंगिक शोषण, यासंबंधी डॉ. नीलम गोऱ्हे, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री हेमंत टकले, सुनील तटकरे, अमरसिंह पंडित, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"रायगड जिल्ह्यातील मु.पो. चांभार्ली, ता.खालापूर येथील शांतिनिकेतन या बेकायदेशीर आश्रमशाळेत आठ अल्पवयीन मुलींचे लैंगिक शोषण झाल्याचे नुकतेच माहे जून, 2015 मध्ये वा त्या सुमारास उघडकीस येणे, या प्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असणे, पोलीस अधीक्षक यांनी आदेश दिल्यानंतर तपासाअंती आश्रम शाळेच्या संचालक मंडळातील ख्रिस्टीयन राजेंद्रन, जॉय राजेंद्रन व त्यांची आई सलोमी राजेंद्रन यांना रसायनी पोलिसांनी अटक केल्याची बाब उघडकीस येणे, चाईल्ड वेलफेअर कमिटीने लैंगिक शोषणाची तक्रार रसायनी पोलिसांकडे देऊनही त्यांनी आरोपींशी हातमिळवणी करुन याकडे केलेले दुर्लक्ष व आरोपीना सर्व पुरावे नष्ट करण्याचा दिलेला पुरेसा कालावधी, लहान मुलांचे लैगिंक शोषण होऊनही एफआयआरमध्ये योग्य त्या कलमांचा समावेश न करता सौम्य कलमे टाकून दाखल केलेला गुन्हा, पोलिसांच्या या भूमिकेबद्दल निर्माण झालेली शंका, पोलीस अधीक्षकांनी आदेश दिल्यानंतर आरोपींना झालेली अटक, याप्रकरणी दोषी असणाऱ्या रसायनी पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी यांनी कर्तव्यात केलेली कसूर व जाणीवपूर्वक दुर्लक्ष तसेच आरोपीशी केलेली आर्थिक हातमिळवणी या सर्वांचा तातडीने तपास करुन त्यांना निलंबित करण्याची रायगड जिल्ह्यातील जनतेकडून होत असलेली मागणी, या सर्वांकडे शासनाचे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने सखोल चौकशी करुन आश्रमशाळेच्या व संस्थेतील संचालकांवर कठोर कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

प्रा.राम शिंदे (गृह (ग्रामीण) राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, चांभार्ली, ता.खालापूर, जि.रायगड येथील शांतिनिकेतन आश्रम गेल्या पाच वर्षांपासून नोंदणी न करता अनधिकृतपणे चालविला जात होता. रायगड आणि इतर भागात अशा प्रकारे महिला व बालकल्याण विभागाकडून परवानगी न घेता सुरु असलेल्या शाळांची पडताळणी करण्यासाठी माध्यमे नाहीत. या निमित्ताने मी विचारु इच्छिते की, अशा प्रकारे अनधिकृतपणे सुरु असलेल्या आश्रमांना अटकाव करण्यासाठी पोलीस काही मदत करु शकतील काय ? सभापती महोदय, सदरहू आश्रमशाळेत जिज्ञासा संस्थेचे लोक माहिती देण्यासाठी आले होते. त्यावेळी त्यांनी या विद्यार्थीनींकडे तुम्हाला इतर काही त्रास होतो काय, या बाबत विचारणा केली होती. त्यावेळी त्या विद्यार्थीनीनी सांगितले की, आमचे आई-वडील आमच्याजवळ नाहीत. त्यांनी शिक्षिकांकडे सर्व काही सांगितले. एकूण 12 मुलींचे लैंगिक शोषण करण्यात आले. महोदय, यामध्ये संचालिकेचा सावत्र मुलगा आरोपी असून त्याला अटक झाली आहे. प्रामुख्याने तीन गंभीर विषय आहेत. आई-वडील हिंदू असून सुध्दा त्यांनी मुलांची नावे ख्रिश्चन लावलेली आहेत. म्हणजेच धर्मांतराचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे मी विचारु इच्छिते की, त्यांच्यावर धर्मांतर विरोधी कायद्यानुसार कलम लावण्यात येईल काय ? तसेच यातील एक मूल मतिमंद नसताना सुध्दा ते मतिमंद असल्याचे दाखवून, त्याच्याकडून बाल मजुरी करुन घेतली आहे. तेथील बालकल्याण समितीने रसायनी पोलिसांना वारंवार सांगितले की, त्यांच्यावर बाल मजुरी संदर्भातील गुन्हा सुध्दा लावला पाहिजे. तो मुलगा खरोखरच मतिमंद आहे की नाही, हे सिध्द करण्यासाठी रसायनी पोलिसांना अडचण येत आहे. त्यामुळे ही बाब सिध्द करण्यासाठी त्यांनी एक्स्पर्टची मदत घ्यावी. तो मुलगा मतिमंद नसताना सुध्दा त्याला मतिमंद दाखविले असेल आणि त्यांनी बाल मजुरी करुन घेतली असेल तर त्यांच्यावर बाल मजुरी कायद्यान्वये गुन्हा दाखल करावा. महोदय, या मुलींनी दिनांक 29 एप्रिल, 2015 रोजी त्रास दिला जात असल्याचे, बलात्काराचा प्रयत्न केल्याचे निदर्शनास आणून दिले होते. या संदर्भातील वैद्यकीय अहवाल 6 मे रोजी आला. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद केले आहे की, आरोपींना 11 जून रोजी अटक झाली. या संदर्भात 12 मे रोजी पोलिसांना कळविण्यात आले असले तरी, 12 मे ते 11 जून म्हणजे जवळजवळ 1 महिनाभर आरोपींना अटक करण्यास वेळ लावला असेल तर, त्या काळात त्या मुलींची

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे....

आणि अन्य मुलींची काय अवस्था झाली असेल ? त्यामुळे मी स्पेसिफिक विचारते की, ज्यांनी आरोपींना पकडण्यात विलंब लावला असेल त्यांची चौकशी करण्यात येईल काय ? तसेच दोषींवर धर्मांतर विरोधी कलम आणि बाल मजुरी संदर्भातील कलम लावण्याच्या दृष्टीने पावले उचलण्यात येतील काय ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, चर्च एव्हरलास्टींग लाईफ ॲण्ड सोशल वेल्फेअर ट्रस्ट अंतर्गत चालू असलेला हा शांतिनिकेतन अनाथाश्रम आहे. सन्माननीय सदस्यांनी जे प्रश्न उपस्थित केले त्या अनुषंगाने सांगू इच्छितो की, आई-वडील हिंदू असून देखील मुलांची नावे ख्रिश्चन आहेत. परंतु धर्मांतराच्या संदर्भात कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही. त्याच बरोबर बाल मजुरांकडून त्यांनी काम करुन घेतले, त्यामुळे अशा स्वरुपाच्या दोन गुन्ह्यांचा त्यात अंतर्भाव करावा, असे त्यांनी सांगितले. इतरही ज्या गुन्ह्यांचे आणि नियमांचे उल्लंघन केले त्यानुसार त्यांच्यावर गुन्हे दाखल केले आहेत. त्यामुळे दोन्ही मुद्दे तपासून घेण्यात येतील. त्यानुसार जी काही योग्य कारवाई करणे अपेक्षित आहे त्यानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येतील. तसेच सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, या गुन्ह्याचा तपास करण्यास एक महिना उशीर लावला. मी सांगू इच्छितो की, वैद्यकीय अहवाल प्राप्त झाल्याबरोबर उपलब्ध व्हिक्टीम्स् होते किंवा भरडलेल्या मुली होत्या त्यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून जबाब नोंदविण्याची आवश्यकता होती.

नंतर श्री.भारवि....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.राम शिंदे...

त्यामध्ये तसे न होता त्या महिलेने मुली उपलब्ध करून दिलेल्या नाहीत. 10 तारखेला गुन्हा दाखल झाला. त्यानंतर मेडिकल रिपोर्ट उपलब्ध झाल्यानंतर 11 तारखेला त्या सर्व आरोपींना अटक करून पुढील कारवाई करण्यात आलेली आहे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, शांती निकेतन संस्था ही कुठली आहे, सदर संस्था ही रायगड जिल्ह्यातील आहे की रायगड जिल्ह्याच्या बाहेरील आहे ? ही जी आश्रमशाळा सुरू करण्यात आली आहे त्या आश्रमशाळेला राज्य शासनाच्या कुठल्या विभागाने परवानगी दिली आहे ? त्या आश्रमशाळेला परवानगी दिली नसेल तर त्यासंबंधीचा देखील गुन्हा दाखल करण्यात यावा. या आश्रमशाळेला बालकल्याण विभाग, सामाजिक न्याय विभाग, शिक्षण विभाग, आदिवासी विभाग यापैकी कोणत्या विभागाने परवानगी दिली आहे ही माहिती तपासामध्ये उपलब्ध झाली आहे काय ? तसेच, सदर आश्रमशाळा ही स्वतःच्या मालकीच्या जागेत होती की, भाड्याच्या जागेत होती ? पनवेल, उरण आणि कर्जत या ठिकाणी बाहेरच्या संस्था येऊन मोठ्या प्रमाणावर शाळा किंवा आश्रमशाळा काढत आहेत. त्यामुळे त्या भागातील गरीब मुले, आदिवासी मुले यांना गोळा करून वेगळ्या तऱ्हेने धंद्याला लावतात अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. या भागातील एका तरी आश्रमशाळेसंबंधात सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे या लक्षवेधी सूचना सातत्याने उपस्थित करीत आहेत. तेव्हा राज्य शासन या परिसरातील आश्रमशाळांवर तसेच वेगवेगळ्या संस्थांवर करडी नजर ठेवून योग्य ती कारवाई करणार आहे काय ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, या आश्रमशाळेला नेमक्या कोणत्या विभागाने परवानगी दिली हे तपासामध्ये निदर्शनास आलेले नाही. त्यामुळे ही शाळा बेकायदेशीर आहे की, तिला परवानगी दिली होती किंवा कसे तसेच या आश्रमशाळेला ट्रायबलची परवानगी होती की, महिला बालकल्याण विभागाची परवानगी होती हे सर्व तपासून घेतले जाईल. त्यात उल्लंघन झाले असेल तर कारवाई देखील करण्यात येईल. या परिसरामध्ये अशा प्रकार मोठ्या प्रमाणावर घडतो असे देखील सांगण्यात आले. त्या अनुषंगाने देखील विभागाला सूचना देण्यात येतील.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांच्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना माननीय मंत्र्यांनी सांगितले की, ही एका ट्रस्टची शाळा आहे. या ट्रस्टची नोंद धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे झाली असेल तर या ट्रस्टच्या संबंधात काही माहिती मिळविण्याचा प्रयत्न केलेला आहे काय ? प्रत्यक्ष माहिती मिळाल्यानंतर गुन्हा दाखल करण्याचा मधला कालावधी हा खूप क्रीटिकल असतो. या मधल्या कालावधीत त्या आश्रमशाळेत अधिकचे गैरव्यवहार होण्याची शक्यता असते किंवा तेथे जे काही घडलेले असते त्यासंबंधातील पुरावे नष्ट करण्याची शक्यता आपल्याला नाकारता येत नाही. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर त्याची चौकशी सुरू झाली आणि त्यानंतर गुन्हा दाखल झाला. या मधल्या काळामध्ये या संस्थेच्या बेकायदेशीर कामावर लक्ष ठेवण्यासाठी पोलीस यंत्रणेने काही कारवाई केली होती काय, सातत्याने त्या ठिकाणी पोलिसांची देखरेख होती काय, मुलांमध्ये गतिमंद किंवा मंतिमंदत्वाचा दोष असेल तर त्यावेळी ताबडतोब त्याची तपासणी करण्याची जी काळजी घ्यायला पाहिजे ती पोलिसांनी घेतली होती काय ? या सर्व प्रश्नांच्या उत्तरामध्ये आपल्याला असे दिसते की, पोलिसांनी तक्रार दाखल करून घेतली असेल, तपास जरूर केला असेल. हा प्रसंग मुलींवर ओढवला आहे. त्यामुळे त्याकडे बघण्याचा दृष्टिकोन हा अधिक सतर्क असला पाहिजे. तेव्हा या प्रकारची जबाबदारी निश्चित करून त्या प्रमाणे पोलीस खात्याकडून काय व्यवस्था करण्यात आली आहे याबद्दल माननीय मंत्र्यांनी स्पष्टता करावी.

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी प्रश्न उपस्थित केला आहे की, धर्मादाय आयुक्त कार्यालयांकडून काही माहिती उपलब्ध झाली आहे काय ? यासंबंधातील तक्रार आल्यानंतर त्याद्वारे जी नावे पुढे आली त्या तिन्ही आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. या तिन्ही आरोपींना पोलीस कस्टडी देण्यात आलेली आहे. बाल लैंगिक अत्याचार अधिनियम सन 2012 अंतर्गत पोस्को देखील दाखल करण्यात आलेला आहे. सात वर्षापेक्षा जास्त शिक्षा असेल अशा सर्व गुन्ह्यांचा अंतर्भाव त्यात करण्यात आलेला आहे. मतिमंद आणि लहान मुलांच्या संबंधात एक वेगळी तपासणी करण्यात येईल. अगोदर मी डॉ.नीलमताई गोऱ्हे यांच्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले आहे की बालमजुरांच्या कायद्याचे सुद्धा व्हॉयलेशन झाले असेल तर ते सुद्धा तपासून बघितले जाईल. नियमांचे, कायद्याचे पालन त्यांनी केले नसेल तर ते सुद्धा तपासून त्याप्रमाणे गुन्हा देखील दाखल करण्याच्या सूचना विभागाला देण्यात येतील.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या मुलींवर लैंगिक शोषण करून त्यांची अश्लील चित्रफितसुद्धा काढण्यात आली आहे काय, त्यामुळेच तो ब्लॅकमेलिंग करत होता काय ? हे समोर आलेले नाही. एक प्रश्न सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी देखील मांडलेला आहे. जे वेगवेगळे आश्रम आहेत त्यातून वेगवेगळे गैरप्रकार समोर येत आहेत. त्यामुळे येत्या एक महिन्याच्या काळात आता ज्या ज्या सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारले आहेत त्यांना व त्या भागातील संस्था तसेच विभागाचे अधिकारी यांच्या समवेत एखादी बैठक माननीय मंत्री महोदय घेणार आहेत काय ? कारण आज अनधिकृत आश्रमशाळांचा प्रश्न पुढे येत आहे. तीन केसेस प्रलंबित आहे. चंद्रप्रभा ट्रस्टची देखील केस प्रलंबित आहे. कल्याणी ट्रस्टसंबंधी शिक्षा झालेली आहे. यासंबंधी दिशा केंद्र आणि चाईल्ड लाईन आहे यांची सातत्याने विनंती केलेली आहे. त्यामुळे मंत्री महोदयांनी रायगड जिल्ह्या पुरती स्पेसिफिक बैठक घेतली तर धोरणात्मक निर्णय घेऊन अधिक चांगल्या पद्धतीने कार्यपद्धती अंमलात आणता येईल. तेव्हा अशी बैठक मंत्री महोदय घेणार आहेत काय?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, पर्टिक्युलर काही केसेस दिल्या तर व्हेग मिटींग घेण्यापेक्षा अजेंडा देऊन मिटींग घेण्यासंबंधी सकारात्मक दृष्टिकोनातून प्रयत्न करण्यात येईल.

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, फार गंभीर विषयावर येथे चर्चा सुरू आहे. या प्रकरणातील अत्याचारित मुलगी आता कुठे राहते, या प्रकरणातील आरोपींना अटक केल्यानंतर ती मुलगी अजूनही त्या आश्रमशाळेत राहते काय किंवा शासनाच्यावतीने तिची व्यवस्था करण्यात आलेली आहे काय व त्या अत्याचारित मुलीला शासनाच्यावतीने कोणती मदत करण्यात आलेली आहे ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, या गुन्ह्याच्या तपासाच्या संदर्भामध्ये आणि प्रश्नाचा रोख ज्या दिशेने होता त्यासंबंधी कारवाई करण्यात आलेली आहे. त्या पीडित मुलीची जी काही तक्रार होती त्या अनुषंगाने पुरेशी चौकशी केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने सकारात्मक दृष्टिकोन ठेवून यामध्ये योग्य ती कारवाई करण्यात येईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, ती मुलगी आता दुसऱ्या संस्थेत शिक्षण घेत असून तेथील बालकल्याण समितीने तिची व्यवस्था केलेली आहे.

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ. शी. : मुंबई व पुणे येथील पदपथावर अतिक्रमण हटविण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता

मु.शी. : मुंबई व पुणे येथील पदपथावर अतिक्रमण हटविण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता यासंबंधी श्री.अनंत गाडगीळ, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अनंत गाडगीळ (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई-पुणे या सारख्या शहरांमध्ये अनेक पंचतारांकित हॉटेल, सिनेमागृहे खाजगी कंपन्या असणे, त्यांनी इमारती बाहेरील रस्ता अनधिकृतपणे ताब्यात घेतल्याचे माहे जून 2015 दरम्यान निदर्शनास येणे, उदा.मुंबईतील ताजमहाल हॉटेल यांनी फूटपाथ व्यापून टाकल्यामुळे पादचाऱ्यांची गैरसोय होणे, त्यामुळे पादचाऱ्यांना रस्त्यांवरुन चालावे लागत असल्याने अपघाताची शक्यता निर्माण होणे, परिणामी सर्वसामान्य जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, त्यामुळे मुंबई व पुणे येथील फूटपाथवरील अतिक्रमण हटविण्याबाबत शासनाने तातडीची करावयाची कार्यवाही व राज्यशासनाची प्रतिक्रिया."

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अनंत गाडगीळ : सभापती महोदय, मुंबई-पुणे सारख्या शहरांमध्ये आता माणसांपेक्षा मोटारींचीच संख्या वाढत चालली आहे अशी परिस्थिती आहे. वाहने वाढत चालली असल्यामुळे पार्किंगची समस्या मोठ्या प्रमाणावर वाढायला लागली आहे. त्यात भरीसभर म्हणून मोठ्या शहरांतील पंचतारांकित हॉटेल्स, मॉल्स, खाजगी कंपन्या यांनी खाजगी सुरक्षा कंपनींचे सुरक्षा रक्षक ठेवून आपल्या समोरच्याच रस्त्यांवर नो-पार्किंगचे बोर्ड लावले आहेत. त्यामुळे लोक रस्त्यावरून चालत आहेत आणि अपघातांचे प्रमाण वाढत चालले आहेत. ऑबेरॉय हॉटेल आणि ताजमहाल हॉटेल देखील याला अपवाद नाही. ताजमहाल हॉटेलने तर कहर केलेला आहे. त्यांनी संपूर्ण रस्ता ताब्यात घेऊन बॅरिकेडस लावले आहेत. त्यामुळे रस्त्यावरून माणूस देखील जाऊ शकत नाही. मुंबई उच्च न्यायालयाने मुंबईच्या वाहतूक समस्येकडे सरकारचे गांभीर्याने लक्ष वेधलेले आहे.

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र : 8036.....

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, सभागृहात आरोग्य मंत्री व राज्यमंत्री उपस्थित असल्यामुळे मी मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, सोडियम हायड्रोक्लोराईड या औषधाची एकंदर खरेदी 4.43 कोटी रुपयांची करण्यात आली आहे. एवढया मोठया प्रमाणात या औषधाची खरेदी करण्यात आली ती कशासाठी करण्यात आली, या औषधाचा उपयोग कोणत्या आजारासाठी केला जातो ? सामान्य आजारासाठी जी औषधे वारंवार लागतात ती औषधे शासनाच्या कोणत्याही हॉस्पिटल्समध्ये उपलब्ध नाहीत. ज्या औषधांची आवश्यकता असते ती औषधे मात्र खरेदी केली जात नाहीत. या औषधाची राज्यात एनयुएचएम मार्फत किती खरेदी करण्यात आली व त्यापैकी किकती हिस्सा सोडियम हायड्रोक्लोराईडचा आहे ? एवढया मोठया प्रमाणात जे सोडियम हायड्रोक्लोराईड औषध खरेदी करण्यात आले आहे त्याची गरज नाही असे माझ मत आहे. सोडियम हायड्रोक्लोराईड हे औषध कशासाठी वापरले जाते याचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी करण्याची आवश्यकता आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सदर औषध हे सोडियम हायड्रोक्लोराईड नसून ते सोडियम हायपोक्लोराईड आहे. सोडियम हायपोक्लोराईडचा वापर ब्लिचिंगसाठी केला जातो,स्टेन रिमुव्हलसाठी,डिसइन्फेक्टंट म्हणून वापरतात. इट इज ॲन्टी व्हायरल ड्रग ट्रिटमेंटसाठी वापरतात. एचआयव्हीचा पेशंटचे मॉपिंग करावयाचे, लादी पुसावयाची असेल तर त्यासाठी सोडियम हायपोक्लोराईड या औषधाचा वापर केला जातो. या औषधाची एवढया मोठया प्रमाणात का खरेदी करण्यात आली असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला आहे. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, साधारणपणे आरोग्य खात्याची औषध खरेदी करण्याची एक पध्दत आहे. सुरुवातीला सर्व हॉस्पिटलकडून मागणीपत्र घेतले जाते. मागणीपत्र आल्यानंतर इ-टेंडरींगच्या माध्यमातून खरेदी केली जाते. कुंभमेळा डोळयासमोर ठेवून या औषधाची मागणी रुग्णालयाकडून करण्यात आली होती. कुंभमेळा केवळ नाशिक येथेच आहे असे नसून शिर्डीपासूनची सर्व आरोग्य केंद्र व कॉर्पोरेशनला यासंदर्भात आपली कोणत्या औषधांची मागणी आहे यासाठी पत्र पाठवली होती. त्यांच्याकडून इतके इतके लिटर औषध लागेल अशी मागणी आली. नाशिक महानगरपालिकेची एकंदर लोकसंख्या 14.86 लाखाच्या आसपास आहे.

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती : मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण झाल्यानंतर मी आपल्याला उप प्रश्न विचारण्याची संधी देईल.

डॉ. दीपक सावंत : नाशिकमध्ये 17 नागरी प्राथमीक आरोग्य केंद्र, नाशिक मधील चार मोठी रुग्णालये आणि आजुबाजूच्या परिसरासाठी या औषधाची मागणी केलेली आहे. मागणी आल्यानंतर इ-टेंडरींगच्या माध्यमातून सोडियम हायपोक्लोराईड या औषधाची खरेदी करण्यात आलेली आहे. महानगरपालिका किंवा महानगरपालिकेच्या इतर विभागाने या औषधाची .....

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, नाशिक महानगरपालिकेने सोडियम हायपोक्लोराईड या औषधाची मागणीच केली नव्हती.

सभापती :सन्माननीय मंत्री महोदयांचे प्रथम उत्तर पूर्ण होऊ द्या.

डॉ. दीपक सावंत : सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांना मी उत्तर देण्यास बांधिल आहे. मला कोणालाही पाठिशी घालावयाचे नाही. ज्यावेळी आमच्याकडे सोडियम हायपोक्लोराईडचा स्टॉक जास्त आला आहे याची माहिती मिळाली त्यावेळी तो स्टॉक इतरत्र वितरित करण्यात आला. महानगरपालिकेची दोन महिने जनरल बॉडीची मिटींग होणार नसल्यामुळे सदर मागणी नोंदविण्यात आली असे आम्हाला सांगण्यात आले होते. सन्माननीय सदस्य श्री. जयवंतराव जाधव यांच्या तसेच सन्माननीय सभागृहाच्या या प्रश्नाच्या संदर्भातील भावना लक्षात घेऊन मी सांगू इच्छितो की, स्मरणपत्र आणि सोडियम हायपोक्लोराईड हे दोन वेगळे विषय आहेत. सन्माननीय सदस्यांनी प्रश्नामध्ये असे म्हटले आहे की, कुंभमेळयासाठी पैशाची मागणी केली होती. दुसरीकडे सिंहस्थासाठी सिव्हील हॉस्पिटल आणि जिल्हा परिषदेकडून आरोग्य सेवा संचालनालयाला औषधे खरेदीसाठी 27 वेळा स्मरणपत्र देऊनही साधन-सामुग्री मिळत नसल्यामुळे सिंहस्थात आरोग्य विभागासमोर यक्ष प्रश्न निर्माण झाला आहे. सोडियम हायपोक्लोराईड हा एक वेषय आहे व औषधाच्या संदर्भातील विषय हा दुसरा विषय आहे. जर 27 स्मरणपत्रे दिली असतील तर त्यासंदर्भातील चौकशी केली जाईल तसेच सोडियम हायपोक्लोराईड हे औषध गरजेपेक्षा जास्त प्रमाणात विकत घेतले असेल तर त्याची देखील उच्चस्तरीय चौकशी करुन त्यासंदर्भातील विषयाची माहिती सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, मघाशी या प्रश्नाचे उत्तर राज्यमंत्री देत असताना त्यांनी सांगितले होते की, या औषधाची मर्यादा सहा महिने आहे. या औषधाची मर्यादा जर सहा महिने असेल तर इतक्या मोठया प्रमाणात हे औषध खरेदी केल्यानंतर या औषधाचा वापर का करण्यात आला नाही ? हे औषध केवळ सहा महिनेच वापरले जाऊ शकते याची माहिती असताना या औषधाची खरेदी इतक्या मोठया प्रमाणात का करण्यात आली ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, काही औषधांची एक्सपायरी शॉर्ट असतात. एक्सपायरीच्या नंतर ही औषधे वापरण्यास योग्य नसतात त्यापैकी सोडियम हायपोक्लोराईड हे एक औषध आहे. हे औषध एवढया मोठया प्रमाणात का खरेदी करण्यात आले याची माहिती माननीय राज्यमंत्र्यांनी अगोदरच दिलेली आहे. सिंहस्थामुळेच एवढया मोठया प्रमाणात या औषधाची खरेदी करण्यात आली होती.

श्री. हेमंत टकले : सिंहस्थमेळा डोळयासमोर ठेवून सोडियम हायपोक्लोराईड या औषधाची खरेदी करण्यात आली अशी आपण माहिती देत आहात तसेच या औषधाचा वापर सहा महिन्यातच केला पाहिजे असेही सांगता. सिंहस्थाच्या पर्वण्या व या ठिकाणी लोक मोठया प्रमाणात केव्हा येणार आहेत याचीही आपल्याला माहिती आहे. त्यामुळे यासंदर्भात शेडयुलिंग करुन जेवढे औषध लागेल तेवढे औषध खरेदी करावयास पाहिजे होते. आपण एकदम इतक्या मोठ्या प्रमाणात या औषधाची खरेदी का केली तसेच यामध्ये कोणाचा आशिर्वाद होता हे सुध्दा आम्हाला माहिती नाही. परंतु प्रथम औषध डम्प करावयाचे नंतर पुन्हा पाठवून द्यावयाचे ही कोणती पध्दत आहे. या औषधाची उपयुक्तता वर्षभराच्या काळासाठी वेगवेगळया टप्प्यांमध्ये निश्चित करता येऊ शकते ते न करता एकदमच सिंहस्थाच्या पहिल्या दिवशी बारा महिन्याचे औषध खरेदी करण्याची गरजच काय ?

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आपला प्रश्न बरोबर आहे. सोडियम हायपोक्लोराईड हे औषध इतक्या मोठया प्रमाणात का खरेदी करण्यात आले याची मला प्रथम सखोल चौकशी करावयाची आहे. या सखोल चौकशीमध्ये जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर योग्य ती कारवाई केली जाईल.

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी या उत्तराच्या संदर्भात माहिती दिली आहे की, नाशिक येथे सिहंस्थ कुभमेळयाच्या निमित्ताने सोडियम हायपोक्लोराईड या औषधाची खरेदी करण्यात आली. कुंभमेळयाचे काम नाशिक महानगरपालिका करीत आहे. असे असताना नाशिक महानगरपालिका सांगते की, आम्ही या औषधाची मागणी केलेली नाही. त्यामुळे या औषधाची जी खरेदी झालेली आहे ती चुकीची झालेली आहे असाच त्याचा अर्थ निघतो. मंत्री महोदयांच्या उत्तरामुळे सभागृहाची दिशाभूल होत आहे. त्यामुळे सोडियम हायपोक्लोराईड या औषधाची ज्यांनी खरेदी केली त्यांच्यावर शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, नाशिक महानगरपालिकेने औषधाची मागणी न नोंदवल्याचे पत्र मी आपल्या माध्यमातून माननीय मंत्री महोदयांना देण्यास तयार आहे. आपले आरोग्य संचालक कार्यालय मुजोर झालेले आहे. हे कार्यालय मस्तीत आहे. अधिकाऱ्याला फोन केला तर अधिकारी लँडलाईनवर सुध्दा उपलब्ध होत नाही. चौकशी करण्यास गेलो तर त्या ठिकाणी दाद मिळत नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

दुसरा प्रश्न असा उपस्थित होतो की, जिल्हा प्रशासनाने सांगितले की, आमची जीबी होणार नसल्यामुळे आम्ही शासनाच्या निकषा प्रमाणे औषधांची खरेदी करु शकणार नाही. असे असताना संचालक कार्यालय ही खरेदी आरसीच्या माध्यमातून करणार आहे की, इ-टेंडरींगच्या माध्यमातून करणार आहे ? औषधे खरेदी करण्यासाठी आपल्याकडे विहित कालावधी उपलब्ध आहे काय ? संचालक कार्यालयाला या खरेदीच्या माध्यमातून कुरण उपलब्ध होणार आहे त्यामुळे माझी माननीय मंत्री महोदयांना कळकळीची विनंती आहे की, आपण आरोग्य यंत्रणा चांगली राखण्याकरिता या ठिकाणी आपण जी कळकळ आणि तळमळ व्यक्त केली आहे त्यानुषंगाने या प्रश्नाला आपण न्याय द्यावा एवढीच विनंती मी या माध्यमातून करीत आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी आपल्या कळकळीची आणि तळमळीची जाणीव ठेवून सांगू इच्छितो की, मागणीची पत्र आली होती काय याची प्रथम चौकशी केली जाईल. सदर महानगरपालिकेने औषधांची मागणी केली होती काय याचीही चौकशी केली जाईल, जिल्हा परिषदेने औषधांची मागणी केली होती काय याचीही चौकशी केली जाईल. आरोग्य खात्यामध्ये खरेदी इ-टेंडरींगनेच केली जात असते. जर त्यांनी प्रोक्यूअर केले असेल तर नाशिक महानगरपालिकेला आम्हाला पुन्हा देण्याची काही गरज नाही. जेवढया औषधाची गरज लागते तेवढीच औषधे खरेदी केले जाईल हे मी सभागृहाला आश्वासित करु इच्छितो. जर आपल्याला आरोग्य संचालनालयाचा अनुभव वाईट असेल तर आपल्याला दालनात बोलावून आपल्याशी कोणते अधिकारी मुजोरीने वागतात याची देखील चौकशी केली जाईल.

यानंतर श्री. अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेंमत टकले.....

म्हणजे महानगरपालिकेने जी दंडात्मक कारवाई केलेली आहे त्याकडे हॉटेलने दुर्लक्ष केलेले आहे. ताजमहल पॅलेस हॉटेलला दंडात्मक रक्कम भरण्याची नोटीस केव्हा देण्यात आली, ही दंडात्मक रक्कम किती कालावधीत भरणे आवश्यक होते ? दिनांक 18 जूनच्या पत्रान्वये हॉटेल ताज महल पॅलेसला पुन्हा 15 दिवसांची मुदत दिलेली आहे. त्याबाबत हॉटेलकडून रिलिफ मिळण्याचा प्रयत्न होण्यापूर्वी शासनातर्फे किंवा महानगरपालिकेतर्फे कॅव्हेट दाखल केलेले आहे काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, हॉटेल ट्रायडेंटला दंड कमी आहे आणि हॉटेल ताज महल पॅलेसला दंड जास्त आहे असे सन्माननीय सदस्यांच्या बोलण्यावरुन दिसते. हे दंड आकारण्यात आले त्याबाबत काही निकष आहेत. हॉटेल ट्रायडेंटने जी जागा व्यापलेली आहे त्यावरुन त्या हॉटेलला दंड आकारण्यात आलेला आहे. त्या हॉटेलने पूर्ण पदपथ वापरलेला नाही. त्या हॉटेलने कुंड्या कशा ठेवल्या आहेत, बॅरीकेडींग कशा लावल्या आहेत याचे फोटो आहेत. सन्माननीय सदस्यांना ते फोटोज पहावयाचे असतील तर ते मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो. हॉटेल ट्रायडेंटने 59 स्वे.मी.जागा व्यापलेली आहे. ती जागा अधिक कुंड्या ठेवलेली जागा असा एकूण 16 लाख रुपये दंड झालेला आहे. त्या हॉटेलने ही रक्कम वेळोवेळी भरलेली आहे. They had followed the instructions. हॉटेल ट्रायडेंटने वेळोवेळी दंड भरलेला आहे. हॉटेल ताज महल पॅलेसने 1386 स्वे.मीटर इतकी जागा व्यापलेली असल्यामुळे त्यांची रक्कम वाढलेली आहे. त्याशिवाय पार्किंगचे चार्जेस आहेत. परिपत्रकाप्रमाणे चारचाकी वाहनासाठी 1350 प्रतिमाह दिवसरात्र या दराने 1.6.2009 ते 31.3.2015 या कालावधीसाठी 1 कोटी 89 लाख 750 रुपये इतकी रक्कम आकारलेली आहे. ही रक्कम अशी वाढत गेली. आपण त्या रकमेवर 15 टक्के व्याजाची आकारणी सुद्धा केलेली आहे. त्या हॉटेलला कोणत्याही प्रकारचे अभय देण्याचे काही कारण नाही. सन्माननीय सदस्यांनी कॅव्हीएट दाखल करण्याची सूचना केलेली आहे ती देखील मान्य आहे. मी स्वत: निर्देश देतो की, त्या ठिकाणी चांगला लॉ-आफिसर देण्यात येईल आणि यातून बाहेर निघण्यासाठी दक्षता घेतली जाईल. हॉटेलने जी मुदतवाढ मागितलेली आहे ती शेवटची असेल यानंतर त्या हॉटेलला कोणत्याही प्रकारचे संरक्षण दिले जाणार नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अनंत गाडगीळ यांनी मुंबई आणि पुणे शहरातील पदपथ आणि वाहनतळाच्या संदर्भात लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे. मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, मुंबईतील जुने आकाशवाणी आमदार निवासाच्या अवतीभोवती भरपूर वाहने असतात. सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून ती अतिशय धोकादायक बाब आहे आणि मी हे सातत्याने सांगत आहे. जुने आकाशवाणी आमदार निवासाजवळ गाडी पार्किंग करणे खूप अवघड तर आहेच, पण त्या ठिकाणी चालणे देखील खूप मुश्किल आहे. मनोरा आमदार निवास आणि आकाशवाणी आमदार निवास या दोन्ही ठिकाणी वाहनांची खूप ये-जा असते. त्या ठिकाणी गाड्या अस्ताव्यस्त पार्किंग केलेल्या असतात. आकाशवाणी आमदार निवासात 60 आमदार राहतात आणि त्या ठिकाणी 250 ते 300 गाड्या अगदी एकमेकांना खेटून पार्क केलेल्या असतात. हे अतिशय धोकादायक चित्र आहे. मंत्रालय ते आकाशवाणी आमदार निवास हे अंतर अगदी हाकेच्या अंतरावर आहे. मनोरा आमदार निवास येथे आमदारांच्या गाड्यांव्यतिरिक्त अन्य गाड्या पार्किंग केल्या जातात. त्या वाहनांची कोणत्याही प्रकारची तपासणी केली जात नाही. तेव्हा पार्किंगच्या संदर्भात वेगळ्या प्रकारची उपाययोजना केली पाहिजे. माझा प्रश्न आहे की, आमदार निवासात येणाऱ्या वाहनांची तपासणी करण्यात येईल काय ? आकाशवाणी आमदार निवासासमोर गाड्या पार्किंग केल्यामुळे तेथून चालणे देखील मुश्किल होते. तेव्हा सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून तेथील वाहनांच्या पार्किंगसाठी वेगळी पर्यायी व्यवस्था करण्यात येईल काय ? सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी सांगितले की, मुंबई शहरात रोज नवीन 500 वाहनांचे रजिस्ट्रेशन होत असते. शहरात वाहनांची रोज होत असलेली वाढ लक्षात घेता परिवहन विभागाने एक परिपत्रक काढले होते की, ज्या वाहनांना 15 वर्षे पूर्ण झालेली आहेत अशी वाहने रस्त्यावर आणू नयेत. परंतु दुर्दैवाने अनेक रिक्षा, ट्रक, चारचाकी वाहनांना 15 वर्षे झालेली असतानाही आणि कोणत्याही प्रकारचे इन्शुरन्स न घेता ती वाहने रस्त्यावर धावत आहेत. अशा वाहनांवर तातडीने कारवाई करण्याच्या दृष्टीने आणि शासनाच्या गाईड लाईन्स फॉलो करण्याच्या दृष्टीने सदर वाहनांवर तातडीने कार्यवाही करणार आहात काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मंत्रालय, आकाशवाणी आमदार निवास आणि मनोरा आमदार निवास येथे वाहनांची होत असलेली कोंडी याबाबत प्रश्न विचारला. सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न आणि लक्षवेधी सूचनेमधील विषय थोडा वेगळा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील...

आहे. परंतु तो इश्यू आहेच. माझे एवढेच म्हणणे आहे की, हॉटेल ताज महल पॅलेस व हॉटेल ट्रायडेंट या हॉटेल्सना 26/11 ची पार्श्वभूमी आहे. 26/11 च्या घटनेनंतर पोलीस प्रशासनाने वेळोवेळी बैठका घेऊन त्या हॉटेल्ससाठी काही लिबर्टी दिल्या होत्या. त्या ठिकाणी पदपथावर काही बॅरिकेडस कराव्या लागतील, काही कुंड्या ठेवाव्या लागतील. हे एक बेट असल्यामुळे आजूबाजूला वॉर्डमध्ये काही स्कोप राहिलेला नाही. लोकसंख्या आणि वाहनांची संख्या यांचे गुणात्तरप्रमाण जास्त असल्यामुळे आपणास काहीही ना काही धोरण ठरवावे लागेल. सॉऊथ मुंबईसाठी वाहनाच्या पर्किंगसाठी निश्चितपणे धोरण ठरवावे लागेल. सन्माननीय सदस्यांनी मुंबई शहरात रोज 500 नवीन गाड्यांची भर पडत आहे, 15 वर्षाची वाहने रस्त्यावर आणू नयेत असा मुद्दा मांडला. अशी वाहने चेकअप करुन ती वाहने बार केली पाहिजेत, परंतु हा विषय परिवहन विभागाशी संबंधित असल्यामुळे त्याच विभागाचे मंत्री चांगली माहिती देऊ शकतील. परंतु पार्किंगसंबंधीचे धोरण ठरविण्याबाबत त्यांना सांगण्यात येईल. तसेच नवीन वाहनांसबंधी रिस्ट्रीक्शन ठेवून पार्किगसंबंधी धोरण निश्चितपणे ठरवावे लागेल.

श्री.आनंद ठाकूर : सभापती महोदय, मुंबई आणि पुणे शहरामध्ये वाहनांची होत असलेली कोंडी तसेच पादचाऱ्यांना पदपथावर चालण्यासाठी होत असलेला त्रास यासंबंधीची ही लक्षवेधी सूचना आहे. मुंबईसारख्या शहरांमध्ये पार्किंगसाठी एक्स्ट्रा एफ.एस.आय.देऊन इन्सेन्टीव्ह देण्याचा प्रयत्न होत आहे. राज्यातील अनेक शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात नागरीकरण वाढत असल्यामुळे त्या ठिकाणी देखील या समस्या निर्माण झालेल्या आहेत. तालुक्याच्या आणि जिल्ह्याच्या ठिकाणी हा प्रश्न निर्माण झालेला आहे. माझा प्रश्न आहे की, मुंबईप्रमाणे राज्यातील इतर भागात सुद्धा असा इन्सेंटीव्ह देऊन पार्किंगची होणारी कोंडी सोडविण्यासाठी शासन धोरण आखणार आहे काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न मूळ लक्षवेधी सूचनेच्या विषयाशी थोडा वेगळा आहे, परंतु सन्माननीय सदस्यांची सूचना ग्राह्य आहे. आपणास छोट्या छोट्या शहरामध्ये याची मिरर इमेज पहावयास मिळते. एखादी इमारत उभी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील.....

करण्यात येत असेल तर त्या इमारतीचा बेसमेंट सुरुवातीला पार्किंग दाखवून नंतर तो बंदिस्त केला जातो. त्यामुळे बरेच प्रश्न उपस्थित होतात. तेव्हा या दोन्ही गोष्टी तपासाव्या लागतील. स्थानिक स्वराज्य संस्थांनी अस्तित्वात असलेल्या कायद्याचे पालन केले तर हे प्रश्न निश्चितपणे सुटू शकतील. तरीही मुंबई महानगरपालिकेने मुंबई शहरासाठी 33 (24) धोरण आणलेले आहे, तशाप्रकारचा प्रस्ताव स्थानिक स्वराज्य संस्थांनी आणला तर त्याबाबत शासन सकारात्मक दृष्टीने विचार करील.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

लक्षवेधी क्रमांक 4 व 5 बाबत

तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते): आजच्या कामकाजपत्रिकेत दाखविण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक 4 व 5 या पुढे ढकलण्यात आल्या आहेत.

..6..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ. शी. : बीड जिल्हा रुग्णालयात रुग्णांची होत असलेली हेळसांड

मु. शी.: बीड जिल्हा रुग्णालयात रुग्णांची होत असलेली हेळसांड यासंबंधी सर्वश्री अमरसिंह पंडित, धनंजय मुंडे, सतीश चव्हाण, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"बीड जिल्हा रुग्णालयात रुग्णांची सतत हेळसांड होणे, वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी यांची शेकडो पदे रिक्त असणे, स्थानिक प्रशासन व लोकप्रतिनिधी यांनी मागणी करुनही रिक्त पदे भरण्यास शासनाकडून अक्षम्य विलंब होणे, पीपीपी तत्वावर विप्री कंपनीस रुग्णालयातील सीटी स्कॅन, एमआरआय, सोनोग्राफी, एक्स-रे आदी सुविधा देण्याबाबतचे कंत्राट देण्यात येणे, या कंपनीकडून अद्यापही या सुविधा पुरविण्यात न येणे, मागील दोन वर्षांपासून कंपनीला शासनाकडून साधन सुविधा आणि कोटयवधी रुपयांचा निधी दिला जाणे, यामुळे गोरगरीब रुग्णांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक झळ सोसावी लागणे, जिल्हा रुग्णालयातील नवीन 200 खाटांचे वाढीव रुग्णालय बांधकाम मंजूर असतांनाही त्याचे काम सुरू न होणे, गेवराई, केज, परळी सह इतर उप जिल्हा रुग्णालयात अपुऱ्या सुविधा अभावी रुग्णांना वेळेवर उपचार न मिळणे, ट्रॉमा केअर युनिटचे बांधकाम पूर्ण होऊनही ते कार्यान्वीत न होणे, किरकोळ उपचार करुन रुग्णांना रेफर करण्याचे प्रकार या रुग्णालयात सतत होणे, जिल्हा रुग्णालय प्रशासनाकडून अपंगांच्या प्रमाणपत्राचे नूतनीकरण करताना त्यांची अडवणूक आणि आर्थिक पिळवणूक करण्यात येणे, अपंग प्रमाणपत्र विक्रीचे प्रकार उघडकीस येणे, रक्षकांनी केलेल्या मारहाणीत अनेक रुग्ण जखमी होण्याचे प्रकारही घडणे, कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय प्रतिपूर्तीसाठी सर्रास लाच मागण्याचे प्रकार होऊन अशा कर्मचाऱ्यांना मानसिक त्रास देण्याचा प्रकार घडणे, रुग्णालयातील असुविधा आणि अपुरा कर्मचारी वर्ग यामुळे अनेक गोरगरीब रुग्ण उपचारापासून वंचित राहणे, लोकप्रतिनिधींनी तक्रारी देऊनही कोणतीही

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित....

चौकशी न होणे, रुग्णालयात भ्रष्टाचाराच्या प्रकरणात वाढ होणे याचा अनिष्ट परिणाम रुग्णसेवेवर होणे, या गंभीर बाबींकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, या बाबत शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ.दीपक सावंत (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कलयाण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, बीड जिल्हा शल्य चिकित्सकांच्या कार्यभाराच्या संदर्भातील ही लक्षवेधी सूचना आहे. जिल्हा शल्य चिकित्सक म्हणून ते चुकून सेवेत आले आहेत, त्यांचा राजकीय सहभाग अधिक दिसून येतो. दिनांक 11 जून, 2014 रोजी दै.लोकमत या वृत्तपत्रात "अपंगाचे प्रमाणपत्र सिव्हील सर्जन डॉ.बोर्डे यांनी दुसऱ्याला विकले" या मथळ्याखाली बातमी प्रसिध्द झाली होती. श्री.पानपत एकनाथ भागवत यांचे अपंगत्व 90 टक्के असण्याच्या संदर्भातील प्रमाणपत्र जिल्हा शल्य चिकित्सकांनी दुसऱ्या व्यक्तीला विकले. त्या संदर्भात तक्रार केल्यानंतर 17 जून, 2014 रोजी चौकशीचे आदेश तत्कालीन आरोग्य मंत्र्यांनी दिले होते. आरोग्य संचालकांनी दिनांक 26 डिसेंबर, 2014 रोजी अहवाल सादर केला, त्यात स्पष्टपणे म्हटले आहे की, संबंधित जिल्हा शल्य चिकित्सकांविरुध्द तातडीने कारवाई करणे गरजेचे आहे. परंतु अद्याप त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात आलेली नाही. अपंगत्व प्रमाणपत्र विक्री करण्याच्या संदर्भात तातडीने कारवाई करण्यात येणार आहे की नाही?

सभापती महोदय, अपंगत्व प्रमाणपत्र नूतनीकरण करण्याच्या संदर्भात जिल्हा शल्य चिकित्सकांनी बुधवार हा दिवस ठरवून दिलेला आहे. माझ्या तालुक्यातील तरवाडा गावातील एक अपंग मुलगा प्रमाणपत्र मिळविण्यासाठी माझ्या कार्यालयात 13 वेळा आल्याची नोंद आहे. म्हणजे तो मुलगा जिल्हा शल्य चिकित्सकांच्या कार्यालयात किती वेळा गेला असावा याचा अंदाज घेता येईल. तरवाडा गावापासून बीड जिल्हा रुग्णालय 160 कि.मी.अंतरावर आहे. म्हणजे 13 वेळा या अपंग मुलाला 160 कि.मी.अंतर प्रवास करावा लागला. अपंगत्वाच्या प्रमाणपत्राचे नूतनीकरण करण्यासाठी संबंधितांना किती वेळा जिल्हा रुग्णालयात ये जा करावी लागणार आहे? असे अनेक अपंग दर बुधवारी जिल्हा रुग्णालयात येतात, तेथे संबंधित व्यक्तीला भेटल्याशिवाय अपंगत्वाच्या प्रमाणपत्राचे नूतनीकरण केले जात नाही.

सभापती महोदय, निवेदनात म्हटले आहे की, प्रतिपूर्तीचे एकूण 997 प्रस्ताव प्राप्त झाले होते. त्यापैकी 860 प्रस्ताव मंजूर झाले, 57 प्रस्ताव नामंजूर झाले व 110 प्रस्ताव प्रलंबित आहेत. निवेदनात नमूद केलेली माहिती कोणत्या महिन्यातील आहे हे मला माहिती नाही. जून महिन्याच्या 27 तारखेला वृत्तपत्रात काही हजार प्रकरणे प्रलंबित असल्याबाबतची बातमी प्रसिध्द झाली होती.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित....

या प्रकरणाबाबत सिनियॉरिटी नाही, तारखांची नोंद नाही. प्रकरणाशी संबंधित व्यक्ती भेटेल, पाकिट देईल त्याचे प्रकरण गठ्ठयातून बाहेर काढून त्याच दिवशी निकाली काढण्यात येते. निकाली काढण्यात आलेले प्रकरण किती दिवसापासून प्रलंबित आहे, निकाली काढण्यासाठी काय निकष आहेत हे तपासून पाहणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, जिल्हा रुग्णालयातील सुरक्षा रक्षकाने एका बाळंतीण बाईच्या पतीला मारहाण केली. त्या बाळंतीण बाईला सुरक्षा रक्षकाने ढकलले म्हणून तिच्या पतीने त्याला जाब विचारला, म्हणून त्या व्यक्तीला मारहाण करण्यात आली. तिचा नवरा तिथून निघून गेला. परंतु बाळंतीण बाईला डिस्चार्ज दिला गेला नाही. त्या बाईला रक्तस्त्रावाचा त्रास झाला. त्या संदर्भात केस रजिस्टर असताना निवेदनात अशा प्रकारची घटना घडलेली नाही असे नमूद केले आहे. मी एफआयआरची प्रत मागविली आहे, ती दुपारी 1.00 वाजेपर्यंत मला प्राप्त होईल. अशा प्रकारे अधिकारी मंत्री महोदयांना ब्रिफिंग देत असतील तर आपण वस्तुस्थितीपासून दूर जात आहोत हे सिध्द होईल.

सभापती महोदय, जिल्हा रुग्णालयातील सी.टी.स्कॅन मशीन व इतर सेवा पीपीपी मॉडेलवर पुरविण्याचे काम विप्रो कंपनीला देण्यात आले आहे. 2 वर्षापासून कंपनीने जागा ताब्यात घेतली आहे, परंतु अद्याप सेवा सुरु झालेल्या नाहीत. या संदर्भात मंत्री महोदयांनी गृह विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व महसूल विभागाची एकत्रित बैठक घेऊन तातडीने या रुग्णसेवा सुरु करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावा अशी मी विनंती करतो. प्रतिपूर्तीची प्रकरणे, अपंगत्वाचे प्रमाणपत्र नूतनीकरण करणे व अपंगत्वाचे प्रमाणपत्र विक्री केल्या प्रकरणी केलेल्या आरोपात तथ्य नाही असे म्हणता येणार नाही. बीड जिल्हा शल्य चिकित्सकांची उच्चस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करण्यात येऊन त्यांच्या विरोधात तातडीने कारवाई करणार आहात का?

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी चार महत्वाचे प्रश्न उपस्थित केलेले आहेत. त्यापैकी पहिला प्रश्न अपंगत्वाच्या प्रमाणपत्राबाबतचा आहे. माननीय सदस्यांनी माझ्याकडे तक्रार दाखल केलेली असून त्यांचे पत्र मला दिनांक 22 जून, 2015 रोजी प्राप्त झाले आहे. त्यानुसार मी चौकशी करण्यास सांगितले होते. यामध्ये दोन मुद्दे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.दीपक सावंत.....

आहेत. पानपत भगवान भागवत आणि गांदले नवनाथ लक्ष्मण अशा दोन अपंग व्यक्तींची प्रकरणे होती. वस्तुस्थिती काहीही असली तरी अपंगांना प्रमाणपत्र मिळालेच पाहिजे या मताशी मी सहमत आहे. त्यासाठी कोणत्याही प्रकारचा आकार घेता कामा नये, त्यासाठी पैसे मागता कामा नये याच्याशी देखील मी सहमत आहे. अपंग व्यक्ती इतक्या दूर अंतरावरुन प्रवास करुन अपंगत्वाचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी येत असते त्यावेळी त्या व्यक्तीला ताटकळत ठेवणे योग्य नाही. हा अपंग व्यक्तींवर अन्याय आहे. अपंग व्यक्तीचे प्रमाणपत्र विक्री केल्याबाबत तक्रार केलेली आहे. कोणीही अपंगत्वाचे प्रमाणपत्र दुसऱ्या व्यक्तीला विकू शकत नाही अशी माझी माहिती आहे. अपंगत्वाच्या प्रमाणपत्रावर संबंधित व्यक्तीचा फोटो असतो तो इनबिल्ट असतो. त्या ठिकाणचा फोटो काढून दुसऱ्या व्यक्तीला फोटो लावता येत नाही किंवा मूळचा फोटो काढता येत नाही. मी स्वत: अपंगत्वाचे प्रमाणपत्र पाहिले आहे. त्यामुळे ते दुसऱ्या व्यक्तीला देता येत नाही.

माननीय सदस्यांची तक्रार ग्राह्य आहे असे मी मानतो. त्यांनी दिनांक 22.10.2014 रोजी अर्ज केला होता. याकरिता सहाय्यक आरोग्य संचालकांची चौकशी करण्यासाठी समिती नेमली होती. त्या समितीचा अहवाल आहे माझ्यासमोर आहे. त्यांनी अहवालात म्हटले आहे की, विहित पध्दतीचा अवलंब करुन दुय्यम प्रत मागणी केल्यास ती त्यांना देता येईल.

सभापती महोदय, दुसरी तक्रार गांदले नवनाथ लक्ष्मण, राहणार तरवाडा, ता.गेवराई, जि.बीड यांच्या बाबतची आहे. त्यांनी ससून रुग्णालयात तपासणी केली होती. त्यांचे म्हणणे असे होते की, ससून रुग्णालयाकडून जे प्रमाणपत्र मला मिळेल त्याच्या आधारावर जिल्हा शल्य चिकित्सकांनी प्रमाणपत्र द्यावे. प्रत्यक्षात असे करता येत नाही. कारण प्रमाणपत्र वितरित करताना त्याच रुग्णालयाने पुन्हा एकदा तपासणी करणे आवश्यक आहे अशी माझी माहिती आहे.

नंतर श्री.कांबळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. दीपक सावंत ....

खूप प्रमाणपत्रे प्रलंबित आहेत. माझ्या माहितीप्रमाणे 11668 अर्ज प्राप्त झाले होते, त्यापैकी 6391 प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली होती, 2211 व्यक्तिंना प्रमाणपत्रे नाकारण्यात आली होती. उर्वरित प्रमाणपत्रे प्रलंबित होती असे सांगण्यात आले होते. आपल्याला सांगितल्याप्रमाणे सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दर 15 दिवसांनी ड्राईव्ह घेतला जाईल. अपंग तेथपर्यंत येऊ शकत नाहीत म्हणून त्यांना शासकीय गाड्यांतून तेथपर्यंत आणले जाईल, त्यांना एक दिवसात प्रमाणपत्र दिले जाईल आणि त्यांना पुन्हा त्यांच्या घरी सोडले जाईल, अशी व्यवस्था 15 ऑगस्टनंतर सुरू करणार आहोत. संपूर्ण राज्यभर असा ड्राईव्ह घेऊन अपंगांची जितकी प्रमाणपत्रे आहेत, त्या सर्व अपंगांना प्रमाणपत्रे देण्याचा आमचा प्रयत्न राहील. 15 ऑगस्टच्या नंतरच्या आठवड्यामध्ये प्रमाणपत्र वितरित करण्याचा कार्यक्रम करणार आहोत. (अडथळा)

तालिका सभापती : माननीय मंत्र्यांना उत्तर देऊ द्यावे.

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, रूरल हॉस्पिटलमध्ये असा ड्राईव्ह घेण्यात यावा.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांची तशी सूचना असेल तर त्याप्रमाणे व्यवस्था करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. परंतु सर्व रूरल हॉस्पिटलमध्ये अशी व्यवस्था होऊ शकत नाही. कारण संगणकीकृत प्रमाणपत्र आहेत, ते देताना सर्जन किंवा इतर स्पेशालिस्ट असावे लागतात आणि ते सिव्हिल हॉस्पिटलमध्येच असतात. त्यामुळे रूरल हॉस्पिटलमध्ये हे शक्य होऊ शकत नाही. कोणी फिजिकली हँडीकॅप्ड असतात, कोणाला व्हिजन दोष असतात, कोणाला हिअरिंग लॉस असतात, कोणी मेंटली रिटार्डेड असतात. त्यामुळे त्यासाठीचे वेगवगळे स्पेशालिस्ट हे केवळ सिव्हिल हॉस्पिटलमध्येच मिळू शकतात. त्यामुळे 15 ऑगस्टनंतर हा ड्राईव्ह प्रस्तावित केला आहे. सन्माननीय सदस्यांचा प्रतिपूर्तीचाही प्रश्न होता. मी त्या संदर्भात सांगू इच्छितो की, प्रतिपूर्तीच्या 110 प्रस्तावांची तपासणी सुरू आहे. ते प्रस्ताव लवकरात लवकर निकाली काढणार आहोत. पुढील 3 महिन्यांत माझ्याकडे तक्रार करण्यासाठी आपल्याकडे जागा राहणार नाही की प्रतिपूर्तीसाठीचे अर्ज प्रलंबित आहेत. सन्माननीय सदस्यांचा फिर्यादीच्या तक्रारीच्या प्रतीचा प्रश्न

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. दीपक सावंत ....

आहे. सुरक्षा रक्षकाच्या डोक्यामध्ये नातेवाईकाच्या रिलेटिव्हने डबा मारला आणि त्यामुळे हा सर्व प्रकार झाला आहे. मी फिर्यादीची एफआयआरची प्रत आपल्याकडे पाठवितो. मी याबाबतीत देखील आपले समाधान करीन असे मला वाटते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सीटी स्कॅन मशिनबाबत सांगितले. मराठवाडा प्लस या योजनेच्या अंतर्गत सन्माननीय सदस्यांच्या जिल्ह्यात सीटी स्कॅन मशिन देण्याचे प्रायोजित केले होते. आता सीटी स्कॅन मशिन बंद आहे अशी तक्रार केली होती. हे खरे आहे. त्या मशिनसाठीचा अडीच लाख रुपयांचा पार्ट फॉरेन कंट्रीमधून येत आहे. तोशिबा कंपनीचे ते मशिन आहे. मी बीड येथील हॉस्पिटलला भेट दिली, त्यावेळी माझ्या हे लक्षात आले, मी ताबडतोब सूचना दिल्या. येणाऱ्या एक महिन्यात हा पार्ट आल्यानंतर निश्चितच सीटी स्कॅन मशिन सुरू होईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला. आपण विप्रो व जीई कंपनीसोबत करार केलेला होता. कराराच्या संदर्भात आमच्या बैठका सुरू आहेत. बैठकांतून आता या संदर्भात काय करायचे हे ठरत आहे. मागच्या शासनाने या संदर्भातील करार केला होता आणि त्यांना दोन वर्षांची मूदत दिली होती. 2 वर्षांत त्यांनी 23 जिल्ह्यांत एकाही ठिकाणी कुठेही सीटी स्कॅन मशिन इन्स्टॉल केलेली नाही. त्यामुळे या कराराच्या संदर्भात गेल्या आठवड्यात बैठक झाली. हा प्रश्न फक्त बीड जिल्ह्यापुरता मर्यादित नाही तर सर्व राज्यभरासाठी पूर्वीच्या शासनाने करार केला होता. तो करार संपुष्टात आणायचा की ते खरोखर करणार आहेत हे विचारण्यासाठी कंपन्यांच्या फॉरेनच्या लोकांना बोलाविले आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी देखील यामध्ये हस्तक्षेप केला आहे. आमची धारणा आहे की, आम्ही पुढील दीड वर्षांत संपूर्ण 23 जिल्ह्यांत सीटी स्कॅन मशिन इन्स्टॉल करण्याचा प्रयत्न करू

श्री. हेमंत टकले : सभापती कहोदय, सन्माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून अतिशय चांगला व महत्त्वाचा प्रश्न सभागृहात उपस्थित केला आहे. सर्व गोष्टींमध्ये बोलता येण्यासारखे, विचारता येण्यासारखे खूप आहे. परंतु मी त्याकडे जात नाही. अपंगत्वाचे प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया आहे. आता माननीय मंत्र्यांनी त्यांच्या उत्तरात बऱ्यापैकी माहिती सभागृहाला दिली

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. हेमंत टकले ....

आहे. परंतु त्यामधून एक गोष्ट अधिक स्पष्ट होण्याची गरज आहे. संगणकीकृत प्रणाली वगैरे सर्व गोष्टी पाहिजेतच आणि त्या आवश्यकच आहेत. परंतु ह्यूमन एलिमेंट आहे. सिव्हिल हॉस्पिटलमध्ये अंध, मतिमंद, कर्णबधीर किंवा इतर कोणत्याही अपंगत्वाचे रूग्ण येतात. डॉक्टरांचे मत आहे, अपंगत्व किती टक्के आहे याचे प्रमाण प्रमाणपत्रात नमूद केलेले असते. हा भाग क्रिटिकल फॅक्टर, इनपूट आहे. त्यामुळे यामध्ये चुकीचे व्यवहार होण्याची शक्यता आहे. कार्यरत मंडळी काही तरी दुसऱ्या मार्गाने, अधिकचे काही तरी घेऊन प्रमाणपत्र देऊ शकतात. आपण हे नाकारू शकणार नाही. मी अंधाच्या क्षेत्रात काम करतो म्हणून मला हे माहीत आहे. रिव्हर्सेबल ब्लायंडनेस व इरिव्हर्सेबल ब्लायंडनेस असे दोन प्रकारचे अंधत्व असते. हायपोथेटिकली इरिव्हर्सेबल ब्लायंडनेस असलेल्या अपंग व्यक्तिना प्रमाणपत्र पुन्हा पुन्हा रिन्यू करण्याची गरज का पडावी, त्याला ते कायमस्वरूपी का देण्यात येऊ नये ? आपण त्यातील तांत्रिक भागाची तपासणी करून हे केले पाहिजे. पुन्हा रिन्यूअल येण्यामुळे त्यांची संख्या वाढत जाते. आधारकार्ड एकदाच घ्यावे लागते. अपंगत्वाच्या बाबतीत उपाय थकलेले आहे, अपंगात्वावर पुढे काही होण्याची शक्यता आहे असे नाही, पर्मनन्ट डिसॲबिलिटी अशांसाठी ज्याचे रिन्यूअल करण्याची आवश्यकता नाही काही वेगळे कार्ड करता येईल का हे पाहिले पाहिजे. त्यामुळे यावरचा भार कमी होऊ शकेल आणि यामधील पळवाटा सुध्दा बंद करण्यासाठी मदत होईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न बरोबर आहे. पर्मनन्ट डेफिशिअन्सी असते त्यांच्यासाठी वेगळे प्रमाणपत्र केले पाहिजे आणि रिव्हर्सेबलसाठी वेगळे प्रमाणपत्र केले पाहिजे अशी सूचना केली आहे. काही डिसॲबिलिटी सर्जरीनंतर करेक्ट होऊ शकतात. त्यामुळे 5 वर्षांचे प्रमाणपत्र देण्यात येते. व्हिजन एरर, रेटिना डिटॅचमेंट असते. कॉर्निआ ट्रान्सप्लँट करून एखाद्याची नजर येऊ शकते त्यासाठी आपण हा रिझर्व्ह ठेवला आहे. एकदा प्रमाणपत्र दिले की, ती व्यक्ती त्यांच्यासाठीच्या सर्व सुखसोयींना पात्र ठरते. ऑनलाईन केल्यानंतर, डेटा कॉम्प्युटरमध्ये फिड केल्यानंतर पर्सनल एरर असू शकतो. काही सहानुभूती असेल किंवा विशेष प्रयोजन केले तर चुकीचे प्रमाणपत्र देण्यात येऊ शकते ही गोष्ट खरी आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. दीपक सावंत ....

त्यासाठी आपण संगणकीकृत प्रमाणपत्र देण्याचे ठरविले आहे. प्रत्येक वेळी फॅकल्टीचा स्पेशालिस्ट असेलच असे नाही. त्यामुळे आपण हा ड्राईव्ह घेत आहोत. आपली गोष्ट बरोबर आहे. काही बाबतीत आपल्याला आणखी काही सुधारणा करता येतील यावर विचार करणे आवश्यक आहे आणि तशी विचारप्रक्रिया सुरू आहे. निश्चित यामध्ये भ्रष्टाचार होणार नाही, सर्वमान्य व उत्तम तोडगा निघेल या संदर्भात प्रणाली करण्याचा प्रयत्न करीत आहोत. आताचे सॉफ्टवेअर बदली करायचे असेल तर तरी देखील त्यासाठी आमची तयारी आहे. मात्र ते फूलप्रूफ व्हावे, कोणीही गैरफायदा घेऊ नये असे माझे देखील वैयक्तिक मत आहे. सन्माननीय सदस्यांनी बीड जिल्ह्यातील अनेक प्रश्न मांडले. आज प्रधान सचिव महोदयाच्या अध्यक्षतेखाली एक समिती करून बीडच्या संपूर्ण कारभाराची चौकशी करून याबाबत निर्णय घेण्यात येईल. दोषी असतील त्यांना कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही, कोणीही राजकीय हस्तक्षेप करू शकणार नाही असे मी सभागृहाला आश्वासित करतो. निःपक्षपातीपणे चौकशी करून याचा अहवाल पुढील अधिवेशनात सभागृहात सादर करण्यात येईल.

श्री. महादेव जानकर : सभापती महोदय, राज्यातील रुग्णालयांमध्ये कुत्रा चावल्यानंतर त्यावरील उपचारासाठी देण्यात येणाऱ्या रेबीज लसीची कमतरता आहे.

(नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका स्भापती (श्री.रामनाथ मोते) : या लक्षवेधी सूचनेवरील चर्चा संपेपर्यंत सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

श्री.महादेव जानकर : सभापती महोदय, रेबिज लसची उपलब्धता प्रत्येक ठिकाणी होत नाही. मला असा अनुभव आला आहे की, परदेशी बनावटीचे एक इंजेक्शन घेतल्यानंतर माझा प्रश्न सुटला. म्हणून मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, ग्रामीण भागातील प्रत्येक शासकीय रुग्णालयात, प्राथमिक आरोग्य केंद्रात परदेशी बनावटीचे इंजेक्शन उपलब्ध करावे. अशा प्रकारची कार्यवाही शासन करणार आहे का ?

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी स्वानुभवावरुन हा प्रश्न उपस्थित केला आहे. मी त्यांना आपल्या माध्यमातून सांगू इच्छितो की, रेबिजची नॉर्मल लस संपूर्ण महाराष्ट्रात उपलब्ध आहे. सिव्हिल हॉस्पिटल, वैद्यकीय महाविद्यालय या ठिकाणी ही लस उपलब्ध आहे. मात्र, सन्माननीय सदस्यांना ह्युमन ॲलबुमिनची आवश्यकता होती. कारण, त्यांना मल्टिपल बाईटस् होते, खूप ठिकाणी कुत्रा चावला होता. ह्युमन ॲलबुमिन काही ठिकाणीच उपलब्ध आहे. तथापि, सिव्हील हॉस्पिटलसह प्रमुख ठिकाणी आणि ग्रामीण भागात देखील ते उपलब्ध होण्यासाठी आम्ही प्रयत्न करु.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेचा विषय मी थोडा जनरलाईज करीत आहे.

सभापती महोदय, अपंग व्यक्तिना अपंगत्वाचे प्रमाणपत्र दिले जाते. ते दिले जात असताना जिल्हा शल्य चिकित्सकांच्या माध्यमातून अनेक प्रकारचे घोटाळे होत असतात, हे सर्वश्रुत आहे. हे घोटाळे थांबविण्यासाठी आपण योग्य उपाययोजना करणार का ?

सभापती महोदय, प्रतिपूर्तीची प्रकरणे जिल्हा शल्य चिकित्सकांकडे जात असतात. त्यामध्ये पारदर्शकता आणण्याची आवश्यकता आहे. याबाबत शासन प्रयत्न करणार आहे का ?

तालिका सभापती : या दोन्ही प्रश्नांची उत्तरे मंत्री महोदयांनी यापूर्वीच दिलेली आहेत.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, गरीब रुग्णांना खाजगी केंद्रांमधून सिटी स्कॅन करुन घेण्याचा खर्च परवडत नाही. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्याच्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये तसेच ग्रामीण भागातील रुग्णालयांमध्ये सिटी स्कॅन मशिन उपलब्ध करणार का ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या पहिल्या दोन प्रश्नांची उत्तरे मी यापूर्वीच दिलेली आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी गरीब रुग्णांसाठी सिटी स्कॅनची सुविधा उपलब्ध करुन देण्याचा प्रश्नही विचारला आहे. राज्यात बी.पी.एल.मधील लोकांना जर खाजगी केंद्रांमधून सिटी स्कॅन करुन आणण्यास सांगितले गेले तर त्याची प्रतिपूर्ती राज्य शासनाकडून करण्यात येत असते. राज्य शासनाने काही खाजगी केंद्रांशी टायअप केलेले आहे. बीडमध्ये किंवा अनेक जिल्ह्यांमध्ये ही परिस्थिती आहे. गरीब रुग्णांना सिटी स्कॅनचा खर्च परवडत नसल्यामुळे बी.पी.एल.च्या लोकांना या खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात येत असते.

सभापती महोदय, राज्यभरात 23 ठिकाणी आपण सिटी स्कॅन मशिन देण्याचा प्रयत्न करणार आहोत. येत्या दीड ते दोन वर्षात याची पूर्तता होईल, असा मला विश्वास आहे.

तालिका सभापती : मला या निमित्ताने मंत्री महोदयांच्या एक बाब लक्षात आणून द्यावयाची आहे. शैक्षणिक संस्थांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय प्रतिपूर्तीची प्रकरणे जिल्हा शल्य चिकित्सकांकडे पाठविली जातात. परंतु, त्या कार्यालयात ती प्रलंबित राहतात व त्यामुळे चार ते सहा महिन्यांपर्यंत संबंधितांना प्रतिपूर्ती मिळत नाही. आजाराची पडताळणी करुन आजाराचे प्रमाणपत्र प्रमाणित करण्यासाठी शासकीय यादीतील आजार आहे किंवा नाही, याबाबतची तपासणी जिल्हा शल्य चिकित्सकांकडून करण्यात येत असते. साधारणपणे एक महिन्याच्या आत ही पडताळणी पूर्ण होऊन प्रमाणित प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही व्हावी, अशी अपेक्षा आहे. प्रकरण मान्य किंवा अमान्य करण्याचा अधिकार त्यांना आहे. परंतु, ही सर्व कार्यवाही एक महिन्याच्या आत पूर्ण झाली पाहिजे, अशा प्रकारच्या सूचना आपण संबंधितांना देणार आहात का ?

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आपण जी मागणी केली आहे, त्याप्रमाणे निश्चितपणे संबंधितांना सूचना देण्यात येतील. साधारणपणे एक ते तीन महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी कोणत्याही प्रतिपूर्तीची प्रकरणे प्रलंबित राहणार नाहीत, याची मी आपल्याला खात्री देतो.

तालिका सभापती : सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पुन्हा सुरु होईल.

(सभागृहाची बैठक दुपारी 11.34 ते 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

यानंतर श्री.बोरले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

सभागृहाच्या कामकाजासंबंधी

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मी एक महत्वाचा मुद्दा उपस्थित करु इच्छितो. मागील आठवड्यात म.वि.प. नियम 260 अन्वये विरोधी पक्षातर्फे प्रस्ताव देण्यात आला होता. काल त्याच विषयाच्या प्रस्तावावरील चर्चेला मुख्यमंत्री महोदयांनी विधानसभेत उत्तर दिले. काल सायंकाळी या सभागृहात विरोधी पक्षातर्फे देण्यात आलेल्या प्रस्तावावरील चर्चेचे उत्तर अपेक्षित होते. परंतु, काल मुख्यमंत्री महोदय या सभागृहात येऊ न शकल्यामुळे आपण सभागृह स्थगित केले. त्यामुळे प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर या प्रस्तावावरील चर्चा सुरु करावी आणि मुख्यमंत्री महोदयांचे उत्तर व्हावे व त्याप्रमाणे कामकाजाचा क्रम बदलण्यात यावा, हा एक भाग आहे.

सभापती : मुख्यमंत्री महोदयांना तशा सूचना देण्यात आलेल्या आहेत. थोड्या वेळात आपल्याला त्यांची वेळ कळेल.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मी आणखी एक महत्वाचा मुद्दा मांडू इच्छितो. ती घटनात्मक बाब आहे. प्रश्नोत्तराच्या तासाचे गांभीर्य आहे, याची मला जाणीव आहे. कदाचित, यामध्ये प्रश्नोत्तराचा वेळ वाया गेला तर आपण तोही वाढवून द्यावा. परंतु, काल मुंबईच्या महापौरांनी देशाच्या माननीय पंतप्रधानांना हिटलर म्हणून संबोधले आहे. माननीय पंतप्रधानांचे पद हे घटनात्मक पद आहे. माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी आणि तत्कालीन पंतप्रधान हे देशाचे प्रमुख आहेत. भारताच्या पंतप्रधानांची देश विदेशात एक वेगळी प्रतिमा आहे. अशा वेळी त्यांना अशा प्रकारे संबोधणे योग्य नाही, ते अनुचित आहे, अशीच आमची भावना आहे. हा सभागृहातील चर्चेचा विषय एवढ्यासाठीच आहे की, हे सार्वभौम सभागृह आहे. आपण घटनेनुसार सभागृहात बसलेलो आहोत आणि त्यानुसार चर्चा होते. घटनात्मक पदाच्या बाबतीत जे वक्तव्य केले गेले आहे ते निषेधार्ह आहे. राज्य शासनाच्या वतीने या संदर्भातील भूमिका स्पष्ट व्हावी, अशी माझी मागणी आहे.

सभापती : ठीक आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे साहेबांनी सांगितले की, शेतकऱ्यांची कर्जमाफी आणि कर्जमुक्ती या विषयावर सभागृहात चर्चा सुरु आहे. आपण या विषयावर जवळपास साडेतीन दिवस सभागृहाचे कामकाज बंद पाडले होते. विधानसभेत उत्तर झाल्यानंतर त्याच दिवशी विधानपरिषदेत उत्तर झाले पाहिजे, अशी प्रथा आहे. या सभागृहाचा अपमान होतो की, प्रस्तावावरील चर्चेचे उत्तर त्याच दिवशी दिले गेले पाहिजे. तसेच, सभागृहातील कामकाजाचा क्रम ठरविण्याबाबत आपण आपल्या कार्यालयाला सूचना दिल्या पाहिजेत की, कशा प्रकारे चर्चा व्हावयास पाहिजे. माझे म्हणणे आहे की, प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर ताबडतोब प्रस्तावावरील चर्चेच्या उत्तराचा क्रम यावयास पाहिजे. मी काल देखील हा मुद्दा मांडला होता की, कर्जमाफीच्या प्रस्तावावरील चर्चा ताबडतोब व्हावयास पाहिजे. विधानसभेत याच विषयावरील प्रस्तावावरील चर्चेचे उत्तर झालेले आहे. वर्तमानपत्रात बातम्या छापून आलेल्या आहेत. त्यामुळे याचे गांभीर्य निघून गेलेले आहे. मग आता विधानपरिषदेत कोणते उत्तर येणार आहे ? त्याला काही अर्थच राहिलेला नाही आणि पुन्हा याची पुरावृत्ती होऊ नये याची काळजी घेण्यात यावी, अशी मी विनंती करतो.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, खऱ्या अर्थाने विधानसभेत मुख्यमंत्री महोदय उत्तर देतात आणि विधानपरिषदेत सभागृहाचे नेते उत्तर देतात, अशी प्रथा आता पर्यंत चालत आलेली आहे. आपण अपेक्षा केली की, या सभागृहात देखील मुख्यमंत्री महोदयांनीच उत्तर दिले पाहिजे. काल विधानसभेत मुख्यमंत्री महोदयांचे उत्तर झाल्यानंतर ते विधानपरिषदेत उत्तर देण्यासाठी येणार होते. आपणही म्हटले की, आपण त्यांचे उत्तर ऐकून घेऊ. परंतु, समोरच्या सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, आता आम्हाला उत्तर ऐकावयाचे नाही. आता आपण सभागृह स्थगित करावे. सभागृह स्थगित करावे असे म्हटल्यानंतर सभागृह स्थगित झाले होते. आपल्याला याची माहिती आहे. म्हणून आपण जो शब्द प्रयोग केला त्यामध्ये मी सुधारणा करते की, ते आले नाहीत किंवा त्यांना उशीर झाला, असे म्हणण्यापेक्षा आपण सभागृह स्थगित केले होते, हे आपण मान्य करावे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवर उभे राहून एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करतात.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती : आपण विषय वाढवू नये. मी सांगू इच्छितो की, मी काल मुख्यमंत्री महोदयांच्या संपर्कात होतो. त्यांनी विधानसभेत दोन तास उत्तर दिल्यानंतर माझ्या कार्यालयाला असा निरोप मिळाला की, त्यांना घशाचा त्रास असेल त्यामुळे त्यांना विश्रांतीची गरज आहे. म्हणून ते काल विधानपरिषदेत आले नाहीत. आपण आता यावर सभागृहाचा जास्त वेळ न घालविता प्रश्नोत्तरे सुरु करु

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी सांगितले की, ज्या दिवशी चर्चा झाली त्याच दिवशी उत्तर व्हावयास पाहिजे. आम्ही काल या प्रस्तावावरील चर्चा थोडी लांबविली. माननीय मुख्यमंत्री सभागृहात येतील, आपण त्यांच्या वेळेनुसार थोडी ॲडजेस्टमेंट केली पाहिजे या दृष्टीने आम्ही थोडी चर्चा लांबविली. मुख्यमंत्री महोदय दुपारी 3.00 वाजता विधानसभेत आणि दुपारी 4.00 वाजता विधानपरिषदेत उत्तर देतील, असे ठरले होते. मुख्यमंत्री महोदयांना एकाच वेळी दोन्ही सभागृहात उत्तर द्यावे लागणार होते म्हणून ते या सभागृहात आले नाहीत, असे नाही. आम्ही कोठेही असे म्हटलेले नाही की, आज उत्तर देऊ नये. म्हणून सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी जे सांगितले ते कामकाजातून काढले पाहिजे. ज्या दिवशी चर्चा होईल त्याच दिवशी मंत्री महोदयांचे उत्तर अपेक्षित आहे. यापुढे तशी काळजी घेण्यात यावी, अशी माझी विनंती आहे.

सभापती : ठीक आहे, मी कालचे कामकाज बघतो, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस काय म्हणाल्या हे देखील बघतो आणि जे अयोग्य असेल ते कामकाजातून काढून टाकतो. आता आपण प्रश्नोत्तरे घेऊ.

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

ढेबेवाडी (ता. पाटण, जि. सातारा) येथील महिंद धरण गाळाने भरल्याने धरणाच्या पाण्यात झालेली घट

(१) * ७७७० श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.जयंत पाटील, श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ढेबेवाडी (ता. पाटण, जि. सातारा) येथील महिंद धरण गाळाने भरल्याने धरणाच्या पाण्यात मोठ्या प्रमाणात घट झाली असून परिसर झाडाझुडपांनी व्यापला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार धरणातील गाळ काढणेबाबत व झाडाझुडपांनी व्यापलेला परिसर मोकळा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन : (१) हे अंशतः खरे आहे.

धरणावर झाडेझुडपे आहे ही वस्तुस्थिती आहे. धरण बांधल्यानंतर त्यामध्ये कालमानानुसार गाळ येतो व त्यासाठी अचल साठ्याची तरतूद केलेली असते. महिंद तलावाचा उपयुक्त पाणीसाठा ७०.०० दलघफू असून त्यामध्ये गाळाबाबत सर्वेक्षण झालेले नाही. तसेच उपयुक्त पाणीसाठयात गाळ असल्याचे आढळले नाही.

(२) संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी प्रकल्पाची पाहणी केली आहे.

(३)३पाहणी दरम्यान धरणावर झाडेझुडपे वाढत्याचे निदर्शनास आले आहे. सद्यःस्थितीत धरणाच्या भरावावरील झ ाडे झुडपे काढण्याची कार्यवाही सुरु आहे.

मात्र धरणातील साचलेला गाळ संपुर्णपणे काढणे हे सद्यस्थितीत आर्थिक दृष्टया अव्यवहार्य आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.नरेंद्र पाटील : सभापती महोदय, पाटण तालुक्यातील ढेबेवारी परिसरात महिंद धरण आहे. या धरणाची सुरुवात 2000 मध्ये झालेली आहे. 2.40 क्युबिक मिली मिटरचे हे धरण असून परंतु, आज 15 वर्षानंतर तेथील परिस्थिती खूप बदलली आहे. त्या धरणाच्या बाजूला मोठ्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7770.....

श्री.नरेंद्र पाटील.....

प्रमाणावर डोंगरी भाग आहे. त्यामुळे धरणात मोठ्या प्रमाणावर गाळ साचलेला आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, धरणातील गाळ काढण्यासाठी कोणती तरतूद करण्यात येणार आहे ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर लिकेजचा प्रॉब्लेम होतो. मी मागील तीन वर्षापासून लिकेज काढण्यासाठी पत्रव्यवहार करीत आहे. परंतु, अद्याप लिकेज काढण्यात आलेले नाही. आपण त्यासाठी कोणती तरतूद करणार आहात ? माझा तिसरा प्रश्न असा आहे की, डोंगरावरून धरणात गाळ वाहून येऊ नये यासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात येणार आहेत ?

श्री.विजय शिवतारे : सभापती महोदय, महिंद धरण 85 एमसीएफटीचे छोटे धरण आहे. सन 2000 मध्ये या धरणाची घळ भरणी झालेली आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, त्या धरणात मोठ्या प्रमाणावर गाळ साचलेला आहे. परंतु, ते खरे नाही. साधारणतः 3 हेक्टर प्रती मीटर, प्रती 100 किलो मीटर, प्रती वर्ष असे गाळाचे प्रमाण असते. ते डिझाईनमध्येच दर्शविलेले असते आणि त्याचे आयुष्यमान 60 वर्षे इतके आहे. छोट्या लघु पाटबंधारे तलावात किंवा इतर तलावात गाळ किती साचलेला आहे आणि त्याची मोजमाप करण्याची प्रथा विभागामध्ये नाही. एक मात्र खरे आहे की, तेथील बांधावर बऱ्याच प्रकारची झाडेझुडपे आहेत. तो डोंगराळ भाग आहे. तेथे मोठ्या प्रमाणावर पाऊस पडत असतो. तेथे जी मोठी झाडेझुडपे होती, ती काढून टाकण्यात आलेली आहेत. या धरणात गाळाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात नाही. आपण महात्मा फुले अभियानातून डिझेलसाठी पैसे देतो आणि त्या माध्यमातून गाळ काढतो. तशा प्रकारे किंवा सीएसआरमधून किंवा लोक सहभागातून गाळ काढण्याचा प्रयत्न केला जाईल.

यानंतर श्री.खर्चे वि.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7770...

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, तारांकित प्रश्नाच्या उत्तरात महिंद तलावाचा उपयुक्त पाणीसाठा 70.00 दलघफू असून त्यामध्ये गाळाबाबत सर्वेक्षण झालेले नाही, तसेच उपयुक्त पाणीसाठ्यात गाळ असल्याचे आढळले नाही, असे नमूद केले आहे. सर्वेक्षण झाले नाही तर गाळ नसल्याचे कसे काय आढळून आले आहे. हे उत्तर कशाच्या आधारे देण्यात आले आहे. प्रकल्पाच्या नियोजनामध्ये अनेक वेळा अशी बाब असते की, यामध्ये या तलावाचा अचलसाठा किती असावा वगैरे वगैरे, याबाबत सर्वेक्षण केले नाही. छोटे तलाव असल्यामुळे यासंदर्भातील सविस्तर माहिती आपण घेत नाही. सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांचा प्रश्न विचारण्याचा हेतू असा होता की, तलावातील उपयुक्त जलसाठ्याचा वापर त्या परिसरातील शेतकऱ्यांना होण्याच्या दृष्टीकोनातून जेवढा जलसाठा सुरुवातीला अपेक्षित होता तेवढा जलसाठा राहिला तर त्याचा शेतकऱ्यांना फायदा होईल. मंत्री महोदयांनी तोंडी उत्तरात सांगितले की, महात्मा फुले अभियानाअंतर्गत किंवा विभागाकडे मशिनरी आहे, त्यांना डिझेलचा पुरवठा करून गाळ काढण्याचे काम करता येईल. हे लेखी उत्तरात आले असते तर लेखी प्रश्न विचारण्याची वेळ आली नसती. लेखी उत्तर देताना ही त्रुटी राहिलेली आहे, एकाबाजुला सर्वेक्षण झाले नाही आणि गाळ नसल्याचे सांगितले जाते या दोन्हीबाबत विसंगती दिसून येत आहे. यापुढे अशी विसंगती होणार नाही याची खबरदारी मंत्री महोदय घेतील काय ?

श्री.विजय शिवतारे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे हे स्वत: जलसंपदा खात्याचे मंत्री होते, तलावाच्या डिझाईनमध्ये अपेक्षित गाळ किती असेल याचे मोजमाप तंत्र व तलावाचे आयुष्यमान ठरलेले असते. 2010 मध्ये हे धरण तयार झाले आहे, त्यामध्ये अपेक्षित पाणीसाठा उपलब्ध आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, अगोदरच तसे उत्तर दिले असते तर बरे झाले असते मग सन्माननीय सदस्यांनी प्रश्न कसे विचारले असते. प्रश्न विचारण्यास संधी असावी म्हणून तसे करण्यात आले आहे.

सभापती : मंत्री महोदयांनी पुढील काळात योग्य ती काळजी घ्यावी.

श्री.विजय शिवतारे : सभापती महोदय, होय.

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7770...

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, तारांकित प्रश्नांच्या लेखी उत्तरात मंत्री महोदयांनी या धरणातील साचलेला गाळ संपूर्णपणे काढणे हे सद्यस्थितीत आर्थिकदृष्ट्या अव्यवहार्य आहे, असे नमूद केले आहे. जी धरणे बांधण्यात येतात त्यांचे आयुर्मान ठरलेले आहे. त्या धरणात काही दिवसांनी गाळ होणार हे गृहीत धरलेले आहे. गाळ काढण्यासाठी राज्य शासन काही आर्थिक तरतूद करण्यासाठी नवीन हेड तयार करणार आहे काय ? पाटण तालुक्यातील हा डोंगराळ भाग आहे, तेथील लोकांना रोजगार मिळत नाही, या भागातील बरेच लोक माथाडी कामगार म्हणून काम करण्यासाठी मुंबईत येतात. गाळ काढण्याचे काम रोजगार हमी योजनेतून करण्यात यावे. तेथील लोकांना काम मिळावे यासाठी राज्य शासन आजुबाजूच्या खेड्यामध्ये प्रबोधन करणार आहे काय ?

श्री.विजय शिवतारे : सभापती महोदय, तलावातील किंवा धरणातील गाळ काढण्यासाठी जो खर्च येतो, तो व्यवहार्य नाही हे सूर्य प्रकाशाइतके सत्य आहे, हे सर्वांना माहीत आहे. यासाठी किती खर्च येईल त्यासंदर्भातील आकडा आता माझ्याकडे नाही. परंतु हा खर्च व्यवहार्य नाही, गाळ काढण्यापेक्षा एखादा नवीन प्रकल्प त्यामध्ये होऊ शकतो.

सभापती : गाळ काढून तो कोठे टाकवा हा प्रश्न निर्माण होतो. त्यानंतर तो गाळ डिस्पोजल कसा करावा हा देखील प्रश्न उभा राहतो.

श्री.विजय शिवतारे : ही सर्व कामे करण्यासाठी जास्त रक्कम लागते, म्हणून संपूर्ण महाराष्ट्रातील मोठ्या धरणांच्या संदर्भात हा प्रश्न निर्माण झालेले आहे, हे छोटे धरण आहे. या धरणाची घळभरणी सन 2010 मध्ये करण्यात आली आहे. या धरणात कमी प्रमाणात गाळ आलेला आहे, त्यामुळे तसे उत्तरात नमूद करण्यात आले आहे. पाण्याच्या उपयुक्त साठ्यामध्ये कोणताही फरक पडलेला नाही. महात्मा फुले अभियान, सीएसआर किंवा खाजगी व्यवस्थेतून गाळ काढण्याचे काम करण्यात येते.

श्री.नरेंद्र पाटील : सभापती महोदय, या धरणाच्या लिकेजमुळे तेथील पाणी मोठ्या प्रमाणात वाहून जाते, त्यासाठी तरतूद करून ते लिकेज थांबविण्याबाबत काही उपाययोजना करण्यात येणार आहे काय ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7770...

श्री.विजय शिवतारे : सभापती महोदय, माझ्या महितीप्रमाणे जे नॉर्मस् आहेत, त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल. परंतु सन्माननीय सदस्य सांगतात त्याप्रमाणे ही बाब सत्य आहे असे समजून या धरणाची पुन्हा पाहणी करुन त्यासंदर्भात योग्य त्या उपाययोजना करण्यात येतील.

सभापती : मंत्री महोदय, माझ्या अनुभवातून मी हे सांगत आहे, ज्या ठिकाणी जुने धरण आहे त्या ठिकाणी रेती मिश्रीत गाळ साठला आहे. त्यामुळे धरणातील पाण्याची कॅपेसिटी कमी झालेली आहे. कित्येक धरणात रेती व गाळ यांचे मिश्रण आहे. मागील सरकारने याबाबत काही धोरण ठरविले होते, त्या धोरणाचा आपण पाठपुरावा केला तर वरच्या बाजूने येणारा गाळ कमी होईल व पाण्याची साठवण क्षमता वाढेल. राज्यात वाळूबाबत जे प्रकार चालू आहेत याबाबत देखील काही फायदा होईल त्यामुळे मंत्री महोदयांनी याविषयी उचित विचार करावा अशी माझी आपणाला सूचना आहे.

श्री.विजय शिवतारे : सभापती महोदय, होय.

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

<u>तारांकित प्रश्न क्रमांक 8164 बाबत</u>

सभापती : माननीय मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांच्या आजीचे दु:खद निधन झाल्याचे त्यांनी मला पत्राद्वारे कळविले आहे. त्यामुळे तारांकित प्रश्न क्रमांक 8164 पुढे ढकलण्यात येत आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मंत्री महोदया उपस्थित नसतील तर राज्यमंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

सभापती : राज्यमंत्री देखील सभागृहात नाहीत.

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, राज्यमंत्री महोदयांची प्रकृती ठीक नसल्यामुळे ते सभागृहात येऊ शकले नाहीत.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, हा प्रश्न महत्वाचा असल्यामुळे तो उद्या चर्चेला घेण्यात यावा.

सभापती : माननीय मंत्री महोदया सभागृहात उपस्थित होतील त्या दिवशी या प्रश्नावर चर्चा घेण्यात येईल. आता आपण पुढील तारांकित प्रश्न चर्चेला घेऊ या.

....5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

हवेतील वाढत्या प्रदूषणामुळे मुंबईतील तसेच राज्यातील मुलांचे आरोग्य बिघडल्याबाबत

(३) * ६९१५ श्री.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.शरद रणपिसे, प्रा.जोगेन्द्र कवाडे :सन्माननीय सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहरातील वाढती बांधकामे, व्हेंटीलेशनचा अभाव, हवेतील प्रदूषण, वातावरणातील बदल व बदलत्या जीवन शैलीमुळे मुंबईत केलेल्या शालेय मुलांच्या पाहणीमध्ये १३ टक्के मुलांच्या फुफ्फुसांची कार्यक्षमता कमी असल्याची बाब ब्रेथ ब्ल्यू या संस्थेच्या निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच वरील कारणांमुळे राज्यातील ५ ते ११ वयोगटातील बालकांमध्ये दम्याचे विकार वाढत आहेत राज्यात ६ पैकी एका बालकाला अस्थमा असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील प्रकरणी शासनाने चौकशी केली असल्यास चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने शालेय विद्यार्थ्यांना वेळोवेळी मोफत आरोग्य तपासणी व बालकांमध्ये वाढीस लागलेल्या फुफ्फुसांच्या आजारांना आळा घालण्यासाठी व त्यांना औषधोपचार मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) अंशतः खरे आहे.

इंटरनेटच्या माध्यमातून शोध घेतला असता ब्रेथ ब्ल्यू सर्व्हेबाबत माहिती आढळून आली त्यामध्ये मुंबईमधील १३% मुलांमध्ये फुफ्फुसाची कार्यक्षमता कमी व १४% मुलांमध्ये फुफ्फुसाची कार्यक्षमता अतिशय कमी असल्याचे नमूद केले आहे.

(२) व (३) राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत सन २०१४-२०१५ मध्ये राज्यातील शालेय तपासणी मध्ये ६ ते १८ वर्षे वयोगटातील एकूण १,२२,३६,१२८ विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली असून, त्यापैकी १,१५,०५३ विद्यार्थी श्वसन संस्थेच्या विकाराने आजारी असल्याचे आढळून आले आहे. यापैकी १,१४,७१३ विद्यार्थ्यांवर औषधोपचार करण्यात आले असून उर्वरीत ३४० विद्यार्थ्यांना पुढील योग्य उपचारांसाठी वरीष्ठ रुग्णालयात संदर्भित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.अनंत गाडगीळ : मुंबई-पुणे ही शहरे दिवसेंदिवस वाढत असून त्यामध्ये मोठ्या प्रमाणात बांधकामे सुरु आहेत, त्याचप्रमाणे इतर गोष्टींमुळे प्रदूषणात वाढ होत आहे. जवळपास 30 टक्के लोकांना वेगवेगळ्या पध्दतीची ॲलर्जी होत आहे. एका सर्वेक्षणाच्या आकडेवारीनुसार 2003 मध्ये अडीच टक्के लहान मुलांना दम्याचे आजार सुरु झाल्याचे आढळून आले आहे. 2014 च्या सर्वेक्षणानुसार 10 टक्केपेक्षा जास्त मुलांना दमा व इतर श्वशनाचे आजार आढळून आले आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.6915...

श्री.अनंत गाडगीळ...

याची कारणे म्हणजे ओल्या भिंती व कारपेट अशी आहेत, ज्या प्रमाणे लहान मुलांना धोका आहे तशाच प्रकारे आमदारांना देखील धोका आहे, कारण नागपूर येथील विधिमंडळाचे सभागृह एक वर्षे बंद असते, बंद सभागृह व बंद खोल्या असतील तर दम्याचा आजार होऊ शकते असे देखील सर्वेक्षणातून निदर्शनास आले आहे. विशेषत: लहान मुलांना प्रोटेक्ट करण्याकरिता सरकार काय उपाययोजना करणार आहे असा माझा प्रश्न आहे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, हा प्रश्न पर्यावरण विभागाशी संबंधित आहे, आरोग्य मंत्री महोदय उत्तर देणार आहेत.

सभापती : माननीय मंत्री स्वत: डॉक्टर आहेत, अनुभवी आमदार म्हणून त्यांनी काम केलेले आहे. त्यांनी उत्तर देण्यास काही हरकत नाही. मंत्रिमंडळाची एकत्रित जबाबदारी असते हा देखील एक भाग यामध्ये महत्वाचा आहे. मंत्री महोदयांचे उत्तर ऐकल्यानंतर आपणाला काही शंका असेल तर आपण नंतर त्याबाबत प्रश्न विचारु शकता.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, हा प्रश्न पर्यावरण व आरोग्य या दोन्ही विभागाशी निगडीत आहे, आरोग्य खात्याच्या मर्यादेत राहून मी उत्तर देण्याचा प्रयत्न करतो. सन्माननीय सदस्य श्री.अनंत गाडगीळ यांनी इंटरनेटच्या माध्यमातून करण्यात आलेल्या सर्वेक्षणाच्या आधारे प्रश्न विचारला आहे. या सर्वेक्षणानुसार "Causes of poor lung function-prolonged exposure to environmental pollutants such as nitrogen dioxide, poor nutrition." अशा प्रकारे या सर्वेक्षणात नमूद केले आहे. मुंबई शहरापुरते बोलावयाचे असेल तर मुंबई महानगरपालिकेने जे सर्वेक्षण केले त्यानुसार 41 बालके दम्याच्या किंवा श्वसनाच्या विकाराने व्याधीग्रस्त आहेत. संपूर्ण राज्याचा विचार केला तर राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत 2014-15 मध्ये 6 ते 18 वर्षे या वयोगटातील एकूण 1,22,36,128 विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आलेली आहे. त्यापैकी 1,15,053 विद्यार्थी श्वसन संस्थेच्या विकाराने आजारी असल्याचे आढळून आले आहे. या विद्यार्थ्यांसाठी आरोग्य केंद्रात उपाययोजना करण्यात येत आहेत. 1,14,713 विद्यार्थ्यांना ट्रीटमेंट देण्यात आली आहे. देशामध्ये दिल्ली शहर सर्वात जास्त प्रदूषित आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.6915...

डॉ.दीपक सावंत...

त्यानंतर मुंबई, बंगलोर व कलकत्ता शहराचा क्रमांक लागतो. मुंबई शहराला चांगल्या प्रकारचे हवामान प्राप्त झाले आहे, कारण मुंबईच्या समुद्र किनाऱ्यावरुन जो वारा येतो तो सर्व आजार घेऊन जातो, ही मुंबईसाठी एक नैसर्गिक देणगी आहे, त्यामुळे मुंबईत या आजारांचे प्रमाण कमी आहे, मुंबई शहरातील वाहतुकीमुळे प्रदूषणाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे. कार्बनडाय ऑक्साईड व कार्बनडाय मोनोक्साईड हवेमध्ये जास्त प्रमाणात आहेत.

या नंतर श्री.भोगले..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.6915.....

डॉ.दीपक सावंत....

आपल्याकडील पुणे आणि मुंबई महानगरपालिकेकडे यावर ट्रिटमेंट करण्याची सुध्दा उपाययोजना आहे. माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला की, कार्पेटमधून पोल्यूटन्ट येते. त्यामुळे सर्दी, पडसे यासारखे विकार होतात. नागपूर येथील हिवाळी अधिवेशन संपल्यानंतर वर्षभर सभागृह बंद ठेवले जाते. काही अंशी हे खरे आहे की, एखादी वास्तू सहा ते आठ महिने बंद राहिली आणि आपण एक्स्पोजरला गेलो तर कोणालाही ॲलर्जी होऊ शकते. त्यामुळे राज्य शासनाने यावर उपाययोजना करण्यास सुरुवात केलेली आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, उत्तरामध्ये म्हटले आहे की, 13 टक्के मुलांमध्ये फुफ्फुसाची कार्यक्षमता कमी व 14 टक्के मुलांमध्ये फुफ्फुसाची कार्यक्षमता अतिशय कमी असल्याचे आढळून आले आहे. म्हणजे हे प्रमाण 27 टक्के इतके आहे. दूषित वातावरणामुळे हा परिणाम होत असेल तर त्यावर केवळ तात्पुरती उपाययोजना करून चालणार नाही. पर्यावरण आणि आरोग्य या दोन्ही विभागाच्या संयुक्त प्रयत्नातून या प्रश्नामध्ये लक्ष घालावे लागणार आहे. धक्कादायक गोष्ट अशी की, हा आजार एकदा जडला की तो आयुष्यभर पुरतो. आयुष्यभराच्या जीवनशैलीमध्ये हा रोग कायम अडचणीचा ठरू शकतो. त्यामुळे या संदर्भात उपाययोजना करणार आहात त्यामध्ये प्रिव्हेंटिव्ह आणि क्युरेटिव्ह गोष्टी किती आहेत? आजार झाला म्हणून औषध देणार आहात, परंतु आजार होऊ नये या दृष्टीने आरोग्य विभाग योजना राबविणार आहे काय?

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांना मी सांगू इच्छितो की, फुफ्फुसाची वाढ वयाच्या 25 वर्षापर्यंत होत असते. लहानपणी हळूहळू फुफ्फुसाची क्षमता वाढत असते. ॲलर्जीक अस्थमा किंवा श्वसनाच्या आजारावर उपाययोजना केली तर तो आटोक्यात येऊ शकतो. पूअर लंग फंक्शन किंवा विक लंग फंक्शन यामध्ये फरक आहे. फुफ्फुसाच्या कार्यक्षमतेमध्ये जशी वाढ होते तशा प्रकारे या गोष्टीवर नियंत्रण मिळविता येते. ॲलर्जीक अस्थमा असेल तर त्यापासून त्या व्यक्तीला दूर केले तर अस्थम्याचा ॲटॅक येऊ शकत नाही. लाईफलॉंग म्हटले तर त्यावर औषध उपाययोजना आहे. आपण मुंबई आणि पुणे महानगरपालिका क्षेत्रात, ग्रामीण भागात शाळकरी मुलांची तपासणी करण्याचे ठरविले आहे. बाल

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.6915.....

डॉ.दीपक सावंत.....

आरोग्य स्वास्थ्य शिबीर घेतले जाते त्यामधून जे विद्यार्थी अशा प्रकारे दिसून येतात त्यांच्या पालकांना सांगितले जाते. त्यांची ॲलर्जीक टेस्ट करण्याचे सूचित केले जाते. ती टेस्ट करुन कोणत्या गोष्टींची ॲलर्जीक होऊ शकतो त्याचा अभ्यास करुन पालकांना सूचना दिल्या जातात.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, आरोग्य खात्याच्या दृष्टीने या प्रश्नाला न्याय देण्याचा प्रयत्न मंत्री महोदय करीत आहेत. आकडेवारी देऊन शासन आपली पाठ थोपटून घेत आहे तसे करु नये. मुंबई सारख्या शहरात 13 टक्के मुलांमध्ये फुफ्फुसाची कार्यक्षमता कमी व 14 टक्के मुलांमध्ये फुफ्फुसाची कार्यक्षमता अतिशय कमी असल्याचे आढळून आले आहे. म्हणजे हे प्रमाण 27 टक्के इतके आहे. उत्तरात म्हटले आहे की, मुंबईमध्ये सर्वे केल्यानंतर 45 मुले बाधित असल्याचे आढळून आले. ही आकडेवारी कशी निष्पन्न झाली? आरोग्य विभाग जे काम करीत आहे त्याचे आम्ही स्वागत करतो. हा प्रश्न पर्यावरण विभागाशी संबंधित आहे. बालकांप्रमाणे वृध्द व्यक्तींचे सुध्दा अशाच प्रकारचे प्रश्न आहेत. वृध्द व्यक्ती आणि बालकांच्या फुफ्फुसामध्ये विकनेसच्या दृष्टीने फारसा फरक असू शकत नाही. मुंबई, पुणे व नागपूर या शहरात प्रचंड प्रमाणात प्रदूषण होत आहे. त्यावर कोणत्या उपाययोजना करणार आहात? त्यासाठी पर्यावरण मंत्री सभागृहात उपस्थित असणे अपेक्षित होते. शालेय विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली जाणार आहे. उत्तरात म्हटले आहे की, 340 विद्यार्थ्यांना पुढील योग्य उपचारासाठी वरिष्ठ रुग्णालयात संदर्भित करण्यात आले आहे. ही आकडेवारी थोडीशी भ्रामक किंवा फसवी वाटते. सत्य परिस्थिती पडताळून पाहण्यात येईल काय, त्याबाबत प्रिकॉशनरी मेजर घेणार आहात काय?

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, हिल फौंडेशन या संस्थेने इंटरनेटच्या माध्यमातून 2000 मुलांचा सर्व्हे केला. महाराष्ट्रामध्ये 1 कोटी आणि काही लाख बालके असून मुंबईमध्ये काही लाख बालके आहेत. 2000 मुलांचा सर्व्हे आणि कोटी मुलांचा सर्व्हे यात फरक निश्चित असू शकतो. सॅम्पल सर्व्हे आणि ॲक्चुअल फॅक्चुअल यामध्ये फरक असू शकतो. फसवी आकडेवारी देण्याचा राज्य शासनाचा मानस नाही. निश्चितपणे यामध्ये खोलवर जाऊन पर्यावरण व आरोग्य विभागाचे तज्ज्ञ, पिडियाट्रिशियन, ॲलर्जन स्पेशालिस्ट यांच्यामार्फत मुंबई पुण्याचे सर्वेक्षण केले जाईल.

...3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.6915.....

ॲड.राहुल नार्वेकर : सभापती महोदय, एअर पोल्यूशनच्या संदर्भात गेल्या महिन्यात टाईम्स ऑफ इंडिया या इंग्रजी दैनिक वृत्तपत्रामध्ये अर्धपानी लेख छापून आला होता. माझगाव परिसरात कोळसा अपलोड केला जातो, त्या ठिकाणी मोठया प्रमाणात एअर पोल्यूशन होत असल्यामुळे टी.बी.चे प्रमाण वाढत आहे. यावर नियंत्रण आणण्यासाठी काय करणार आहात? इरॉनिअस पॉलिसी मेकिंगची आवश्यकता असून अधिक लोकसंख्येची घनता असलेल्या भागातील कोल डेपो त्या ठिकाणाहून ट्रान्सफर केले जाणार आहेत काय?

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, या प्रश्नाचा पर्यावरण विभागाशी अधिक संबंध येतो. कोल डेपो ट्रान्सफर करण्याचे अधिकार पर्यावरण विभागाला आहेत. निश्चितपणे एमडीआर आणि एक्सडीआर टी.बी.चे प्रमाण मुंबईमध्ये वाढल्याचे पाहिल्यानंतर शासन याबाबत सजग आणि संवेदनशील असून निश्चितपणे अशा प्रकारच्या सूचना पर्यावरण खात्याला दिल्या जातील.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी सांगितले की, 2000 मुलांचा ब्रेथ ब्ल्यू सर्व्हे हिल फौंडेशन या संस्थेने केला होता. शासनाने या कामाला कमी लेखले आहे. उत्तरात म्हटले आहे की, मुंबईमध्ये 1,14,713 विद्यार्थी बाधित आहेत. त्यांच्यावर औषधोपचार केला गेला म्हणजे ते बाधित झालेले आहेत. ही छोटी गोष्ट नाही. आजार होऊ नये म्हणून काय उपाययोजना करणार आहात, आजार झाल्यावर काय उपाययोजना करणार आहात? शालेय विद्यार्थ्यांच्या फुफ्फुसाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी त्यांना व्यायामाचे प्रकार शिकविण्याचा प्रयत्न शासन करणार आहे काय?

नंतर एल.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.6915....

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी माझ्या उत्तरामध्ये सांगितले होते की, मुंबई महानगरपालिकेने ज्यावेळी सर्व्हे केला होता त्यावेळी त्यांना केवळ 41 विद्यार्थी दम्याच्या विकाराचे आढळले होते. ब्रॉंकॉयटीस, रनिंग नोज, कफ अँड कोल्ड, हे देखील श्वसनाचे आजार आहेत. ज्यावेळी एखाद्या विद्यार्थ्याला कफ, कोल्ड, फिव्हर असतो त्यावेळी त्याच्या वर्गातील इतर विद्यार्थ्यांना त्याचे इन्फेक्शन होते. त्यामुळे या संख्येत वाढ दिसते. मुंबई महानगरपालिकेच्या सर्व्हे नुसार दम्याचे 41 विद्यार्थी आढळलेले आहेत.

श्री.अनिल तटकरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांना माझा विवक्षित प्रश्न आहे. मघापासून येथे शालेय विद्यार्थ्यांची संख्या ऐकण्यात आलेली आहे. प्रत्यक्षामध्ये विद्यार्थ्यांची असलेली संख्या आणि त्यांची तपासणी करण्यासाठी असलेले डॉक्टर्स यामध्ये प्रचंड प्रमाणात तफावत आहे. त्यामुळे आपण डॉक्टरांची संख्या वाढविणार आहात काय ? हा संपूर्ण राज्याचा प्रश्न आहे. मागच्या आघाडी शासनाने अनेक ठिकाणी उप जिल्हा रुग्णालये बांधली होती. परंतु, आज आरोग्य यंत्रणा कोलमडली आहे. आमच्या रोह्यातील उप जिल्हा रुग्णालयाचे उदाहरण घ्यावे किंवा म्हसळासंबंधात आपल्या दालनामध्ये बैठक झाली होती, त्याचे उदाहरण घ्यावे. अलिबागच्या रुग्णालयाचे उदाहरण घ्यावे. या सगळ्या रुग्णालयांमध्ये डॉक्टरांची प्रचंड प्रमाणावर कमतरता आहे. हा आरोग्य खात्याचा प्रश्न असल्यामुळे मी आपणास विचारू इच्छितो की, डॉक्टरांची पदे भरण्यासंबंधी आपण कोणती कार्यवाही करणार आहात ? तसेच डॉक्टरांच्या भर्तीसाठी आपणाला किती प्रतिसाद मिळालेला आहे किंवा त्याबाबतीत शासनाची नेमकी भूमिका किंवा अडचणी काय आहेत हे आपण सभागृहात मोकळेपणाने सांगावे

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा प्रश्न अतिशय योग्य आहे, बरोबर आहे. मी सन्माननीय सदस्य श्री.अनिल तटकरे यांना माझ्या दालनात बैठकीसाठी बोलाविले आहे. बाल स्वास्थ्य आरोग्य कार्यक्रमांतर्गत शाळेत जाऊन विद्यार्थ्यांची तपासणी केली जाते हे सत्य आहे. त्यातूनच ही आकडेवारी आमच्या समोर आलेली आहे. निश्चितपणे राज्य शासन ही पदे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.6915...

डॉ.दीपक सावंत...

भरण्यासाठी प्रयत्नशील आहे. आज बालरोग तज्ज्ञ, फिजिशियन, कार्डिओलॉजिस्ट, या सर्व डॉक्टरांचा ओढा शहरी भागाकडे आहे. ग्रामीण भागामध्ये काम करण्यासाठी ते तयार नाहीत ही यातील फॅक्च्युअल गोष्ट आहे. त्यांना प्रायव्हेट प्रॅक्टीसमध्ये जास्त इंटरेस्ट आहे. त्यामुळे जास्तीत जास्त डॉक्टरांना आपल्याकडे कसे वळविता येईल यासाठी गेल्या सहा महिन्यांपासून मी प्रयत्न करीत आहे. त्यामध्ये थोडेफार यश मिळालेले आहे. आपल्या भागात देखील डॉक्टर पुरविण्याचे मी आश्वास देतो.

.....

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अकोला जिल्ह्यातील नेर-धामणा पाटबंधारे प्रकल्पांच्या अंदाजपत्रकाबाबत

(4) * ७८६३ श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटीलल:ल सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) अकोला जिल्ह्यातील नेर-धामणा पाटबंधारे प्रकल्पांच्या कामावर किती खर्च करण्यात आला आहे,
(2) असल्यास, या प्रकल्पाचे अंदाजपत्रक किती होते,
(3) असल्यास, या प्रकल्पाच्या कामात कोणतीही अनियमितता झाली नसल्याचे चितळे समितीच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय ?

श्री.विजय शिवतारे, श्री. गिरीष महाजन यांच्याकरिता : (१) अकोला जिल्ह्यातील पूर्णा बॅरेज-२ (नेर-धामणा) या प्रकल्पावर मे, २०१५ अखेर रु. ५९१.१८ कोटी खर्च झाला आहे.
(2) या प्रकल्पास महामंडळ स्तरावरुन मूळ प्रशासकीय मान्यता किंमत रु. १८१.९९ कोटी एवढया रकमेस व सुधारित प्रशासकीय मान्यता किंमत रु. ६३८.३४ कोटी एवढया रकमेस देण्यात आली आहे.
(3) अंशत: खरे आहे.

विशेष चौकशी समिती अहवाल खंड १. प्रकरण २ मध्ये छाननी केलेल्या प्रकल्पात निदर्शनास आलेल्या अनियमितता नमूद आहेत पूर्णा बॅरेज प्रकल्पांबाबत सविस्तर सर्वेक्षण, अन्वेषण व त्यानुसार संकल्पचित्र करुन तांत्रिक मान्यता देणे आवश्यक होते अशा आशयाच्या अनियमिततेचा उल्लेख आहे.

मात्र समितीच्या अहवालात याबाबत असे नमूद करण्यात आले आहे की, प्रकल्पास किंमती वाढीसह केंद्रीय जल आयोगाची मान्यता आहे. तसेच रु. ६३८.३४ कोटी एवढया रकमेस महामंडळाने दिलेली सुधारित प्रशासकीय मान्यता सुसंगत असल्याचे समितीने नमूद केले आहे.

...४

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7863

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, या प्रकल्पाची मूळ प्रशासकीय मान्यता किंमत रूपये 181.99 कोटी असताना सुधारित प्रशासकीय मान्यता किंमत रूपये 638.84 कोटी एवढ्या रकमेस देण्यात आली आहे. आता अशी माहिती मिळते की, या प्रकल्पास माननीय राज्यपालांनी भेट दिली होती. त्यामुळे ही मान्यता मिळाली असेल तर या प्रकल्पाच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे, सदर काम हे केव्हा पूर्णत्वाला जाणार आहे.

श्री.विजय शिवतारे : सभापती महोदय, या कामासाठी सन 2015-16 या वर्षामध्ये रूपये 134.82 कोटी एवढा निधी उपलब्ध आहे व सन 2017-1018 मध्ये हे काम पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

.....

...5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांना केलेला औषधाचा पुरवठा

(5) * ८०३६ श्री.जयवंतराव जाधव, श्री.ख्वाजा बेग, श्री.संदिप बाजोरिया, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले : सन्माननीय सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा, जिल्हा परिषदा व कॅन्टोन्मेंट बोर्ड अशा ७५ स्थानिक स्वराज्य संस्थाकडून मागणी नसतांनाही नॅशनल अर्बन हेल्थ मिशन अंतर्गत साडेचार कोटी रुपयांचे सोडीयम हायड्रोक्लाराइडची खरेदी करण्यात आल्याचे दिनांक १९ मे,`२०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) सदर औषधाची आवश्यकता नसल्याने ते विनावापर पडून मुदत बाह्य होवू नये म्हणून नाशिक महापालिकेने या औषधांचा ट्रक दिनांक १९ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास आरोग्य सेवा संचालनालयास परत पाठवून दिला, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, दुसरीकडे सिंहस्थासाठी सिव्हील हॉस्पिटल आणि जिल्हा परिषदेकडून आरोग्य सेवा संचालनालयाला औषधे खरेदीसाठी २७ वेळा स्मरणपत्रे देवूनही औषधे व साधनसामुग्री मिळत नसल्यामुळे सिंहस्थात आरोग्य विभागासमोर यक्ष प्रश्न निर्माण झाला आहे, हेही खरे आहे काय,
(4) असल्यास, प्रश्न भाग (१), (2) व (३) बाबत शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,
(5) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

प्रा.राम शिंदे, डॉ. दीपक सावंत यांच्याकरिता : (१) अंशत: खरे आहे

राज्यातील एकूण ९५ स्थानिक स्वराज्य संस्था व इतर ग्रामीण आरोग्य संस्था यांनी केलेली मागणी विचारात घेऊन एकूण रु. ४,४२,९७,९७०/- एवढया रकमेचे सोडियम हायपोक्लोराइड खरेदी करण्यात आले आहे.
(2) अंशत: खरे आहे

नाशिक महानगरपालिकेची औषधाची मागणी तेथील ४ रुग्णालये, १७ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि तेथे आयोजित करण्यात येणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळाच्या निमित्ताने जमा होणारा जनसमूदाय विचारात घेऊन लोकसंख्येच्या प्रमाणात मागणी पेक्षा थोडा अधिकचा सोडियम हायपोक्लोरोइडचा पुरवठा नाशिक महानगरपालिकेस करण्यात आला होता. परंतु सदर औषधाचा साठा करण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने आवश्यकतेनुसार औषधाचा साठा नाशिक मनपाने ठेवून उर्वरित औषधे पुरवठादाराकडे परत पाठविण्यात आली.
(3) हे खरे नाही.

सहसंचालक आरोगय सेवा राज्यस्तर, मुंबई यांचेकडून सिंहस्थ कुंभमेळाच्या नियोजनासाठी रु.२,३९,२२,३८२/- एवढा निधी उपसंचालक आरोग्य सेवा परिमंडळ, नाशिक यांना उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(4) प्रश्न उद्भवत नाही.
(5) प्रश्न उद्भवत नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.8036...

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून सन्माननीय मंत्र्यांना विचारू इच्छितो की, त्यांना या उत्तरामध्ये काही सुधारणा करावयाची आहे काय ?

(उत्तर आले नाही)

सभापती : नाही म्हणून सांगावे.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, उत्तरामध्ये सुधारणा करावयाची आहे काय हा प्रश्न मी अशाकरिता विचारला होता की, मी प्रशासनाला 27 वेळा स्मरणपत्र पाठवून सुद्धा आपल्याकडून कारवाई झाली नाही हे खरे आहे काय, असा प्रश्न विचारला असता त्यास 'नाही' असे उत्तर देण्यात आलेले आहे. मी प्रशासनाला जवळ जवळ 26 ते 27 वेळा स्मरणपत्र पाठविली असून ती आता माझ्याकडे उपलब्ध देखील आहेत. त्यामुळे यात माननीय मंत्र्यांची दिशाभूल कोण करीत आहे ? आपण येथे अंशत: खरे आहे असे सांगितले आहे. कुठल्याही नगरपालिकेची, महानगरपालिकेची आपणाकडे मागणी नव्हती. नाशिक कुंभमेळ्यासाठी मला 27 वेळा स्मरणपत्र द्यावी लागली आहेत. त्यासंबंधात त्यांच्याकडून काहीही कार्यवाही झालेली नाही. मुदतबाह्य औषधे तेथे पाठविली जात आहेत. हा विषय फार गंभीर आहे. त्यामुळे आपण मला संरक्षण द्यावे. जिल्हा प्रशासनाने सांगितले की, आम्ही अमुक एवढा निधी वितरित केला आहे. जिल्हा प्रशासनाने सांगितले की, शासनाचे निदेश असल्यामुळे आम्ही खरेदी करू शकत नाही. त्यामुळे त्यांनी निधी परत केला आहे. या विभागाचे दोन्ही माननीय मंत्री अतिशय सक्षम आहेत. धुळ्याच्या आरोग्य अधिकाऱ्यांनी देखील पत्र पाठविले आहे. नाशिक महानगरपालिका आयुक्तांनी पत्र पाठविले की, आम्ही या मागण्याच केलेल्या नाहीत. आपण ही औषधे आम्हाला का पाठविली आहेत ? मुंबई महागनरपालिका ही भिवंडी महानगरपालिकेपेक्षा मोठी असून देखील भिवंडी महानगरपालिकेला 70 हजार बॉटल्स पाठविण्यात आल्या आहेत, तर मुंबई महानगरपालिकेला 1400 बॉटल्स पाठविण्यात आलेल्या आहेत. माननीय मंत्र्यांची दिशाभूल करणारे संचालक व त्यांच्या संपूर्ण कार्यालयाची गंभीर दखल घेऊन या सगळ्या गैरव्यवहाराची उच्चस्तरिय चौकशी राज्य शासन करणार आहे काय ? राज्य शासनाकडे निधी परत आलेला आहे. उपचार करण्यासाठी जी औषधे किंवा इन्स्ट्रयूमेंटस लागणार होते ते आता आम्ही खरेदी करणार नाही असे जिल्हा परिषदेने सांगितले आहे. तेव्हा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

कुंभमेळ्यासाठी या सर्वांची खरेदी राज्य शासन कशा प्रकारे करणार आहे ? तेव्हा याची शासनाने गांभीर्याने चौकशी करावी तसेच सभागृहात आम्हाला जे चुकीचे उत्तर मिळत आहेत त्यासंबंधी राज्य शासन संबंधितांवर जबाबदारी निश्चित करणार आहे काय ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे त्यासंबंधी सांगू इच्छितो की, 95 स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी सोडियम हायपोक्लोराइडची खरेदी करण्यात आली होती. येथे त्यांनी स्मरणपत्रासंबंधातील प्रश्न उपस्थित केला असून त्याची निश्चितपणे दखल घेण्यात आली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांनी मागणी केल्यानंतरच आवश्यकतेनुसार ही खरेदी करण्यात आलेली आहे. सोडियम हायपोक्लोराईड हे ठेवून न घेता परत केले आहे अशा प्रकारचा देखील प्रश्न उपस्थित केला आहे. याची एक्सपायरी डेट ही सहा महिने असते. सहा महिन्याच्या कालखंडामध्ये सातत्याने खरेदी करणे शक्य नसते. त्यामुळे ही खरेदी केलेली आहे. कुंभमेळ्यासाठी शासनाने आरोग्याच्या दृष्टीने रुपये 2,39,22,382 एवढा निधी उपलब्ध करून दिलेला आहे. जिल्हा स्तरावर खरेदी करण्या ऐवजी राज्य स्तरावर खरेदी झाल्यामुळे त्याची चौकशी करावी असा प्रश्न देखील येथे विचारलेला आहे. पण यात तसे काही झालेले नाही. ही खरेदी राज्य स्तरावर झालेली आहे. ज्या ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांनी मागणी केली होती त्या अनुषंगानेच ही खरेदी करण्यात आलेली आहे.

सभापती : मी माननीय मंत्र्यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी सभागृहात उपस्थित केलेली माहिती सत्य मानण्यात येते ही दोन्ही सभागृहातील परंपरा आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी येथे दिलेली माहिती सत्य मानून आपण चौकशी करावी.

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, माझे उत्तर अजून पूर्ण झालेले नाही. नाशिक जिल्हा परिषदेने पुढील दोन महिन्यांमध्ये जनरल बॉडीची मिटींग होणार नाही म्हणून डिमांड केली होती. त्यामुळे संचालक, आरोग्य यांनी औषधांची खरेदी केली होती. त्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे त्या त्यांच्या भावनेचा आदर ठेवून आवश्यक ती चौकशी शासन स्तरावरून आरोग्य खात्याच्या माध्यमातून करण्यात येईल.

यानंतर श्री.जुन्नरे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र : 8036.....

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, सभागृहात आरोग्य मंत्री व राज्यमंत्री दोन्ही उपस्थित असल्यामुळे मी मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, सोडियम हायड्रोक्लोराईड या औषधाची एकंदर खरेदी 4.43 कोटी रुपयांची करण्यात आली आहे. एवढया मोठया प्रमाणात या औषधाची खरेदी करण्यात आली ती कशासाठी करण्यात आली, या औषधाचा उपयोग कोणत्या आजारासाठी केला जातो ? सामान्य आजारासाठी जी औषधे वारंवार लागतात ती औषधे शासनाच्या कोणत्याही हॉस्पिटल्समध्ये उपलब्ध होत नाहीत. ज्या औषधांची आवश्यकता असते ती औषधे मात्र खरेदी केली जात नाहीत. या औषधाची राज्यात एनआरएचएम मार्फत किती खरेदी करण्यात आली व त्यापैकी किती हिस्सा सोडियम हायड्रोक्लोराईडचा आहे ? एवढया मोठया प्रमाणात जे सोडियम हायड्रोक्लोराईड औषध खरेदी करण्यात आले आहे त्याची गरज नाही असे माझे मत आहे. सोडियम हायड्रोक्लोराईड हे औषध कशासाठी वापरले जाते याचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी करण्याची आवश्यकता आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सदर औषध हे सोडियम हायड्रोक्लोराईड नसून ते सोडियम हायपोक्लोराईड आहे. सोडियम हायपोक्लोराईडचा वापर ब्लिचिंगसाठी केला जातो,स्टेन रिमुव्हलसाठी, डिसइन्फेक्टंट म्हणून या औषधाचा वापर होतो. ॲन्टी व्हायरल ड्रग ट्रिटमेंटसाठी या औषधाचा वापर केला जातो. एचआयव्ही पेशंटचे मॉपिंग करावयाचे असेल, लादी पुसावयाची असेल तर त्यासाठी सोडियम हायपोक्लोराईड या औषधाचा वापर केला जातो. या औषधाची एवढया मोठया प्रमाणात का खरेदी करण्यात आली असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला आहे. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, साधारणपणे आरोग्य खात्याची औषध खरेदी करण्याची एक पध्दत आहे. सुरुवातीला सर्व हॉस्पिटलकडून मागणीपत्र घेतले जाते. मागणीपत्र आल्यानंतर इ-टेंडरींगच्या माध्यमातून औषधे खरेदी केली जातात. नाशिक येथील सिंहस्थ कुंभमेळा डोळयासमोर ठेवून या औषधाची मागणी रुग्णालयाकडून करण्यात आली होती. कुंभमेळा केवळ नाशिक येथेच आहे असे नसून शिर्डीपासूनची सर्व आरोग्य केंद्र व कॉर्पोरेशनला यासंदर्भात आपली कोणत्या औषधांची मागणी आहे यासाठी पत्र पाठवली होती. त्यांच्याकडून इतके इतके लिटर औषध लागेल अशी मागणी आली. नाशिक महानगरपालिकेची एकंदर लोकसंख्या 14.86 लाखाच्या आसपास आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय,....

सभापती : मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण झाल्यानंतर मी आपल्याला उप प्रश्न विचारण्याची संधी देईल.

डॉ. दीपक सावंत : नाशिकमध्ये 17 नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, नाशिक मधील चार मोठी रुग्णालये आणि आजुबाजूच्या परिसरासाठी या औषधाची मागणी केलेली आहे. मागणी आल्यानंतर इ-टेंडरींगच्या माध्यमातून सोडियम हायपोक्लोराईड या औषधाची खरेदी करण्यात आलेली आहे. महानगरपालिका किंवा महानगरपालिकेच्या इतर विभागाने या औषधाची .....

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, नाशिक महानगरपालिकेने सोडियम हायपोक्लोराईड या औषधाची मागणीच केली नव्हती. असे असताना.....

सभापती :सन्माननीय मंत्री महोदयांचे प्रथम उत्तर पूर्ण होऊ द्या.

डॉ. दीपक सावंत : सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांना मी उत्तर देण्यास बांधील आहे. मला कोणालाही पाठीशी घालावयाचे नाही. ज्यावेळी आमच्याकडे सोडियम हायपोक्लोराईडचा स्टॉक जास्त आला याची माहिती मिळाली त्यावेळी तो स्टॉक इतरत्र वितरित करण्यात आला. महानगरपालिकेची दोन महिने जनरल बॉडीची मिटिंग होणार नसल्यामुळे सदर मागणी नोंदवण्यात आली असे आम्हाला सांगण्यात आले होते. सन्माननीय सदस्य श्री. जयवंतराव जाधव यांच्या तसेच सन्माननीय सभागृहाच्या या प्रश्नाच्या संदर्भातील भावना लक्षात घेऊन मी सांगू इच्छितो की, स्मरणपत्र आणि सोडियम हायपोक्लोराईड हे दोन वेगळे विषय आहेत. सन्माननीय सदस्यांनी प्रश्नामध्ये असे म्हटले आहे की, "कुंभमेळयासाठी पैशाची मागणी केली होती. दुसरीकडे सिंहस्थासाठी सिव्हील हॉस्पिटल आणि जिल्हा परिषदेकडून आरोग्य सेवा संचालनालयाला औषधे खरेदीसाठी 27 वेळा स्मरणपत्र देऊनही साधन-सामुग्री मिळत नसल्यामुळे सिंहस्थात आरोग्य विभागासमोर यक्ष प्रश्न निर्माण झाला आहे." सोडियम हायपोक्लोराईड हा एक विषय आहे व औषधाच्या संदर्भातील विषय हा दुसरा आहे. जर 27 स्मरणपत्रे दिली असतील तर त्यासंदर्भातील चौकशी केली जाईल. तसेच सोडियम हायपोक्लोराईड हे औषध गरजेपेक्षा जास्त प्रमाणात विकत घेतले असेल तर त्याची देखील उच्चस्तरीय चौकशी करुन त्यासंदर्भातील विषयाची माहिती सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. ...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र : 8036.....

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, मघाशी या प्रश्नाचे उत्तर राज्यमंत्री देत असताना त्यांनी सांगितले होते की, या औषधाची मर्यादा सहा महिने आहे. या औषधाची मर्यादा जर सहा महिने असेल तर इतक्या मोठया प्रमाणात हे औषध खरेदी केल्यानंतर या औषधाचा वापर का करण्यात आला नाही ? हे औषध केवळ सहा महिनेच वापरले जाऊ शकते याची माहिती असताना या औषधाची खरेदी इतक्या मोठया प्रमाणात का करण्यात आली ?

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, काही औषधांची एक्सपायरी शॉर्ट असते. एक्सपायरीच्या नंतर ही औषधे वापरण्यास योग्य नसतात त्यापैकी सोडियम हायपोक्लोराईड हे एक औषध आहे. हे औषध एवढया मोठया प्रमाणात का खरेदी करण्यात आले याची माहिती माननीय राज्यमंत्र्यांनी अगोदरच दिलेली आहे. सिंहस्थामुळेच एवढया मोठया प्रमाणात या औषधाची खरेदी करण्यात आली होती.

श्री. हेमंत टकले : सिंहस्थ कुंभमेळा डोळयासमोर ठेवून सोडियम हायपोक्लोराईड या औषधाची खरेदी करण्यात आली अशी तसेच या औषधाचा वापर सहा महिन्यातच केला पाहिजे अशीही माहिती माननीय मंत्र्यांनी या ठिकाणी दिलेली आहे. सिंहस्थाच्या पर्वण्या केव्हा आहेत व लोकांची गर्दी केव्हा होणार आहे याचीही आपल्याला माहिती आहे. त्यामुळे यासंदर्भात शेडयुलिंग करुन जेवढे औषध लागेल तेवढे औषध खरेदी करावयास पाहिजे होते. आपण एकदम इतक्या मोठया प्रमाणात या औषधाची खरेदी का केली तसेच यामध्ये कोणाचा आशीर्वाद होता हे सुध्दा आम्हाला माहिती नाही. परंतु प्रथम औषध डम्प करावयाचे नंतर पुन्हा पाठवून द्यावयाचे ही कोणती पध्दत आहे. या औषधाची उपयुक्तता वर्षभराच्या काळासाठी वेगवेगळया टप्प्यांमध्ये निश्चित करता येऊ शकते ते न करता एकदमच सिंहस्थाच्या पहिल्या दिवशी बारा महिन्याचे औषध खरेदी करण्याची गरजच काय होती ?

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आपला प्रश्न बरोबर आहे. सोडियम हायपोक्लोराईड हे औषध इतक्या मोठया प्रमाणात का खरेदी करण्यात आले याची मला प्रथम सखोल चौकशी करावयाची आहे. या सखोल चौकशीमध्ये जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर योग्य ती कारवाई केली जाईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी या उत्तराच्या संदर्भात माहिती दिली आहे की, नाशिक येथे सिहंस्थ कुभमेळयाच्या निमित्ताने सोडियम हायपोक्लोराईड या औषधाची खरेदी करण्यात आली. कुंभमेळयाचे काम नाशिक महानगरपालिका करीत आहे. असे असताना नाशिक महानगरपालिका सांगते की, आम्ही या औषधाची मागणी केलेली नाही. त्यामुळे या औषधाची जी खरेदी झालेली आहे ती चुकीची झालेली आहे असाच त्याचा अर्थ निघतो. मंत्री महोदयांच्या उत्तरामुळे सभागृहाची दिशाभूल होत आहे. त्यामुळे सोडियम हायपोक्लोराईड या औषधाची ज्यांनी खरेदी केली त्यांच्यावर शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, नाशिक महानगरपालिकेने औषधाची मागणी न नोंदवल्याचे पत्र मी आपल्या माध्यमातून माननीय मंत्री महोदयांना देण्यास तयार आहे. आपले आरोग्य संचालनालय मुजोर झालेले आहे. हे कार्यालय मस्तीत आहे. अधिकाऱ्याला फोन केला तर अधिकारी लँडलाईनवर सुध्दा उपलब्ध होत नाहीत. चौकशी करण्यास गेलो तर त्या ठिकाणी दाद मिळत नाही. दुसरा प्रश्न असा उपस्थित होतो की, जिल्हा प्रशासनाने सांगितले की, आमची जीबी होणार नसल्यामुळे आम्ही शासनाच्या निकषा प्रमाणे औषधांची खरेदी करु शकणार नाही. असे असताना संचालक कार्यालय ही खरेदी आरसीच्या माध्यमातून करणार आहे की, इ-टेंडरींगच्या माध्यमातून करणार आहे ? औषधे खरेदी करण्यासाठी आपल्याकडे विहित कालावधी उपलब्ध आहे काय ? संचालक कार्यालयाला या खरेदीच्या माध्यमातून कुरण उपलब्ध होणार आहे. त्यामुळे माझी माननीय मंत्री महोदयांना कळकळीची विनंती आहे की, आपण आरोग्य यंत्रणा चांगली राखण्याकरिता या ठिकाणी कळकळ आणि तळमळ व्यक्त करीत आहात. त्यामुळे आपण या प्रश्नाला न्याय द्यावा एवढीच विनंती मी या माध्यमातून करीत आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी आपल्या कळकळीची आणि तळमळीची जाणीव ठेवून सांगू इच्छितो की, मागणीची पत्र आली होती काय याची प्रथम चौकशी केली जाईल. सदर महानगरपालिकेने औषधांची मागणी केली होती काय याचीही चौकशी केली जाईल, जिल्हा परिषदेने औषधांची मागणी केली होती काय याचीही चौकशी केली जाईल. आरोग्य खात्यामध्ये इ-टेंडरींगनेच खरेदी केली जात असते. जर त्यांनी प्रोक्यूअर केले असेल तर नाशिक

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र : 8036.....

डॉ.दीपक सावंत .....

महानगरपालिकेला आम्हाला पुन्हा औषधे देण्याची काही गरज नाही. जेवढया औषधाची गरज लागते तेवढीच औषधे खरेदी केले जातील हे मी सभागृहाला आश्वासित करु इच्छितो. जर आपल्याला आरोग्य संचालनालयाचा अनुभव वाईट असेल तर मी आपल्याला माझ्या दालनात बोलावून आपल्याशी कोणते अधिकारी मुजोरीने वागतात याची देखील चौकशी करेन.

यानंतर श्री. अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्रमांक 7209बाबत

सभापती : तारांकित प्रश्न क्रमांक 7209 नंतर घेण्यात येईल.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

राज्यातील विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र या विकास मंडळांना ५ वर्षासाठी मुदतवाढ देण्याबाबत

(7) *६६६४ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनील तटकरे, श्री.दीपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतीश चव्हाण : सन्माननीय नियोजन मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) दिनांक १ मे, २०१५ पासून पुढील ५ वर्षासाठी राज्यातील विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र या विकास मंडळांना मुदतवाढ देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर विकास मंडळामार्फत चालू आर्थिक वर्षात किती निधी उपलब्ध करुन देण्यात आला वा येत आहे,

(3) सदर विकास मंडळांना सन १९९४ पासून सातत्याने मुदतवाढ देण्यात येत असून या कालावधीत सदर मागास भागांचा अनुशेष दूर होण्यासाठी किती मदत झाली याचा आढावा घेण्यात आला आहे काय,

(4) असल्यास, सदर आढाव्याचे निष्कर्ष काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : (1) होय, हे खरे आहे. मा.राष्ट्रपतींनी राज्यातील तिन्ही विकास मंडळांना दिनांक ०१ मे, २०१५ पासून पुढील ५ वर्षासाठी मुदतवाढ दिली आहे.

(2) सन २०१५-१६ करिता निधी वितरित करण्यास मा.राज्यपालांनी मान्यता दिलेली नाही.

(3) व (4) विकास मंडळांच्या स्थापनेनंतर गठीत करण्यात आलेल्या निर्देशांक व अनुशेष समितीने ९ विकास क्षेत्रातील निश्चित केलेल्या वित्तीय अनुशेषापैकी सार्वजनिक आरोग्य वगळता इतर विकास क्षेत्रांचा वित्तीय अनुशेष दूर झालेला आहे. तर, जलसंपदा, सार्वजनिक आरोग्य, ऊर्जा व उच्च व तंत्र शिक्षण वगळता इतर विकास क्षेत्रातील भौतिक अनुशेष दूर झालेला आहे.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे आम्ही एक ज्येष्ठ मंत्री या नात्याने पाहतो, म्हणून माझी त्यांना विनंती आहे की, या उत्तरामध्ये त्यांना काही सुधारणा करायची आहे काय ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, या उत्तरामध्ये कोणत्याही प्रकारची सुधारणा करण्याची आवश्यकता जाणवत नाही.

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, विकास महामंडळास चालू आर्थिक वर्षात किती निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे असा प्रश्न विचारला होता. या प्रश्नाचे लेखी उत्तर "सन 2015-2016 करिता निधी वितरित करण्यास माननीय राज्यपालांनी मान्यता दिलेली नाही" असे दिलेले आहे. माझ्याकडे पुरवणी मागण्यांचे पुस्तक आहे, त्या पुस्तकातील पृष्ठ क्रमांक 7 वर उल्लेख आहे की, विदर्भ विकास महामंडळास 65 कोटी 98 लाख रुपये, मराठवाडा विकास महामंडळास शून्य, उर्वरित विकास महामंडळास शून्य रक्कम. म्हणजे फक्त विदर्भ विकास महामंडळासाठी 65 कोटी 98 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. परंतु लेखी उत्तरामध्ये नमूद केले आहे की, सन 2015-2016 करिता निधी वितरित करण्यास माननीय राज्यपालांनी मान्यता दिलेली नाही. तेव्हा नेमकी खरी माहिती कोणती याबाबत मंत्री महोदयांनी स्पष्ट केले तर मला दुसरा प्रश्न विचारता येईल.

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, लेखी उत्तरात दिलेली माहिती खरी आहे. माननीय राज्यपालांच्या निर्देशाशिवाय कोणतीही तरतूद करता येत नाही. सन्माननीय सदस्य व्हाईट बुकमधील आकडेवारी सांगत आहेत, ती माहिती अन्य कोणत्या तरी शीर्षाखाली दाखविण्यात आली असावी. माननीय राज्यपालांच्या अनुमतीशिवाय कोणाताही विशेष निधी दिला जात नाही आणि त्या संदर्भातील परिपत्रक माझ्याकडे उपलब्ध आहेत.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, व्हाईट बुकमध्ये विदर्भ विकास महामंडळासाठी तरतूद केल्याचे दाखविण्यात आलेले आहे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : सन्माननीय सदस्यांनी त्या पुस्तकातील नोंदी मला दाखवाव्यात. मी त्या तपासून घेतो.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माननीय राज्यपालांची परवानगी नसताना विदर्भ विकास महामंडळासाठी जी काही तरतूद केलेली आहे, त्याला माझी हरकत आहे. कारण मराठवाडा विकास महामंडळाचा मोठया प्रमाणावर अनुशेष आहे. आपण एकीकडे माननीय राज्यपालांची परवानगी नाही असे सांगता आणि दुसरीकडे मात्र तशी तरतूद करता. मराठवाडा विभाग सातत्याने चार वर्षे दुष्काळाला सामोरा जात असल्यामुळे मराठवाडा विकास महामंडळासाठी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

21-07-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) N-4

AJIT/ AKN/ KTG/ AKN/ ST/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 12:50

ता.प्र.क्र. 6664.....

श्री.अमरसिंह पंडित....

तरतूद करणे आवश्यक आहे. परंतु तशी तरतूद करण्यात आलेली नाही. माझा प्रश्न आहे की, मराठवाडा विकास महामंडळासाठी तरतूद करण्यासाठी शासन काही निर्णय घेणार आहे काय ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांची थोडी गल्लत झालेली आहे. सदर विकास महामंडळातर्फे चालू आर्थिक वर्षात किती निधी उपलब्ध करुन देण्यात आला असा प्रश्न विचारण्यात आला होता. लेखी उत्तरामध्ये विशेष निधीच्या संदर्भात उत्तर दिलेले आहे. अनुशेष भरुन काढण्यासाठी ज्या रकमांच्या तरतूदी कराव्या लागतात त्याची व्हाईट बुकमध्ये नोंद असते आणि ती माननीय राज्यपालांच्या निर्देशानुसार केली जाते. काही क्षेत्रामध्ये आर्थिक अनुशेष संपला आहे तर काही क्षेत्रामध्ये भौतिक अनुशेष शिल्लक आहे ज्याचा उल्लेख मी उत्तरामध्ये केलेला आहे. आपणास उदाहरण द्यावयाचे असेल तर आर्थिक अनुशेषामध्ये आरोग्य विभागाचा अनुशेष दूर झाला नव्हता त्यासाठी आपण या वर्षी 168 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. माननीय राज्यपालांच्या निर्देशानुसार 168 कोटी रुपयांचे त्या त्या विकास महामंडळासाठी भाग केले जातात. ऊर्जा विभागाबाबत सांगू इच्छितो की, ठाणे, रायगड, रत्नागिरी, चंद्रपूर, गडचिरोली या भागात दिनांक 1 जानेवारी, 2015 पर्यंत 29 हजार 382 कृषी पंपाच्या विद्युतीकरणाचा अनुशेष होता. त्यासाठी 220 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. या 220 कोटी रुपयांचे त्या त्या विकास महामंडळाच्या माध्यमातून वाटप होते आणि ते आकडे व्हाईट बुकमध्ये छापले जातात. सन्माननीय सदस्यांना ज्या प्रश्नाबाबत संदिग्धता होती, ती विशेष निधीची तरतूद होती. जी साधारणत: 1995 मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री श्री.मनोहर जोशी यांच्या काळात ती सुरु झाली. त्यावेळी 100 कोटी रुपये तीन महामंडळाने देण्यात येत होते. माननीय राज्यपालांच्या निर्देशानुसार सन 2011-2012 पासून हा निधी बंद झाला. त्यानंतर दिनांक 4 ऑगस्ट 2014 रोजी पुन्हा एक स्वतंत्र जी.आर.काढण्यात आला. या जी.आर.नुसार केवळ वित्तीय वर्ष 2014-2015 आहे म्हणून दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर नाही असे दिलेले आहे. व्हाईट बुकमध्ये त्या तरतुदी आहेत. अनुशेष भरुन निघावा, समतोल विकास व्हावा यासाठी हे सरकार अतिशय गंभीर आहे. त्यासाठी विदर्भातील अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम या भागासाठी एक हजार रुपये जास्तीची तरतूद करण्यात आलेली आहे. ठाणे, रायगड,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

21-07-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) N-5

AJIT/ AKN/ KTG/ AKN/ ST/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 12:50

ता.प्र.क्र. 6664.....

श्री.सुधीर मुनगंटीवार...

रत्नागिरी, चंद्रपूर, गडचिरोली या भागासाठी 220 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. मराठवाडा, उर्वरित महाराष्ट्र, विदर्भ या भागातील आरोग्य विभागाचा अनुशेष भरण्यासाठी 167 कोटी 80 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. ऊर्जा संदर्भातील आर्थिक बॅकलॉग पुढीलवर्षी संपेल. जलसंपदा विभागाचा भौतिक अनुशेष थोडा जास्त आहे. पण सरकार तो ही अनुशेष भरुन काढण्याच्या विचारात आहे आणि त्यासाठी नियोजन केले जात आहे.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी उत्तर देताना सांगितले की, अनुशेषाबाबत हे शासन अतिशय गंभीर आहे. हे गांभीर्य लक्षात घेऊन माननीय सभापतींची परवानगी न घेता केळकर समितीची प्रेस कॉन्फरन्स नागपूरच्या अधिवेशनात घेतली, तो विषय वेगळा आहे. त्या वेळी मुख्यमंत्री महोदयांनी असे उत्तर दिले होते की, या अनुशेषाबाबत आम्ही मंत्रिमंडळात गांभीर्याने चर्चा करु आणि त्या संदर्भातील अहवाल या अधिवेशनामध्ये सादर करु . जर सरकार गंभीर असेल तर हा अहवाल याच अधिवेशनामध्ये सादर करण्यात येईल काय ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी एखादा कागद दाखवून भाष्य केले असते तर बरे झाले असते. सभागृहाच्या परंपरेनुसार सन्माननीय सदस्य सभागृहात जे काही सांगतात ते सत्य मानले जाते. पण हे सत्य मानत असताना हे ही तेवढेच खरे आहे की, या अधिवेशनामध्ये केळकर समितीच्या अहवालावर ॲक्शन टेकन रिपोर्ट देण्याबाबत कोणतेही भाष्य झालेले नाही. विधानसभेत भाषण करताना मी सांगितले की,एकूण 30 विभाग आहेत, साधारणत: 163 शिफारशी आहेत. अभ्यास करुन डिसेंबर महिन्याच्या आसपास अहवाल देऊ असे सांगितले होते. सन्मानीय सदस्यांचा काही तरी गैरसमज झालेला आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

खामगांव (जि.बुलढाणा) येथील ज्ञानगंगा प्रकल्पाला सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत

(8) * ८१३७ श्री.पांडुरंग फुंडकर : तारांकित प्रश्न क्रमांक ४०५४ ला दिनांक १६ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) खामगांव (जि.बुलढाणा) येथील ज्ञानगंगा प्रकल्पाचे काम मागील २ वर्षापासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर प्रकल्पाला सुधारीत प्रशासकीय मान्यता न मिळाल्यामुळे सदर कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, सदर प्रकल्पाला सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विजय शिवतारे, श्री. गिरीष महाजन यांच्याकरिता : (१) अंशतः खरे आहे, सुधारित प्रशासकीय मान्यतेअभावी प्रकल्पाचे काम जून १२ पासून बंद होते. तथापि सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात वितरित झालेल्या तरतुदीच्या मर्यादेत खर्च करण्यास परवानगी प्रदान केल्यामुळे प्रकल्पाचे काम ऑक्टोबर २०१४ पासून पुन्हा सुरु करण्यात आले आहे.

(2) नाही.

(3) सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव नियोजन विभागात छाननीत आहे.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी हा प्रश्न मागील चार वर्षे मांडत आहे. खामगाव येथील ज्ञानगंगा प्रकल्प मागील दोन वर्षापासून बंद आहे. या प्रकल्पाच्या कामाला मागील तीन वर्षापासून प्रशासकीय मान्यता मिळत नाही. या प्रकल्पाच्या कामास ताबडतोब मान्यता दिली जाईल असे मंत्री महोदयांकडून उत्तर दिले जाते. माझे स्पेसिफिक प्रश्न आहेत या प्रकल्पाला मान्यता केव्हा मिळाली, या प्रकल्पाचे काम केव्हा सुरु झाले, प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव केव्हापासून प्रलंबित आहे ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.8137....

श्री.विजय शिवतारे : सभापती महोदय, या प्रकल्पाच्या कामाची मूळ मान्यता दिनांक 12 फेब्रुवारी, 2009 रोजीची आहे. सन 2008-2009 मध्ये या प्रकल्पाच्या कामाची दरसूची 30 कोटी 45 लाख होती आणि त्या रकमेस मान्यता देण्यात आली होती. प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता जी प्रस्तावित आहे, ती सन 2011-2012 च्या दरसूचीनुसार 99 कोटी 94 लाख इतकी आहे. या प्रकल्पामध्ये पाणीसाठा साधारणत: 10.82 द.ल.घ.मी. इतका आहे, तर सिंचन क्षेत्र साधारणत: 1180 हेक्टर इतके आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.8137....

श्री.विजय शिवतारे....

सभापती महोदय, सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव नियोजन विभागाकडे छाननीसाठी आहे. सदरहू प्रस्ताव नियोजन विभागाकडे दिनांक 29/03/2015 रोजी सादर करण्यात आला होता. तद्नंतर शेरे पूर्ततेसह फेर प्रस्ताव दि.15/06/2015 रोजी सादर करण्यात आला आहे. त्यामुळे जास्तीत जास्त पुढील दोन महिन्यात सदरहू प्रकल्पाला सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचा सरकारचा प्रयत्न असेल. हे खरे आहे की, प्रकल्पाचे काम सुधारित प्रशासकीय मान्यतेअभावी 2012 पासून बंद होते. परंतु प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता किंमतीच्या मर्यादेत वितरित झालेली व शिल्लक असलेली तरतूद खर्च करण्यासाठी शासनाने दि.07/08/2014 रोजी मान्यता दिल्याने ऑक्टोबर-2014 पासून प्रकल्पाचे काम सुरु आहे. सदरहू प्रकल्पाचे काम 70 टक्के पूर्ण झाले आहे आणि 2015-16 या वर्षासाठी 50.48 कोटी रुपये अनुदान उपलब्ध आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, प्रत्येक वेळी विदर्भातील प्रकल्पांच्या बाबतीत सुधारित प्रशासकीय मान्यता ही बाब अडथळा ठरते. 2012 पासून 2015 पर्यंत या प्रकल्पाला सुधारित प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही. असा कोण शुक्राचार्य तेथे बसला आहे की जो आमच्या भागातील प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देत नाही. प्रकल्पांना सुप्रमा न मिळाल्यामुळे प्रकल्पाची किंमत वाढत जाते. माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, या प्रकल्पाचे काम 70 टक्के झाले आहे. माझ्या माहितीनुसार या प्रकल्पाचे 70 टक्के काम झालेले नाही. पूर्वी या प्रकल्पाची जी किंमत ठरविण्यात आली होती तेवढीच रक्कम खर्च होत आहे. त्यामुळे त्या रकमेमध्ये प्रकल्पाचे काम पूर्ण होऊ शकत नाही. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, आमच्या प्रकल्पाच्या आड येणारे शुक्राचार्य केव्हा बाजूला होणार आहेत ? तसेच या प्रकल्पाला सुधारित प्रशासकीय मान्यता केव्हा मिळणार आणि हा प्रकल्प केव्हा पूर्ण होणार आहे ?

सभापती : या ठिकाणी सुदैवाने माननीय मुख्यमंत्री आणि माननीय अर्थ व नियोजन मंत्री दोघेही उपस्थित आहेत. सुप्रमा हा विषय EPC समोर गेल्यानंतर त्या ठिकाणी काय घडायचे ते घडते. परंतु सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी 'शुक्राचार्य' हा शब्दप्रयोग केला आहे. मला वाटते समज-गैरसमज आणि प्रकल्पाच्या वाढलेल्या किंमती हा यातील खरा 'शुक्राचार्य' आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती....

त्यामुळे माननीय मुख्यमंत्री आणि माननीय अर्थ व नियोजन मंत्री यांना मी सांगू इच्छितो की, संबंध महाराष्ट्राची ही व्यथा आहे. त्यामुळे आपण दोघांनीही यातून उचित असा मार्ग काढावा, अशी सूचना आहे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी या संदर्भात एक विशेष बैठक आयोजित केली होती. माननीय राज्यपालांनी सुध्दा विशेष बैठक आयोजित केली होती. अनेक वर्षांपासून प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता दिली जात नव्हती. याचे साधे कारण म्हणजे प्रकल्पाच्या तांत्रिक आराखड्यामध्ये 80-80 टक्के बदल झालेला आहे. मूळ आराखड्यात 80 टक्के बदल झाला तर ए.जी. कडून आक्षेप घेतला जातो आणि इतरही प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे आमचे सरकार आल्यानंतर दर सूचीत वाढ झाली. तसेच भूसंपादनामुळे ज्या प्रकल्पाचे दर वाढले ते सर्वच प्रस्ताव तातडीने मान्य केले आहोत. जसजसे प्रस्ताव येत आहेत त्या सर्व प्रस्तावांना मान्यता दिली जात आहे. तसेच माननीय राज्यपालांनी दुसरी अट अशी टाकली की, प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता ही सिंचन मंडळाने द्यावी. परंतु सिंचन मंडळाच्या अधिकाऱ्यांचे मत आहे की, हे काम आमच्याकडे न देता, शासनानेच या बाबतीत निर्णय घ्यावा. सभापती महोदय, सन 2009-10 पासूनचे हे प्रस्ताव आहेत. यामध्ये आम्ही स्पष्टता केली आहे. ज्या प्रकल्पांचे आराखडे बदलण्यात आले अशा सर्व प्रस्तावांना एकत्रितपणे मंत्रिमंडळापुढे नेऊन, मंत्रिमंडळाने त्यांना मंजुरी द्यावयाची आहे. त्यामुळे अशा प्रकल्पांना ताबडतोब सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या प्रकल्पाच्या अनुषंगाने सांगतो की, शेतकऱ्यांशी चर्चा करून थेट भूसंपादन झाले आहे. त्यामुळे या प्रकल्पाच्या बाबतीत भूसंपादनाचा प्रश्न राहिलेला नाही. या प्रकल्पाची किंमत 30 कोटी रुपये होती, परंतु आता ही किंमत वाढून 99 कोटी रुपयांवर गेली आहे. प्रकल्पासाठी निधीची तरतूद न केल्यामुळेच या प्रकल्पांची किमत एवढी वाढली आहे आणि विलंब झाला आहे. या प्रकल्पातून 1100 हेक्टर जमिनीला पाणी मिळणार आहे. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, या प्रकल्पाला विहित कालमर्यादेत प्राधान्याने सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येईल काय ? ..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विजय शिवतारे : महोदय, या संदर्भात तपासून, या प्रकल्पाला तीन महिन्याच्या आत सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील तीन प्रश्न पुढे ढकलण्यात आलेले आहेत. आजच्या यादीतील अनुक्रमांक 9 वरील प्रश्न सुध्दा महत्त्वाचा असल्यामुळे तो सुध्दा पुढे ढकलून त्यावर चर्चा घ्यावी.

सभापती : मी प्रश्नोत्तराचा तास संपल्याचे जाहीर आहे. तरी सुध्दा काही तरी अपवाद करुन, या प्रश्नावर उद्या चर्चा घेऊ या.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबत

श्री.रामराव वडकुते : सभापती महोदय, धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबतचा महत्त्वाचा विषय आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी एक वर्षापूर्वी बारामतीमध्ये जाहीर केले होते की, मंत्रिमंडळाच्या पहिल्या बैठकीत धनगर समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न सोडविण्यात येईल. तद्नंतर नागपूरच्या अधिवेशनात ए.जी. यांचा सल्ला घेऊन या विषयी एक महिन्यात निर्णय घेण्यात येईल असे सांगितले होते. तसेच मागच्या अधिवेशनात सुध्दा या विषयाच्या संदर्भात निर्णय घेण्याचे ठरविले होते.

सभापती महोदय, या राज्यातील धनगर समाज माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता होण्याची वाट पाहत आहे. आज पाऊस असताना सुध्दा राज्यातील धनगर समाजाचे लोक घोंगड्या आणि काठ्या घेऊन आझाद मैदान येथून विधानसभेकडे येण्याच्या तयारीत आहे. सभापती महोदय, धनगर समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न गेल्या 65 वर्षांपासून रखडलेला आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी मागे आश्वासन दिले होते की, धनगर समाजाला 15 दिवसांत आरक्षण देण्यात येईल. माननीय केंद्रीय आदवासी विकास मंत्र्यांनी माननीय श्री.शरद पवार साहेबांना उत्तर पाठविले की, राज्य सरकारकडून शिफारस करण्यात आली तर या बाबतीत विचार केला जाईल. त्यामुळे राज्याच्या मंत्रिमंडळाने धनगर समाजाला आरक्षण देण्यासंदर्भातील शिफारस करुन ती केंद्राला पाठविली तर धनगर समाजाचा प्रश्न सुटेल. माझी विनंती आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांनी मागे दिलेले आश्वासन पूर्ण करावे. तसेच हा विषय महत्त्वाचा असल्यामुळे या विषयावर चर्चा होणे आवश्यक आहे. मागच्या अधिवेशनात सुध्दा सभागृहापुढील सर्व कामकाज बाजूला ठेवून, या विषयावर चर्चा घेण्याची मागणी करण्यात आली होती. माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, मी या विषयावरील चर्चेला तयार आहे. महोदय, हा दीड कोटी समाजाचा प्रश्न असल्यामुळे सर्व कामकाज बाजूला ठेवून, या विषयावर चर्चा होणे आवश्यक आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या विषयावर नियम 289 अन्वये चर्चा घेता येणार नाही. त्यामुळे मी ती चर्चा नाकारीत आहे. काल सुध्दा या विषयावर तारांकित प्रश्न उपस्थित झाला होता. त्यात मी स्पष्ट निदेश दिले होते. त्या प्रश्नावर बराच वेळ चर्चा झाली. माननीय मुख्यमंत्री जेव्हा या विषयी उत्तर देतील त्यावेळी सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला न्याय मिळेल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.सुभाष देसाई (उद्योग मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कोंकण विकास महामंडळ मर्यादित यांचा सन 2013-14 या वर्षाचा त्रेचाळिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

विशेषाधिकार भंगाच्या सूचनेबाबत

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मी आज विशेषाधिकार भंगाची सूचना दिलेली आहे.

सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगतो की, आपण दिलेल्या विशेषाधिकार भंगाच्या सूचनेबाबत एक तांत्रिक बाब निर्माण झाली आहे. आपली सूचना आज सकाळी प्राप्त झाली आहे. त्यामुळे आपली सूचना तपासून घेतल्यानंतर आपण ती मांडावी.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मी आता जरी ती सूचना मांडली तरी आपल्याला मात्र नंतरच निर्णय द्यावयाचा आहे.

सभापती : हा प्रोसीजरचा भाग आहे. एका दिवसाने फारसा फरक पडेल असे नाही. आपण ही सूचना उद्या मांडावी. शिवाय आपण दिलेली विशेषाधिकार भंगाची सूचना माझ्यापर्यंत पोहचलेली नाही.

आता म.वि.प. नियम 260 अन्वये दिलेल्या प्रस्तावावर चर्चा सुरु होईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी.: राज्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने भूजल पातळीत कमालीची घट होऊन दुबार पेरणीचे निर्माण झालेले संकट

मु.शी.: राज्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने भूजल पातळीत कमालीची घट होऊन दुबार पेरणीचे निर्माण झालेले संकट, या विषयावर सर्वश्री धनंजय मुंडे, माणिकराव ठाकरे, सुनील तटकरे, अमरसिंह पंडित, संजय दत्त, हेमंत टकले, भाई जगताप, जयंतवराव जाधव, जयंत प्र. पाटील, शरद रणपिसे, कपिल पाटील, वि.प.स. यांचा प्रस्ताव

(प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.)

श्री.सुनील तटकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे व इतर सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या म.वि.प. नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री आज या चर्चेचा शेवट ऐकण्यासाठी सभागृहात उपस्थित आहेत. यापूर्वी या सभागृहात झालेली चर्चा माननीय मुख्यमंत्र्यांनी ऐकलेली नाही. तरी सुध्दा माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित राहिल्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानतो.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुनील तटकरे ....

राज्यामध्ये अभूतपूर्व भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे, शेतकऱ्यांच्या पुढे भयंकर संकटे निर्माण झाली आहेत, त्याचे वास्तव मी सभागृहासमोर मांडण्याचा प्रयत्न करणार आहे. माझे भाषण राजकीय नाही. मी माझ्या हातात कागदाचा एक कपटाही घेतलेला नाही. मी कोणत्याही आकडेवारीवर आधारित बोलण्याचा प्रयत्न करणार नाही. सत्ताधारी व विरोधी पक्षांतील सर्व सन्माननीय सदस्यांना राज्यातील भीषण परिस्थितीचे वास्तव निश्चितपणे ज्ञात आहे. आम्ही काल माननीय मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत दिलेले उत्तर ऐकले, पाहिले, वाहिण्यांवर दाखविले गेले, ते उत्तर महाराष्ट्र राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांचे होते की भाजपचे नेते श्री. देवेंद्र फडणवीस यांचे होते हा प्रश्न मनामध्ये आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी 2 तास विस्ताराने चर्चेला उत्तर दिले. मला या प्रश्नाचे राजकारण करायचे नव्हते आणि करायचे नाही. 15 वर्षांत काय झाले, आज काय होत आहे यावर चर्चा करण्याचा हा आखाडा नाही आणि आजचा हा प्रस्ताव सुध्दा नाही. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्रातील 12 कोटी जनता अपक्षेने सभागृहाकडे, आपल्याकडे पाहत आहे. माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाहत नाही तर राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांकडे जनता अपेक्षेने पाहत आहे. राज्याचे प्रमुख या नात्याने आपल्याकडून सकारात्मक निर्णय ऐकायला मिळेल अशी सर्वांची अपेक्षा आहे. माननीय मंत्री डॉ. दीपक सावंत, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे सभागृहात उपस्थित आहेत. काल माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले, त्यावेळी त्यांनी तुमची विकेट कधी काढली हे तुम्हालाही कळले नाही. त्यांनी नोबॉलवर तुम्हाला आऊट केले, काल तुम्ही स्टम्प आऊट झाला, झेल बाद झाला, तुमचा त्रिफळा उडाला. तुम्हाला ते शेवटपर्यंत कळलेच नाही. सहनही होत नाही आणि सांगताही येत नाही असे तुम्ही सर्वजण आहात. (अडथळा) थर्ड अंपायरची मदत घेऊन तुम्हाला बाद केले असेल, तसेही म्हणा. मी मघाशी प्रश्न उपस्थित केले त्यावेळी माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित नव्हते. देशाचे पंतप्रधान घटनात्मक आहेत, त्यांना हिटलर म्हणण्याचे धाडस ज्यावेळी एखादा महापौर दाखवितो, त्यावेळी त्या संदर्भातील भूमिका राज्याच्या वतीने आपण स्पष्ट करणे अत्यंत आवश्यक आहे. तो विषय याच्याशी निगडीत नाही. (गोंधळ) मी गल्लत करीत नाही किंवा केलेली नाही. मी कशा पध्दतीने हे केले जात आहे ते सांगत आहे.

(गोंधळ)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, महापौर सभागृहात उपस्थित नाहीत. मी शिवसेना पक्षाच्या वतीने स्पष्टीकरण करू इच्छिते की, त्यांनी तसे विधान केलेले नाही हे त्यांनी ऑन रेकार्ड म्हटले आहे. त्यांचा विपर्यास झाला आहे. अशा वेळी आपण परत परत रेकॉर्डवर का गैरसमज पसरवित आहात ?

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे यांनी भाषण करावे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे हे राजकारण करीत आहेत. विधानसभेच्या सभागृहात माननीय मुख्यमंत्र्यांनी काय भाषण कले, हे विधानपरिषदेच्या सभागृहात सांगणे किंवा त्याचा संदर्भ देणे हे परंपरेला धरून नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे आता येथे बोलल्या. परंतु आम्ही टीव्हीवर ऐकले आहे. पूर्वी प्रिंट मीडियामध्ये यायचे त्यावेळी नकार देणे ठीक होते. आम्हाला प्रत्यक्ष बोलताना टीव्हीवर दिसत आहेत, त्या बोलत आहेत. आम्ही बघितले आहे. (गोंधळ) नवीन पध्दत सुरू झाली आहे की, टीव्हीवर दाखविल्यानंतर सुध्दा बोलले जात आहे की, आम्ही बोललो नाही. (गोंधळ)

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे यांनी भाषण करावे. आपण दुष्काळाच्या विषयावर बोलत आहोत. हरकतीचा मुद्दा वगैरे काही नाही. आता फक्त नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर चर्चा होईल.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, वर्मावर बोट ठेवल्यावर काय स्थिती होते ते आपल्याला या निमित्ताने जाणवले आहे. वर्मावर बोलल्यावर काय स्थिती होते, याचे उत्तर देताना काय स्थिती होते याचे प्रत्यंतर आम्हाला सर्वांना येथे पहायला मिळत आहे. महाराष्ट्राला दुष्काळाची ही परिस्थिती नवीन नाही. आज पाऊस सुरू झाला. परंतु त्याचा उपयोग होणार नाही. (गोंधळ) उपयोग होईल त्यावेळी होईल. आज तशी स्थिती नाही. कृपा करून शेतकऱ्यांची दिशाभूल करू नका. पाऊस पडल्याने सर्वांवर आलेले पिण्याच्या पाण्याचे मानवी संकट दूर होईल. पण शेतकऱ्यांवर आलेले संकट आजच्या पावसाने दूर होणार नाही. महाराष्ट्राला दुष्काळाची सवय

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुनील तटकरे ....

आहे. सन 1972 मध्ये पहिल्यांदा दुष्काळ आला. स्व. वसंतराव नाईक, विदर्भाचे सुपूत्र हे त्यावेळी राज्याचे मुख्यमंत्री होते. आजच्यापेक्षाही भीषण वास्तव त्या काळात तयार झाले हाते. स्व. वसंतराव नाईक साहेबांनी उपाययोजना करताना पक्ष पाहिला नाही, संपूर्ण सभागृहाला, सर्व पक्षांना सोबत घेत दुष्काळावरील उपाययोजना करण्यासाठी, राज्याची सर्वांगीण प्रगती करण्यासाठी पावले उचलली.

सभापती महोदय, चर्चेत काही आक्षेप घेतले गेले. सत्तारूढ पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी भावना व्यक्त केल्या की, कर्जमाफी कशासाठी पाहिजे ? कर्जमाफी केवळ बँका वाचविण्यासाठी पाहिजे अशा भावना व्यक्त केल्या गेल्या. (अडथळा) मागच्या काळात पाया रचला गेला. स्व. चव्हाण साहेबांनी राज्याच्या मुख्यमंत्री पदाची सूत्रे हाती घेतली, राज्याची सर्वांगीण प्रगती व्हावी यासाठी कृषी, औद्योगिक रचनेचा पाया त्यांनी त्या काळात रचला. मध्यवर्ती सहकारी बँका निर्माण करण्याचे धाडस दाखविले. वैकुंठराव मेहता, धनंजयराव गाडगीळ, विखे-पाटील या सर्वांनी राज्यात सहकाराचा पाया रचला आणि देशाला एक महत्त्वपूर्ण उदाहरण दाखवून दिले की, सर्व क्षेत्रांत प्रगती करावयची असेल तर सहकाराशिवाय पर्याय नाही. त्या काळात त्यांनी सहकाराची भूमिका घेतली. प्रत्येक जिल्हयात बँका स्थापन करण्यात आल्या. त्यावेळी मूठभर लोकांच्या हातात संपत्ती होती, बँकांचे राष्ट्रीयकरण झालेले नव्हते. काही बँका, उद्योगपती त्या काळात देश चालवित होते. शेतीप्रधान असलेल्या या राज्याची अर्थव्यवस्था उभी करायची असेल तर शेतकऱ्यांनी सहभाग घेतला पाहिजे, शेतकऱ्यांच्या मालकीच्या बँका तयार झाल्या पाहिजेत, सहकार चळवळीच्या माध्यमातून सर्व काही उभे झाले पाहिजे आणि त्यावर नियंत्रण असण्यासाठी राज्य सहकारी बँक असली पाहिजे. जिल्हा परिषदा, पंचायत समित्या अशा वेगवेगळ्या स्थानिक स्वराज्य संस्था निर्माण झाल्या, त्या काळात महाराष्ट्र वीज वितरण कंपनी होती, त्या सर्वांची खाती मध्यवर्ती बँकेत ठेवण्याचे धोरण त्या काळात घेतले गेले. आताच्या शेतकऱ्यांच्या बँका यांचाच त्यांना उपयोग होऊ शकतो. इंदिरा गांधी यांनी बँकांचे राष्ट्रीयकरण करण्याचा निर्णय घेतला. आजही देशाचे माननीय पंतप्रधान व राज्याचे माननीय मुख्यमंत्री राष्ट्रीयकृत बँकांना सांगतात की शेतकऱ्यांना शेतीकर्ज द्या. माझे माननीय मुख्यमंत्र्यांना नम्रपणे आव्हान व आवाहन आहे, आपण सांगावे की, गेल्या 6 महिन्यांत किंवा आपण

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुनील तटकरे ....

आवाहन केल्यानंतर किती राष्ट्रीयकृत बँकांनी शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून दिले, किती पीककर्ज उपलब्ध करून दिले ? माझा व सहकाराचा फारसा संबंध आलेला नाही हे मी कबूल करतो. माझ्या जिल्ह्यात सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील बँक चालवितात. आमच्या रायगडमध्ये किंवा कोकणात बँकांकडून पीककर्ज घेऊन शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या कमी आहे. परंतु पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र येथील अर्थव्यवस्थेचे मूळ सहकारी बँका आहेत. सहकारी बँकांच्या माध्यमातून घेतले जाणारे कर्ज शेतकऱ्यांना खरीपासाठी मोठ्या प्रमाणात उपयुक्त ठरू शकते. आपण कर्जमाफीच्या बाबतीत बोलत असतो. येथे बसलेले अनेक जण सहकारातील आहेत. येथे बसलेल्या अनेकांना मध्यवर्ती बँकांच्या माध्यमातून घेतलेले कर्ज निश्चितपणे माहीत आहे.

सभापती महोदय, सन 1978 मध्ये पुलोद सरकार आले, त्यावेळी त्या सरकारने शेतकऱ्यांच्या सहकारी संस्थांच्या माध्यमातून घेलेलेल्या कर्जाचे व्याज माफ करण्याचा पहिला धाडसी निर्णय माननीय श्री. शरद पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली घेतला गेला. सन 1980 मध्ये काँग्रेसचे सरकार आले. बॅ. अंतुले राज्याचे मुख्यमंत्री झाले, त्यावेळी त्यानी सरसकट शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याचे धोरण घेतले. आरबीआयने त्यांना अडविले आणि संगितले की, राज्याला असा कर्जमाफी करण्याचा निर्णय घेता येणार नाही. त्यावेळी बॅ. अंतले यांनी ते धुडकावले आणि आरबीआयच्या चेअरमनला सांगितले की, हा अधिक्कार आमच्या सरकारचा आहे, आरबीआयचा नाही. सदर निर्णय घेण्याचे कारण असे आहे की, आम्ही कर्जाची प्रतिपूर्ती सरकारच्या अनुदानातून करणार आहोत, त्यामुळे तुम्ही बोलू शकत नाही. राज्याच्या इतिहासात केलेले हे वक्तव्य गेली 35 वर्षे आपणा सर्वांना ज्ञात आहे. शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबलेला आहे.

(नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे.....

गेली काही वर्षे या बाबतीत निश्चितपणे जाणीवपूर्वक प्रयत्न झाले आहेत. 15 वर्षे काही झालेच नाही, असे म्हणून शेतकऱ्यांची दिशाभूल करण्याचे काम आपण थांबविले पाहिजे. 15 वर्षापूर्वी या देशातील कृषी मालाचे उत्पन्न किती होते ? 15 वर्षापूर्वी या देशातील शेतकऱ्यांना कृषी मालाचा दर किती मिळत होता ? मुख्यमंत्री महोदय, याच राज्याने सन 1972 ची स्थितीही पाहिली आहे. गुरांना खाण्यास अयोग्य असलेला 'मिलो' रशियातून आयात करावा लागला आणि या राज्यातील लोकांची भूक आपण त्यावेळी भागवली. आज त्याच बळीराजाच्या कष्टातून हा देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होऊ शकला. त्यासाठी उपयुक्त असलेली धोरणे युपीअेच्या सरकारने त्या निमित्ताने राबविली. एक देश, जो पशुंना खाण्यास अयोग्य असणाऱ्या खाद्यावर आपली भूक भागवीत होता, तो तुमचा आणि माझा देश, गेल्या 15 वर्षात एवढा स्वयंपूर्ण झाला की, आज जगातील 22 राष्ट्रांची भूक भागविण्याचे काम तो करीत आहे. हे जसे युपीअे सरकारने घेतलेल्या धोरणांचे यश होते, राज्य सरकारने घेतलेल्या धोरणांचे यश होते, तसेच ते वर्षाचे बारा महिने शेतीत राबणाऱ्या कष्टकऱ्याचे, त्याने गाळलेल्या घामाचे सुध्दा यश होते, ज्याची कबुली आज या निमित्ताने देणे अत्यंत आवश्यक ठरणार आहे.

सभापती महोदय, गेल्या 15 वर्षात अनेक नैसर्गिक आपत्ती आल्या. आपण काय पाहिले नाही ? मुख्यमंत्री महोदय, अनेक वेळा अतिवृटी झाली. एक वर्ष तर असे आले की, ऊसाचे अतिरिक्त उत्पादन झाले आणि गाळपाविना ऊस शिल्लक राहिला. आपण काल प्रश्न उपस्थित केला. कदाचित तो राजकीयदृष्ट्या आपल्याला योग्य वाटला असेल. पण गाळपाविना ऊस शिल्लक राहिला, याचा नेमका अर्थ काय आहे ? सिंचन वाढले, ऊसाचे क्षेत्र सुध्दा वाढले. पण गाळप करण्यासाठी ऊस कारखानदारी कुठे तरी कमी पडली. म्हणूनच त्या कालावधीमध्ये, सन 2003-2004 मध्ये, ज्यावेळी सन्माननीय श्री.सुशीलकुमार शिंदेजी मुख्यमंत्री होते, सन्माननीय श्री.विजयसिंह मोहिते-पाटील उप मुख्यमंत्री होते, 300 कोटी रुपयांचे अर्थसहाय्य शेतकऱ्यांना दिले गेले. त्या कालावधीमध्ये सरकारने घेतलेला निर्णय मी या ठिकाणी मुद्दाम उद्धृत केला आहे. आपत्तीमध्ये सापडलेल्या शेतकऱ्याला सर्वतोपरी मदत केली गेली पाहिजे, हे कल्याणकारी राज्याचे धोरण त्या निमित्ताने ठरु शकले.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे.....

सभापती महोदय, सन 2005 मध्ये ज्यावेळी भीषण पूरग्रस्त परिस्थिती निर्माण झाली, कोकणात पहिल्याप्रथम पूर आला, दुसऱ्या दिवशी मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्र पूर्णपणाने पुरामध्ये उद्ध्वस्त झाला, त्यावेळी सुध्दा सरकारने आपली तिजोरी रिकामी केली आणि या आपत्तीत सापडलेल्या सर्व आपत्तीग्रस्तांना मोठ्या प्रमाणावर मदत करण्याची मनोभूमिका घेतली.

सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून मुख्यमंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, सन 1999 मध्ये आमचे सरकार आले त्यावेळी सुध्दा राज्याची स्थिती मजबूत नव्हती आणि ज्याचा आज आपण उल्लेख करीत आहात, जवळपास तशाच परिस्थितीतून आम्ही सर्वजण त्यावेळी जात होतो. परंतु, राज्यावर कर्जाचा डोंगर आहे, या हतबलतेने आपण काही करु शकणार नाही, अशी भूमिका त्यावेळी राज्य सरकारने घेतली नाही. कारण, सरकारने 'सरकार;' सारखे वागले पाहिजे, राजाने 'राजा' सारखे वागले पाहिजे आणि रयतेला न्याय देण्याची भूमिका घेतली पाहिजे. हीच भूमिका गेली अनेक वर्षे अखंडपणे या महाराष्ट्रात घेतली गेली आणि ती सर्व महाराष्ट्राने नेत्रदीपक पध्दतीने पाहिली. म्हणूनच देशपातळीवर अनेक योजनांच्या बाबतीत महाराष्ट्र एक 'पायोनिअर राज्य' म्हणून घडू शकले. आजही देशभरात वेगवेगळ्या योजना हाती घेतल्या जातात. केंद्र सरकार काही नवीन योजना तयार करते, राज्य सरकारे काही नवीन योजना आणतात. पण या आपल्या राज्य सरकारने पूर्वीच्याच कालावधीमध्ये अनेक योजना सुरु केलेल्या आहेत.

सभापती महोदय, ज्या कालावधीमध्ये कृषी-औद्योगिक रचनेचा पाया उत्तमपणे रचला गेला, त्या कालावधीत कोरडवाहू शेती किती होती, शेतमालाचे उत्पादन आपण किती करु शकत होतो ? वसंतराव नाईक साहेबांनी या क्षेत्रामध्ये खूप जाणीवपूर्वक निर्णय करण्याचा प्रयत्न केला आणि चार कृषी विद्यापीठे राज्यात स्थापन केली. त्या कालावधीमध्ये ज्यावेळी हायब्रिडच्या बियाणांची कल्पना मांडली गेली त्या वेळी शेतकऱ्यांच्या मनामध्ये शंका होती. नवीन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आलेली हायब्रिड बियाणे आमच्या परंपरागत बियाणांच्या तुलनेत किती उत्पन्न मिळवून देतील, अशी साशंकता शेतकऱ्यांच्या मनामध्ये होती. परंतु, श्री.नाईक साहेबांचा दृष्टीकोन, त्यांची दूरदृष्टी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

शेतकऱ्यांना एवढी उपयुक्त ठरली की, एक वर्ष प्रयोग करण्यामध्ये गेला तरी नंतर शेतक-यांच्या

श्री.सुनील तटकरे.....

असे लक्षात आले की, राज्य सरकार आपल्या पाठीशी ठामपणे उभे आहे, आपण हायब्रिड बियाणांचा उपयोग करावा आणि आपल्या शेती उत्पादनात प्रचंड प्रमाणावर वाढ करावी. हे चित्र आपल्याला त्या निमित्ताने पहावयास मिळाले. सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य गेल्या अनेक वर्षांपासून सर्व क्षेत्रामध्ये आघाडीवर आहे. कृषी मालाच्या उत्पादनामध्ये सुध्दा महाराष्ट्राने नेत्रदीपक प्रगती केली आहे. नाशिक किंवा पुणे परिसरातील, तासगावच्या उजाड माळरानाच्या परिसरातील द्राक्ष आपण लंडनच्या बाजारात पाठवू शकत आहोत. नाशिक परिसरातील कांदा निर्यात करु शकत आहोत. बासमतीसारखे वेगवेगळे प्रयोग करुन त्या तांदळाची निर्यात करण्याइतपत आज आपले राज्य, आपला हा देश स्वयंपूर्ण होऊ शकला. परंतु, आपल्याला जर राजकीय भाषणच करावयाचे असेल तर 40-50 वर्षात महाराष्ट्राची प्रगती झाली नाही, असे आपल्याला बोलता येऊ शकेल. पण आपल्याला आकडेवारी कधीही नाकारता येणार नाही. कृषी मालाच्या उत्पन्नात गेल्या 15 वर्षात खूप मोठ्या प्रमाणावर वाढ झाली, हे त्याचेच द्योतक आहे. परंतु, असे असले तरी अनेक संकटे येत गेली.

सभापती महोदय, या राज्यात कधी अतिवृष्टी झाली, कधी दुष्काळ आला, कधी अवकाळी पाऊस आला, कधी गारपिटीने शेतकऱ्याला झोडपले. मुख्यमंत्री महोदय, मी आपल्याला दोष देऊ इच्छित नाही. गेल्या अनेक वर्षात अशा प्रकारची स्थिती निर्माण झाली आणि त्या त्या वेळेला तशा प्रकारची मदत शेतकऱ्याला करण्यासंबंधीची भूमिका आपल्याला घेता आली. परंतु, आपण काल जे वक्तव्य केले ते दुर्दैवी आहे. शेतकऱ्यांना कर्जमाफी दिल्यानंतर त्याचा कुठे तरी बड्या शेतकऱ्यांना फायदा होत आहे, असे आपण जे म्हणाला ते दुर्दैवी आहे. शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली जात असताना ती नेमकी कुणाला दिली गेली ? अडीच हेक्टरच्या कमाल मर्यादेमध्येच कर्जमाफी दिली गेली. याचा अर्थ, ती कुणाला मिळाली ? अल्पभूधारक शेतकऱ्याला मिळाली, मध्यम भूधारक शेतकऱ्याला मिळाली. ठीक आहे, जो धनाढ्य शेतकरी आहे, जो सधन शेतकरी आहे, त्याला ती मिळाली नाही. कारण, कमाल उत्पन्नाची मर्यादा सुध्दा घातली गेली होती आणि कमाल रकमेपर्यंत कर्जमाफी राहील, याचा सुध्दा निर्णय घेतला गेला होता. हे धाडस देशभरामध्ये

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पहिल्याप्रथम आपल्या राज्याने केले. सन 1947 मध्ये आपला देश स्वतंत्र झाला. डॉ.बाबासाहेब

श्री.सुनील तटकरे.....

आंबेडकरांनी या देशाला घटना दिली. दिनांक 26 जानेवारी, 1950 मध्ये आपण प्रजासत्ताक झालो आणि सन 1952 मध्ये पहिल्यांदा देशामध्ये सार्वभौम लोकशाही अस्तित्वात आली. परंतु, त्यानंतर देशभरामध्ये कुठल्याही सरकारने शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याचा निर्णय घेतला नव्हता. माननीय श्री.शरद पवार साहेब देशाचे कृषी मंत्री झाले. युपीअेच्या सरकारने, सोनिया गांधीजींच्या नेतृत्वाखालील सरकारने, हे धाडस दाखविले आणि देशभरातील सर्व शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याची भूमिका स्वातंत्र्यानंतरच्या कालावधीमध्ये पहिल्या प्रथम देशामध्ये घेतली गेली. त्याचा मी या ठिकाणी आवर्जून उल्लेख करु इच्छितो. एका बाजूला सक्षमपणे शेतकऱ्याच्या पाठीमागे ठामपणाने उभे राहणे, त्याच्या कृषी मालाला अधिक चांगल्या पध्दतीने दर देणे, आयात-निर्यातीचे धोरण आखणे, अशा उपाययोजना त्या सरकारने केल्या. या देशाने असे धोरण आखले की, ज्या वेळी अतिरिक्त उत्पादन होईल, त्यावेळी निर्यात केली जाईल. ज्याचा देशाला तर फायदा होईलच पण त्याबरोबरच शेतकऱ्याला देखील चांगल्या प्रकारचे उत्पन्न मिळेल, त्याच्या उत्पादनाला चांगला दर मिळेल. एवढे दिवस आम्ही पहात आलो आहोत की, केवळ नोकरी हे उपजीविकेचे साधन राहू शकत नाही. त्या काळ्या आईची सेवा करीत आयुष्यभर काबाडकष्ट करणाऱ्या शेतकऱ्याच्या जीवनामध्ये सुध्दा चार दिवस सुगीचे येऊ शकतात. हे गेल्या 15-20 वर्षाच्या धोरणातून निश्चितपणाने आपल्याला पहावयास मिळू शकेल.

सभापती महोदय, आज आपण असे म्हणत आहोत की, कर्जमाफी झाली म्हणजे ती धनाढ्य शेतकऱ्यांची झाली आहे. मुख्यमंत्री महोदय, माझी आपल्याला नम्रतेची विनंती आहे. सन 2009 मध्ये झालेल्या कर्जमाफीतून नेमक्या किती धनाड्य शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली आणि किती अल्प भूधारक शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली, हे तरी आपल्या तोंडून एकदा जाहीर होऊ द्या आणि महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना एकदा कळू द्या की, त्या कालावधीमध्ये घेतलेला निर्णय हा केवळ काही मुठभर लोकांसाठी घेतलेला होता.

सभापती महोदय, ज्यावेळी मुख्यमंत्री महोदय सभागृहात बोलतात त्यावेळी त्याला अतिशय महत्व असते. जसे आपण मघाशी सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव बोलत असताना

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सांगितले की, "सभागृहात केलेले वक्तव्य खरे आहे, असे मानून त्यावर कार्यवाही करावी."

श्री.सुनील तटकरे.....

त्याप्रमाणेच मुख्यमंत्री महोदयांनी सरकारच्या वतीने सभागृहात जे भाष्य केले आहे, त्या संदर्भातील आकडेवारी महाराष्ट्रातील जनतेसमोर येणे अत्यंत आवश्क आहे. कुणाकुणाला लाभ झाला, किती अल्पभूधारक शेतकरी होते, किती मध्यम भूधारक शेतकरी होते, किती सधन शेतकरी होते, ज्यांना लाभ झाला. हे खरे आहे की, प्रत्येक क्षेत्रात अपप्रवृत्ती असतात. ते अटळ आहे. मानवी जीवनामध्ये आपण असे म्हणू शकत नाही की, घेतलेल्या प्रत्येक निर्णयाची 100 टक्के, जशीच्या तशी अंमलबजावणी होईल. मला हेही कळू शकत नाही की, अशा प्रकारचे निर्णय घेतले जात असताना त्यामध्ये नेमके कोणाचे हित आहे ?

सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून मुख्यमंत्री महोदयांच्या एक बाब निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, मिरज परिसरातील एक शेतकरी किंवा तेथील काही शेतकरी "आम्हाला पाणी मिळत नाही, म्हणून शेजारच्या कर्नाटक राज्यात जाण्यासाठी परवानगी द्या", अशी मागणी करतात. हे भीषण वास्तव नेमके काय दाखविते ?

सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदयांनी एक चांगला पायंडा पाडल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. यवतमाळच्या आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या घरी त्यांनी मुक्काम केला. कारण, तेथील शेतकऱ्यांच्या मनामध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या घरामध्ये मुक्कामाला राहतात. 'देवेंद्र फडणवीस' मुक्कामाला राहिले नाहीत तर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मुक्कामाला राहिले, याचा आम्हाला अभिमान आहे. पण त्याबरोबरच महाराष्ट्राच्या माननीय मुख्यमंत्र्यांची विश्वासार्हता संपुष्टात आली आहे की काय, अशीही शंका आमच्या मनामध्ये निर्माण झाली. कारण, त्याच गावातील एका शेतकरी भगिनीने नंतर आत्महत्या केली. याचा अर्थ, सरकार म्हणून आम्ही त्यांचा आत्मविश्वास, त्यांचे मनोबल वाढविण्याच्या दृष्टीकोनातून कुठे कमी पडलो का, अशा प्रकारची साशंकता निर्माण होते.

सभापती महोदय, गेल्या सहा महिन्यात किती आत्महत्या झाल्या, किती वाढल्या, हे सांगून मी राजकीय गणित बिलकुल मांडणार नाही. कारण, आत्महत्यांचे दुष्टचक्र आपल्याला थांबविलेच पाहिजे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

यानंतर श्री.बोरले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे.....

इतके दिवस आम्ही अमूक शहर गुन्हेगारीत पुढे आहे, अमूक राज्य गुन्हेगारीत पुढे आहे, ही आकडेवारी ऐकत होतो. परंतु, काल देशात जी आकडेवारी प्रसिद्ध झाली त्यामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये महाराष्ट्र राज्य पहिल्या क्रमांकावर आहे. काल अशा प्रकारची आकडेवारी प्रसिद्ध झाल्याचे आपण सर्वांनी वाचले, पाहिले. (...अडथळा...) माननीय श्री.एकनाथराव खडसे साहेब, ते तुम्हालाही भूषणावह नाही आणि आम्हालाही भूषणावह नाही. त्यामुळे मागील 15 वर्षात काय झाले याबाबत आपण फारसे बोलू नका. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या हिताची जपणूक करावयाची असेल तर तुम्ही मंत्रीपद बाजूला ठेवा आणि तुमच्यातील हाडाचा शेतकरी जागा होऊ द्या, हे सांगण्यासाठी मी उभा आहे. तुमच्यातील शेतकरी मंत्री आम्हाला नको आहे. तुम्ही ज्या मुक्ताईनगर परिसरात घाम गाळता तो हाडाचा शेतकरी जागा होतो की नाही, हे आम्हाला आज बघावयाचे आहे. हा राजकीय प्रश्न नाही. हा प्रश्न महाराष्ट्रातील तमाम शेतकरी बांधवांच्या दृष्टीकोनातून महत्वाचा आहे. कर्जमाफीच्या संदर्भात आपण जे वक्तव्य करीत आहात, त्यामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना हे कळले पाहिजे की, मध्यवर्ती बँकेच्या माध्यमातून दिले गेलेले कर्ज नेमके कोणाच्या खिशात गेले ? कोणाच्या खिशात गेले असेल तर मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा अध्यक्ष म्हणून आज जाहीर रीत्या मागणी करतो की, आपण पाहिजे ती चौकशी करावी आणि जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करावी. परंतु, त्यामुळे गरीब शेतकऱ्याला भरडू नका, एवढी नम्रतेची विनंती मी आपल्याला करु इच्छितो.

सभापती महोदय, आपल्याला योजना राबवावयाच्या आहेत. आपण जलयुक्त शिवार अभियान सुरु केले. मागील अनेक वर्षापासून राज्य शासनाने ज्या योजना सुरु केलेल्या आहेत त्या आपण एका छत्री खाली आणल्या, हे चांगले केले. आपण त्यातून एक नवीन अभियान सुरु केल्याचे दाखविले. आज आपण त्याची यशश्वीता पाहत आहोत. परंतु, पाऊसच पडला नाही तर पाणीच साठू शकत नाही. मागील अनेक वर्षात धरणे बांधण्यात आली. आपण त्या संदर्भात टिकाटिप्पणी करीत आलो. परंतु, पाणी नाही म्हटल्यानंतर आपण सर्व धरणे दाखवित आलो आणि जणू काही

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे.....

झालेच नाही अशा प्रकारचा आभास निर्माण करीत आलो. ज्या ठिकाणी जलयुक्त शिवार अभियानाच्या अंतर्गत कामे झालेली आहेत त्या ठिकाणी पाऊसच पडला नाही तर तेथे पाण्याचा साठा कोठून होणार आहे आणि तेथे पाण्याचा साठा नसेल तर त्या शेतकऱ्याला काय मिळणार आहे ? तुम्ही डोक्याला कितीही मुंडावळ्या बांधून शेतकऱ्यांची पेरणी करुन दिली आणि तेथे पाऊसच पडला नाही तर तुम्ही तरी काय करणार आहात ? तुमचे आणि माननीय श्री.दिवाकर रावते साहेबांचे फोटो वर्तमानपत्रात छापून आले होते. (...अडथळा...) आपण आहे त्या पाण्याचा वापर करावा. त्याचा 2-5 एकरसाठी उपयोग होईल. परंतु, जोपर्यंत पाऊस पडत नाही तोपर्यंत त्याचा उपयोग होणार नाही. (...अडथळा...) जे वास्तव आहे ते मी सांगत आहे.

सभापती : मंत्री महोदय, आपण खाली बसून बोलू नये. आपण सन्माननीय सदस्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, आज राज्यातील सहकारी बँकांमध्ये किती लाख कोटी रुपयांच्या ठेवी आहेत, हेही मुख्यमंत्री महोदय जनतेला कळू द्यावे. राष्ट्रीयकृत बँकांमध्ये किती ठेवी आहेत आणि मध्यवर्ती सहकारी बँकांमध्ये किती ठेवी आहेत, ही आकडेवारी एकदा बाहेर येऊ द्यावी. माननीय श्री.विजय शिवतारे साहेब, तुमच्या एकट्या पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत 8 हजार कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. आता या बँका लोकांना फसवित आहेत असे जर का मुख्यमंत्री महोदय म्हणाले आणि ठेवीदारांच्या मनात असंतोष निर्माण झाला तर एका झटक्यात हे सर्व कोसळून जाईल आणि मग महाराष्ट्र कशा पद्धतीने उभा राहील, असा प्रश्न या निमित्ताने निर्माण होतो. ज्या ठिकाणी राजकारण करावयाचे आहे तेथे आपण जरुर राजकारण करु, आपण त्या आखाड्यात जरुर बोलावे. मला हेही माहिती आहे की, माझ्या भाषणानंतर तुम्ही माझ्यावर तोफच डागणार आहात. कारण, इतके दिवस आम्ही बोललो. मी आणि सन्माननीय सदस्य सर्वश्री अजित पवार साहेब, छगन भुजबळ साहेब (...अडथळा...) तुमच्या सज्जनतेबद्दल मी बोलणार आहे ? परंतु, आम्ही नाही बोललो तर आमच्या चौकशीचा फेरा सुरु आहे. म्हणून आमची

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे.....

तोंड बंद आहेत. माननीय श्री.विजय शिवतारे साहेब, आमच्या कोकणात एक म्हण आहे आणि ती म्हण अशी आहे की, मेलेला कोंबडा कधी आगीला भीत नाही. तेव्हा आता यापेक्षा आणखी काय होणार आहे ? काय करायचे असेल ते करावे, त्यामध्ये काय आहे, त्यामध्ये फरक असण्याचे काही कारण नाही, जे व्हायचे असेल ते होईल. परंतु, याचा अर्थ शेतकऱ्यांच्या हिताची जपणूक करण्याचे आमचे वक्तव्य जर कोणी थांबवू शकत असेल तर ते कोणालाही थांबविता येणार नाही, हेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. ठीक आहे, एखाद्या बाबतीत होत असेल. मी त्यावेळी भाषण करताना सांगितले की, कोण जात्यात आहे, कोण सुपात आहे, तर कोण टोपलीत आहे. परंतु, तो मुद्दा नाही. मुद्दा असा आहे की, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या हिताची जपणूक करण्याच्या दृष्टीकोनातून पावले उचलण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आपण ज्या सातारा जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करता त्या सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत असलेल्या ठेवी आणि एखाद्या राष्ट्रीयकृत बँकेत असलेल्या ठेवी याचे सुध्दा प्रमाण महाराष्ट्रातील जनतेसमोर येणे अत्यंत आवश्यक आहे. याच बँकांकडून मिळणाऱ्या क्रमपत्रकाच्या माध्यमातून शेतकरी कर्ज घेतो. मी सांगू इच्छितो की, शेतकऱ्यांना 1 लाख रुपयांपर्यंत बिनव्याजी कर्ज मिळते. शेतकऱ्यांना 2 ते 3 लाख रुपयापर्यंत 4 टक्के व्याज दराने कर्ज उपलब्ध करुन देण्याची महत्वपूर्ण भूमिका पंजाबराव देशमुख व्याज सवलतीच्या माध्यमातून राज्य शासनाने सुरु केली. त्यामुळे शेतकऱ्यांना अनेक सहकारी बँकांच्या माध्यमातून शून्य टक्के व्याज दराने कर्ज उपलब्ध करुन दिले जाते. परंतु, राष्ट्रीयकृत बँका देत नाहीत. (...अडथळा...) ते सोडूनच द्यावे. परंतु, राष्ट्रीयकृत बँका ज्या दराने व्याज आकारतात त्या दराने देखील शेतकऱ्यांना शेतीसाठी कर्ज उपलब्ध करुन देण्याचे त्या बँकांचे धोरण नाही. मुख्यमंत्री महोदय आपण या ठिकाणी सांगितले की, ज्या बँका शेतकऱ्यांना पीक कर्ज देणार नाहीत त्यांच्यावर आम्ही फौजदारी गुन्हे दाखल करु. आपण किती बँकांवर फौजदारी गुन्हे दाखल केले, याचे उत्तर मिळणे अत्यंत आवश्यक आहे. राष्ट्रीयकृत बँका आम्हाला विचारतच नाहीत. मी राज्याचा अर्थमंत्री असताना एक

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे.....

चर्चासत्र झाले होते. त्यामध्ये तोच मुद्दा चर्चेला आला होता की, स्व.इंदिरा गांधी यांनी 40 वर्षापूर्वी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले त्याचा नेमका काय फायदा झाला ? आजही अर्थमंत्री महोदय, तुम्ही तुमच्या जिल्ह्यातील एखाद्या तरुणाला राष्ट्रीयकृत बँकेत पाठवावे आणि तो सुशिक्षित बेकार असल्यामुळे त्याला कर्ज देण्यासाठी तुम्ही अर्थमंत्री म्हणून शिफारस करावी. ती राष्ट्रीयकृत बँक तुमचे ऐकते काय ते आपण बघावे, ती बँक ऐकत नाही.

सभापती महोदय, मी माननीय श्री.एकनाथराव खडसे साहेबांना सांगू इच्छितो की, सर्व बँकांमध्ये अशा प्रकारचा व्यवहार होतो असे जर का मानले गेले असते तर यावेळी तुम्ही जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ताब्यात घेण्यासाठी एवढा अट्टाहास का केला ? का एवढी मेहनत घेतली ? शेती मालामध्ये, उत्पादनामध्ये प्रगत असलेल्या माझ्या जळगाव जिल्ह्यातील कष्टकरी शेतकऱ्याला आवश्यकता असेल त्यावेळी मला पीक कर्ज देता आले पाहिजे, या उदात्त हेतूने तुम्ही त्या कालावधीत ती बँक ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला असेल असा आमचा विश्वास आहे. आता त्या विश्वासालाच शासनाच्या माध्यमातून तडा जाणार असेल तर शेतकऱ्यांनी कोणाकडे बघायचे, हा प्रश्न या निमित्ताने निर्माण होऊ शकतो. शेतकऱ्यांची कर्जमुक्ती का कर्जमाफी या वाक्प्रचारात मुख्यमंत्री महोदय तुमचा हात कोणीही धरु शकणार नाही. तुम्ही एकदा बोलायला सुरुवात केली की, धड, धड बोलाल, यामध्ये शंका असण्याचे कारण नाही. त्यामध्ये आपला हातखंडा आहे, हे कोणीही नाकारत नाही. परंतु, त्याला कृतीची जोड दिली पाहिजे. मी मागील 15 वर्षापासून मंत्रिमंडळात होतो. परंतु, मला देखील कळू शकले नाही की, मंत्रिमंडळाने घेतलेल्या एखाद्या निर्णयाची अंमलबजावणी होत नाही म्हणून मंत्रिमंडळाला असा ठराव करावा लागतो की, शेतकऱ्यांचे जे कर्ज माफ केलेले आहे ते इतक्या महिन्याच्या आत तुम्ही द्यावे. असा ठराव मंत्रिमंडळाला करावा लागतो, हे मी माझ्या आयुष्यात पहिल्यांदाच बघितले आहे. तुमचा प्रशासनावरील धाक एवढा कसा काय कमी होऊ शकतो ? आज दुष्काळाचा मुकाबला करीत असताना केवळ सरकारच नाही तर आम्ही देखील आपल्या बरोबर आहोत, हीच भावना आम्हाला या निमित्ताने मांडावयाची आहे. ठीक आहे, आम्ही तीन दिवस कर्जमाफीची मागणी केली आणि

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

नंतर चर्चेमध्ये एवढ्यासाठी सहभागी झालो की, या देवाणघेवाणीतून, विचार मंथनातून राज्यातील

श्री.सुनील तटकरे.....

शेतकऱ्यांचे, बळीराजाचे दु:ख कोठे तरी दूर होईल आणि त्याला स्थिर होण्याचा मार्ग सापडेल. तुम्ही सांगितलेल्या उपाययोजना चांगल्या आहेत, त्या दीर्घकालीन आहे. दादा, कर्जमुक्ती कधी होणार आहे ? शेतकऱ्यांचे कर्ज तर माफ होणार नाही. 5 वर्षाच्या उपाययोजना झाल्या. परंतु, पुन्हा अशाच प्रकारे अस्मानी, सुलतानी संकट आले, जुलै महिना संपत आला आणि पाऊस पडला नाही तर तुम्हाला असे वाटते की, मालेगाव परिसरातील शेतामध्ये पीक उगवेल ? नाही उगवू शकत. कारण, निसर्गासमोर तुम्ही, मी किंवा इतर कोणी काहीही करु शकत नाही. अशा वेळी आपत्तीत सापडलेल्या शेतकऱ्याला पूर्णपणे ताकद देण्याच्या दृष्टीकोनातून आपल्याला त्याला मदत करणे अत्यंत आवश्यक आहे. महाराष्ट्राने मागील अनेक वर्षात सहकार चळवळीच्या माध्यमातून हेच काम केले आहे. त्या निमित्ताने सहकार चळवळीचा दबदबा राज्याच्या नव्हे तर देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचला. काही दुष्ट चक्राने सहकार चळवळीला देखील ग्रासले आहे, यामध्ये दुमत असण्याचे काही कारण नाही. याचा अर्थ, सर्व काही वाईट आहे असे जर का आपण म्हणायला लागलो तर या राज्याची अर्थव्यवस्था नेमकी कशावर उभी राहणार आहे ? मुख्यमंत्री महोदय, मागील 6 महिन्यात आपण अनेक वेळा परदेशात जाऊन आला आहात. आम्ही त्यावर टिकाटिप्पणी केली नाही आणि करणारही नाही. आम्हालाही असे वाटते की, परदेशातील आर्थिक गुंतवणूक आपल्या राज्यात आली पाहिजे. परंतु, ती गुंतवणूक राज्यात येऊन केव्हा उपयोग होईल ? राज्यातील बळीराजा वर्षभर घाम गाळतो, तो शेतीमध्ये राबतो, त्याला आपण मदत करण्याचा प्रयत्न केला तरच ते शक्य होऊ शकेल. अन्यथा हे शक्य होऊ शकणार नाही. कारण, अर्थव्यवस्थेतील हा एक महत्वाचा कणा आहे.

सभापती महोदय, परवा आमची विधिमंडळ पक्षाची बैठक झाली. त्यावेळी विधानसभेचे सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग बरोरा यांनी मला सांगितले की, भातसा धरणातून मुंबई शहराला 65 टक्के पाणी पुरवठा केला जातो. मुंबई शहरातील 65 टक्के पाणी पुरवठा भातसा धरणावर अवलंबून आहे आणि आज त्या धरणात केवळ 60-65 दिवस पुरेल एवढाच पाणीसाठा आहे. जर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

एवढे भीषण वास्तव असेल तर या संदर्भात उपाययोजना करण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र येणे अत्यंत आवश्यक आहे.

यानंतर श्री.खर्चे वि.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे...

मरीन ड्राईव्ह येथे कोणाची जीम कशी उभारली जाते, तेथे शिववडा चालतो किंवा नाही, हा प्रश्न महाराष्ट्राच्या जनतेसाठी महत्वाचा नाही. महाराष्ट्रातील उपाशी असलेल्या बळीराजाला आज सरकार काय न्याय देतो, माननीय मुख्यमंत्री याबाबत काय घोषणा करतात याकडे महाराष्ट्रातील सर्व जनतेचे लक्ष लागले आहे. आम्हाला याची जाणीव आहे की, तुम्ही देखील शेतकरी आहात, काल तुम्ही भाषणात सांगितले होते की, मी देखील गाईची धार काढली आहे. याबाबत आम्हाला आनंद आहे, हे सांगणे काही गैर नाही. एकेकाळी आम्ही देखील शेतात राबलो, आम्ही देखील लावणी व पेरणी केलेली आहे. आम्हाला देखील या बाबी ज्ञात आहेत, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री सांगतात यामध्ये काही दुमत नाही. शेतकऱ्यांच्या दु:खाबाबत मनात संवेदना ठेऊन काम करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी भाषण करताना बँकेच्या बाबतीत उल्लेख केला होता. ज्या ठिकाणच्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये अपप्रवृत्ती असेल ती सरकारने थांबविली पाहिजे. एखाद्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत पीक विम्याची रक्कम जमा झाली असेल व ती रक्कम ती बँक शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करीत नसेल आणि ती रक्कम बँकेच्या मुदत ठेवीत जमा करीत असेल तर अशा अपप्रवृत्तीवर शासनाने पहिल्यांदा घाला घातला पाहिजे. मग इतर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व इतर संस्थांच्या बाबतीत शासनाने नंतर लक्ष द्यावे, अशी माझी नम्रपणे विनंती आहे. हे सांगण्याचा मथितार्थ इतकाच आहे की, आपण यासंदर्भातील आकडेवारी घ्यावी. अडीच हेक्टरपर्यंत किती लाभार्थी शेतकऱ्यांना कर्जमाफीचा फायदा मिळू शकेल. अडीच हेक्टरपर्यंत मागील सरकारने कर्जमाफी दिलेली आहे. आपण यावेळी मदत करण्याची मर्यादा एक हेक्टरपर्यंत खाली आणली आहे. नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी एक हेक्टरपर्यंत मदत देण्याची घोषणा केली होती. आघाडी सरकारने अडीच हेक्टरपर्यंत मदत दिलेली आहे. या शासनाने मधल्या काळात जी मदत घोषित केली ती फक्त एक हेक्टरपर्यंत देण्यात आलेली आहे. मी चुकत असेल तर आपण यामध्ये दुरुस्ती करावी मी माझे शब्द मागे घेण्यास तयार आहे. या सरकारने एक हेक्टरपर्यंत मदत घोषित केली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे...

सभापती महोदय, या शासनाने सावकारांकडून शेतकऱ्यांनी घेतलेले कर्ज माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत मला समजले नाही की, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत पीक कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले तर आपण बँकांची भर केली असे म्हणतात. सावकारांकडून शेतकऱ्यांनी घेतलेले कर्ज माफ करीत असताना नेमकी आपण कोणाची भर करीत होता. असा प्रश्न या निमित्ताने सर्वांच्या समोर उपस्थित होतो. सावकारांना सरकारने नेमकी किती रक्कम दिली याची आकडेवारी अद्याप बाहेर आलेली नाही. सावकारी कायद्यात शेत गहाण ठेऊन शेतीसाठी कर्ज देण्याची व्यवस्था नाही. सावकाराकडून शेतकऱ्यांनी घेतलेले कर्ज सरकार जर बळजबरीने सावकाराला देण्यासाठी गेले तर त्या सावकाराला भीती वाटेल की, दोन तीन महिन्यानंतर सरकार आपल्यावर फौजदारी खटला दाखल करील काय ? त्यापेक्षा सरकारकडील पैसा नकोच असे ते म्हणतात यामध्ये किती खरे व किती खोटे याची मला माहिती नाही. परंतु ही वस्तुस्थिती आहे. निदान ही आकडेवारी तरी महाराष्ट्रातील जनतेसमोर येऊ द्यावी. नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात सावकारांकडील 200 कोटी रुपयांचे कर्ज माफ केल्याची घोषणा आपण केली होती. आता पावसाळी अधिवेशन सुरु आहे, यासंदर्भातील निर्णय उशिरा झाला, मार्च, एप्रिल किंवा मे महिन्यात झाला असेल, हा काही टीकाटिपणीचा विषय होऊ शकत नाही. या सरकारने जेव्हा निर्णय घेतला त्या दिवसापासून आजपर्यंत नेमक्या किती शेतकऱ्यांचे सावकारांकडील किती रकमेचे कर्ज माफ केले याची आकडेवारी देणे गरजेचे आहे, अशी सर्व सन्माननीय सदस्यांची अपेक्षा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना दूबार पेरणी करण्यासाठी हे सरकार हेक्टरी 1500 रुपये मदत करणार आहे. मुख्यमंत्री महोदय आपणाला देखील माहिती आहे की, 1500 रुपये म्हणजे एकरी 600 रुपयांत दूबार पेरणी होऊ शकेल काय ? आता हवामान खात्याने असा अंदाज सांगितला आहे की, विदर्भ, मराठवाडा, खानदेश व पश्चिम महाराष्ट्रात पाऊस पडणार नाही. हे सर्व अंदाज चुकीचे ठरोत, कारण आतापर्यंत हवामान खात्याचे सर्व अंदाज चुकीचे ठरले आहेत. दूबार पेरणीसाठी प्रती हेक्टरी 1500 रुपये देऊन त्याचे काय फलीत होणार आहे याचा देखील विचार सरकारने आताच करण्याची आवश्यकता आहे. अधिवेशनाच्या निमित्ताने आपणाला चर्चा करता येते. भाजप, शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व इतर अन्य राजकीय पक्षाचे सन्माननीय

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे...

सदस्यांना आपल्या मतदारसंघातील शेतकऱ्यांची नेमकी परिस्थिती काय आहे, याची पूर्ण जाणीव आहे. यासंदर्भात शासन ज्या उपाययोजना करणार आहे त्याबाबत नेमका शेतकऱ्याला काय फायदा होणार आहे, हे समजणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, मृदुसंधारणाची योजना मागील काळात सुरु करण्यात आली आहे. दरवर्षी पाच हजार कोटी रुपये शेती विकासासाठी देण्यात येतील. मृदुसंधारण विभाग निर्माण झाल्यानंतर शेतकऱ्याच्या बांधापासून शेतीची दुरुस्ती करण्याचा अंतर्भाव आहे. शेती विकासाठी हे सरकार पाच हजार कोटी रुपये दीर्घकालीन उपाययोजना करण्यासाठी देणार आहे. नेमक्या कोणत्या उपाययोजना करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांच्या पीक पध्दतीत काही बदल होणार आहे काय ? शेतकऱ्यांच्या उत्पादनात काही फरक पडणार आहे काय ? पाऊस पडला नाही तरी शेतीचा विकास होऊन आपोआप काही उत्पन्न येणार आहे काय ? या सर्व गोष्टींची स्पष्टता महाराष्ट्रातील जनतेसमोर येणे आवश्यक आहे. टीकाटिपणी करणे सोपे असते, घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री, माननीय महसूल मंत्री व माननीय अर्थमंत्री यांची वक्तव्ये मी अनेक वेळा ऐकली आहेत, अर्थमंत्री महोदयांनी अर्थसंकल्प मांडल्यानंतर तीन महिन्यात किंवा सहा महिन्यात आघाडी शासनाने पाच ते सहा हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या होत्या. त्यावेळी आपण सर्व सन्माननीय सदस्य आमच्यावर शाब्दीक भडीमार करीत होता. आज आपल्या सरकारचा अर्थसंकल्प मांडून तीन महिने किंवा 100 दिवस देखील झाले नाही तर आपण 14 हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या आहेत...(अडथळा)... मंत्री महोदय आपण मला नंतर जरुर दाखवा आता मला डिस्टर्ब करु नका. 14 हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या कशासाठी आहेत, यामध्ये एलबीटीसाठी तरतूद करण्यात आली, टोल माफीसाठी तरतूद करण्यात आली, माझ्या गरीब शेतकऱ्यासाठी एक रुपयांची तरतूद करण्यात आलेली नाही...(अडथळा).. हे फक्त बोलण्यापुरते आहे, मुख्यमंत्री महोदय, टोल माफी करणे आवश्यक आहे, ज्यावेळी करावयाची असेल तेव्हा आपण जरुर टोलमाफी करावी. एलबीटी संदर्भात देखील

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे...

आपण निर्णय घेतला तो देखील आम्ही मान्य करतो. परंतु मागील सरकारने आम्हाला कर्जबाजारी करून ठेवले अशी सबब तरी का सांगत आहात ? अशा सबबी आपण सांगू नका. मुख्यमंत्री महोदय, आपणाला व माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे व माननीय मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार यांना देखील एक गोष्ट ज्ञात आहे की, या राज्याची कर्ज घेण्याची क्षमता अजून आहे. किती कर्ज घ्यावे व किती कर्ज घेऊ नये हा एक वेगळा व धोरणात्मक निर्णय असणार आहे. या देशात अशी मोजकी राज्य आहेत की, त्यांची बाजारातील पत व कर्ज घेण्याची क्षमता शाबूत आहे त्यामध्ये महाराष्ट्र राज्य आहे. याचा अभिमानाने उल्लेख मी चर्चेच्या माध्यमातून करीत आहेत. या सरकारच्या मनात शेतकऱ्यांबाबत अंत:करणापासून कळवळा असेल तर आपण एक वेळा कर्जमाफी करा. ज्या दीर्घकालीन उपाययोजना करायच्या आहेत त्या आपण कराव्यात. शेतकऱ्यांच्या शेती मालाला भाव देण्याच्या दृष्टीने देखील विचार करावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, या शासनाने सांगितले की, आधारभूत किंमतीप्रमाणे शेतकऱ्यांकडून धान्य खरेदी करण्यात येईल. मुख्यमंत्री महोदयांनी भातासाठी बोनस वाढविण्याचा निर्णय मे महिन्यात घेतला आहे. येथे सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील व सन्माननीय सदस्य श्री.अनील तटकरे उपस्थित आहेत, आमचा रायगड जिल्हा भात उत्पादक आहे. ऑक्टोबर व नोव्हेंबर महिन्यात भाताचे पीक येते. नोव्हेंबर व डिसेंबर महिन्यापासून भात खरेदी सुरु होते. या वर्षी राज्य सरकारने एक क्विंटल देखील भात खरेदी केला असे मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले तर मी पुन्हा या चर्चेत भाग घेणार नाही असे देखील या निमित्ताने मी सांगू इच्छितो. मे महिन्याच्या अखेरीस 100 रुपये बोनस धासनाने जाहीर केला आहे. त्यावेळी खरीपातील भात शेतकऱ्यांनी व्यापाऱ्याला विकला होता. दूबार भाताचे पीक देखील बाजारात गेले होते. त्यानंतर बोनस जाहीर करण्यात आला. त्यामुळे प्रत्यक्षात आमच्याकडे भात खरेदी सुरु झालेली नाही. विदर्भातील काही ठिकाणी भात खरेदी सुरु झाली असेल तर ते आपण सांगावे. मी रायगड जिल्ह्याचे उदाहरण सांगत आहे. शेतीमालाला किमान आधारभूत किंमत यासाठी देण्यात येते की, व्यापाऱ्यांनी बाजारात दर पाडून शेतकऱ्याची फसवणूक होत असेल तर सरकार आधारभूत किंमतीने शेतकऱ्यांकडील माल खरेदी करणार. शेतकऱ्यांच्या पाठीमागे उभे राहण्याची भूमिका आघाडी सरकारची देखील

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे...

होती. कापूस एकाधिकार खरेदी योजना स्व.वसंतराव नाईक यांनी सुरु केली होती, त्यामागे देखील हेच धोरण होते. आता सरकारने इंटिग्रेटेड टेक्सटाईल्स पार्क उभारण्याची घोषणा केली आहे, ही चांगली योजना आहे. चांगल्या योजनेचे आम्ही निश्चित स्वागत करतो, यामध्ये दुमत असण्याचे काही कारण नाही. शेतकऱ्यांच्या कापसाला किमान आधारभूत किंमत मिळण्याची शाश्वती दिली तर इंटिग्रेटेड टेक्सटाईल्स पार्कमध्ये कापूस येईल. कापूस जसा पिंजला जातो तसा कापूस उत्पादक शेतकरी अगोदर पिंजला गेला तर तो कापूस लावण्याचे धाडस करणार नाही. शेतकऱ्याचे धाडस व आत्मविश्वास वाढविण्याचे काम हे सरकार कृतीतून करुन दाखवील असा विश्वास या निमित्ताने मी व्यक्त करु इच्छितो. जास्त बोलून मी सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही. सरकारला माझी हात जोडून विनंती आहे की, हा प्रश्न व्यक्तीगत प्रतिष्ठेचा करु नका. काल विधानसभेत काय बोलला तो विषय प्रतिष्ठेचा करु नका. मुख्यमंत्री महोदयांनी कर्जमाफीची घोषणा करावी अशी माझी आपणाला हात जोडून विनंती आहे.

या नंतर श्री.भोगले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे.....

पण हात जोडून विनंती करताना माननीय मुख्यमंत्र्यांना त्यांच्याच शब्दात शेतकऱ्यांच्या आणि सभागृहाच्या वतीने सांगतो की, Now enough is enough. शेतकऱ्यांना कर्जमाफी एवढीच घोषणा तुम्ही करावी. तुमचे स्वागत करण्यासाठी आम्ही उभे आहोत. तुम्ही हे केले नाही तर तीव्र शब्दात आम्ही धिक्कार करु एवढेच या चर्चेच्या माध्यमातून बोलतो आणि सरकारकडून महाराष्ट्राच्या बळीराजाला निश्चितपणे तुम्ही न्याय द्याल अशी भाबडी आशा व्यक्त करुन थांबतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

वैयक्तिक स्पष्टीकरण करण्यासंबंधी

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सदनामध्ये एखाद्या माननीय सदस्यांचे नाव जरी घेतले गेले तर त्याला आपले म्हणणे मांडू देण्यासाठी प्रसंगी मंत्री महोदयांना देखील थांबविले जाते. काल माननीय मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत उत्तर देत असताना माझ्या नावाचा उल्लेख केला त्या संदर्भात मला म्हणणे मांडावयाचे आहे.

सभापती : माननीय मुख्यमंत्र्यांचे उत्तराचे भाषण संपल्यानंतर आपल्याला संधी दिली जाईल.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना नीट संधी द्यावी. याचे कारण असे की, खालच्या सभागृहात जे बोलले त्यावर या ठिकाणी हक्कभंगाचा प्रस्ताव आणता येत नाही. या ठिकाणी त्यांना माझ्याविरुध्द हक्कभंगाचा प्रस्ताव आणता यावा म्हणून मी स्पष्टीकरण देतो. म्हणजे माननीय सदस्य माझ्याविरुध्द हक्कभंगाचा प्रस्ताव आणू शकतील.

...3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, म.वि.प.नियम 260 अन्वये या सभागृहामध्ये कृषी विषयक प्रस्ताव विरोधी पक्षाच्या वतीने मांडण्यात आला, त्यावर माननीय विरोधी पक्षनेते श्री.धनंजय मुंडेजी, माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस, माननीय काँग्रेसचे माजी अध्यक्ष आणि ज्येष्ठ नेते श्री.माणिकराव ठाकरेजी, माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे, माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत रघुवंशी, अमरसिंह पंडित, महादेव जानकर, कपिल पाटील, रामहरी रूपनवर, विनायक मेटे, ख्वाजा बेग, माननीय सदस्य ॲड.जयदेव गायकवाड, माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे, माननीय सदस्य सर्वश्री विक्रम काळे, प्रकाश गजभिये आणि de-facto विरोधी पक्षनेते श्री.सुनील तटकरे यांनी या ठिकाणी अतिशय पोटतिडकीने शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आपली भूमिका मांडली आहे. अनेक सल्ले देखील देण्यात आले, सूचना दिल्या गेल्या आणि टीका देखील करण्यात आली.

प्रामुख्याने ही गोष्ट कोणीच नाकारु शकत नाही की, महाराष्ट्र गेली काही वर्षे कृषीच्या संदर्भात मोठया संकटातून चालला आहे. विशेषत्वाने देशामध्ये कृषी उत्पादनामध्ये गेली अनेक वर्षे वाढ झाली असली तरी महाराष्ट्राचा गेल्या 3-4 वर्षात सातत्याने कृषी क्षेत्रात निगेटिव्ह ग्रोथ रेट आहे. त्यामुळे कृषी विषयक संकट महाराष्ट्रासमोर आहे. खरे म्हणजे या वर्षी सुरुवातीला अतिशय चांगला पाऊस पडला. त्याबद्दल आपल्याला सगळ्यांना समाधान वाटले. शेतकऱ्यांनी देखील बऱ्याच ठिकाणी पेरणी केली. दुर्दैवाने मध्ये मोठा ड्राय स्पेल तयार झाला. आता केलेल्या पेरण्यांचे नेमके काय होईल अशी स्थिती निर्माण झाली. त्या संदर्भातील वस्तुस्थिती मी सभागृहासमोर ठेवतो.

सभापती महोदय, खरीप पिकाखालील ऊस वगळता आपले क्षेत्र 134.70 लाख हेक्टर आहे. दिनांक 1 जून ते 20 जुलै, 2015 या दरम्यान जो सरासरी पाऊस पडला तो 55 टक्के इतका आहे. राज्यातील नाशिक, जळगाव, सोलापूर, कोल्हापूर, बीड, लातूर, उस्मानाबाद, परभणी, बुलडाणा, अकोला आणि यवतमाळ या 11 जिल्हयात 50 टक्क्यापेक्षा कमी पाऊस पडला. जवळजवळ 19 जिल्हयांमध्ये या दरम्यान 50 ते 75 टक्के पाऊस पडला आहे. एकूण पेरण्यांची स्थिती पाहिली तर 134.70 लाख हेक्टरपैकी दिनांक 19 जुलै, 2015 पर्यंत 101.77 लाख हेक्टरवर म्हणजे 76 टक्के क्षेत्रावर पेरणी झालेली आहे. भात पिकाखालील केवळ 20 टक्के पेरण्या होऊ शकलेल्या आहेत. कोकणामध्ये 15 टक्के, नाशिकमध्ये 77 टक्के, पुणे विभागात 53

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

टक्के, कोल्हापूर विभागात 73 टक्के, औरंगाबाद विभागात 97 टक्के, लातूर विभागात 80 टक्के, अमरावती विभागात 84 टक्के व नागपूर विभागात 59 टक्के पेरण्या झालेल्या आहेत. काल मी माहिती घेतली त्यावरून हवामानाचा ताजा अंदाज पाहिला तर हवामान खाते आपल्याकडे चार दिवसांचा अंदाज देते. आत जो चार दिवसांचा अंदाज दिला आहे त्यामध्ये 20 ते 24 जुलै दरम्यान कोकणामध्ये सर्वदूर पाऊस पडण्याची शक्यता असून काही ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रात सर्वदूर मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याचा अंदाज असून तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. मराठवाड्यामध्ये तुरळक ठिकाणी हलका पाऊस, काही ठिकाणी मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. विदर्भात सर्वदूर पाऊस पडण्याचा अंदाज असून काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे.

साधारणपणे कालपासून पावसाने आपल्यावर थोडी कृपा केल्यासारखे दिसते. त्यातून लॉंग टर्म फोरकास्ट पाहिल्यास ऑगस्टमध्ये पहिल्या आठवड्यात चांगला पाऊस पडेल असे सांगण्यात आले आहे. दुबार पेरण्याची वेळ आली तर त्याकरिता आपले नियोजन असले पाहिजे. म्हणून त्याचा अंदाज आपण काढला आहे. त्याची आपत्कालीन योजना तयार केली आहे. आकस्मिक प्लॅनच्या अंतर्गत 27 जुलैपर्यंत चांगला पाऊस पडला नाही तर एकूण 22 लाख हेक्टर क्षेत्रावर दुबार पेरणी करावी लागेल. हाच पाऊस 31 जुलैपर्यंत नीट पडला नाही तर 27.25 लाख हेक्टरवर आपल्याला दुबार पेरणी करावी लागेल.

साधारणपणे भात पीक वगळता नाशिक विभागात 2.43 लाख, पुणे विभागात 3.7 लाख, औरंगाबाद विभागात 4.95 लाख, लातूर विभागात 4.65 लाख, अमरावती विभागात 9.61 लाख, नागपूर विभागात 2.08 लाख अशा प्रकारे 24 लाख हेक्टर क्षेत्रावर दुबार पेरणी करावी लागेल. त्यामुळे 31 जुलैपर्यंत पेरणी करावयाची झाल्यास भात, बाजरी, सोयाबीन, मका, तूर, सूर्यफूल आणि कापूस याची पेरणी करावी लागेल. त्यासाठी 6.11 लाख क्विंटल बियाणे आपल्याकडे उपलब्ध आहे. 50 लाख कापूस बियाण्यांची पाकिटे उपलब्ध आहेत. यामधून एकूण 40 लाख हेक्टरवर दुबार पेरणी करता येईल एवढे बियाणे आज उपलब्ध आहे. त्याशिवाय 1 ऑगस्ट नंतर पेरणी करावी लागली तर बाजरी 10 लाख, तूर 5 लाख, मका 10 लाख हेक्टरचे नियोजन केले

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

आहे. भात पिकाचे सामुहिक रोपे वाटपाचे नियोजन राष्ट्रीय कृषी विकास कार्यक्रमांतर्गत करण्यात आले आहे.

नंतर यू.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस...

हेक्टरी 1500रूपये मदत आपण दुबार पेरणीसाठी देत असून त्याचा मघाशी उल्लेख करण्यात आलेला आहे. ही मदत आपण बियाण्यांकरिता देत आहोत. नॉन बीटी बियाण्याचे एक किलोचे पाकीट साधारणपणे 350 रूपयाला मिळते. ते आपल्याला एक एकराकरिता वापरता येते. आपण थोडे पलीकडे गेलो तर मका आणि बाजरी यांच्या बियाणांचे एक किलोचे पाकीट 100 रूपयाला मिळते. मला माहीत आहे की, आपण 1500 रूपयात काही सोने देत नाही. सोयाबीनचा देखील साधारणपणे तोच भाव आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, विदर्भामध्ये सोयाबीन आणि कापूस ही दोन पिके आहेत.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, आता ज्या पेरण्यांचे नियोजन होऊ शकते त्या संदर्भातच आपण बोलतो आहोत. ज्याचे आपण नियोजन होऊ शकत नाही, त्या संदर्भात बोलत नाही.

सभापती : माननीय मुख्यमंत्र्यांना डिस्टर्ब करणे बरोबर नाही.

श्री.देवेंद्र फडणवीस : थँक्यू सर. त्यामुळे आपण एकीकडे हे नियोजन केले आहे. चाऱ्याच्या संदर्भात आपण नियोजन केले आहे. यासोबत आपण पाण्याचे देखील नियोजन केले आहे. प्रत्येक विभागीय आयुक्तांना शासनाचे अधिकार कायम स्वरूपी डेलिगेट केलेले आहेत. विभागीय आयुक्तांना आवश्यकता वाटेल तेव्हा ते अधिकार तहसीलदार यांना डेलिगेट करू शकतात. त्यामुळे त्यांना आता शासनाकडे येण्याची आवश्यकताच नाही. औरंगाबाद विभागातील आठही जिल्ह्यांमध्ये तहसीलदारांना ते अधिकार डेलिगेट केलेले आहेत. नाशिक विभागामधील तीन जिल्ह्यांमध्ये हे अधिकार डेलिगेट केलेले आहेत. पुणे विभागात एका जिल्ह्यात हे अधिकार डेलिगेट केलेले आहेत. अमरावती विभागात हे अधिकार तीन जिल्ह्यांमध्ये डेलिगेट करण्यात आले आहेत. त्याचाही पूर्ण प्लॅन तयार करण्यात आलेला आहे. मी पुन्हा सगळा प्लॅन सांगून या सभागृहाचा वेळ घेणार नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस...

आज आपण कृषी संकटासंबंधात चर्चा करीत आहोत. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी नेहमीच्या शैलीमध्ये अतिशय प्रभावीपणे भाषण करून सगळा इतिहास आपल्या समोर मांडला आहे. त्यांनी कशा प्रकारे श्रीमती इंदिराजी गांधी, श्री.वसंतराव नाईक, श्री.यशवंतराव चव्हाण यांच्या काळात काम कसे झाले ते सांगितले आणि ते खरे आहे. पण हेच काम आपण नीट केले असते तर आज या कृषी संकटामध्ये आपण सापडलो नसतो. आपण भटकलो. आपण भटकल्यामुळेच आज हे संकट आपल्यापुढे आलेले आहे.

श्री.दिवाकर रावते (बसून) : भटकलो नाही भरकटले.

श्री.देवेंद्र फडणवीस : भटकलो हा आपल्या विदर्भाचा शब्द आहे. सभापती महोदय, आज कर्ज माफीची मागणी करण्यात आली आहे. ती मागणी करण्यापूर्वी आपल्याच केंद्र व राज्य शासनाने 15 वर्षापूर्वी वेगवेगळ्या समित्या तयार केल्या होत्या. मग ती आदर्श मिश्रा यांची समिती असो, जाधव समिती असो, स्वावलंबन मिशन समिती असो. या सर्व समित्यांचे अहवाल आपण नीट वाचले असते तर आपल्या लक्षात आले असते की, नेमकी अडचण काय आहे, महाराष्ट्रातील शेतकरी संकटात का आहे आणि त्यावर उपाययोजना काय आहे हे कळले असते. दुर्दैवाने आपण समित्या तयार केल्या पण त्यांच्या अहवालाचे वाचन केले नाही. त्यामुळे मागणी करताना आपले कुठे चुकते आहे हे आपल्या लक्षात आले नाही. या विविध समित्यांच्या अहवालांनी काय सांगितले होत त्यांनी पहिल्यांदा सांगितले होते की,शेतकऱ्याला कर्ज उपलब्ध झाले पाहिजे. दुसरे सांगितले की, शेतकऱ्याला सिंचनाच्या सोयी मिळाल्या पाहिजेत. वीज कनेक्शन मिळाले पाहिजे. फूड सिक्युरिटी मिळाली पाहिजे. आरोग्य सेवा, जोडधंद्या आणि शेती मालाला उचित भाव मिळाला पाहिजे. या सर्व बाबी समित्यांनी सांगितल्या आहेत. या शेतकऱ्यांसमोरील मुख्य अडचणी असून तीच आत्महत्येची कारणे आहेत असे देखील अहवालात नमूद केले आहे. दुर्दैवाने आपण या समित्यांच्या अहवालाकडे कधीच लक्ष दिले नाही. आपण कर्ज माफीच्या संदर्भात बोलला आहात. सन 2008 आणि 2009 या दोन वर्षात दोन टप्प्यांमध्ये केंद्र व राज्य सरकारने कर्ज माफी केली आहे. त्यानंतर मग राज्य सरकारने त्यात भर घातलेली आहे. अशी सगळी मिळून साधारणपणे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस...

7000 कोटी रूपयांची कर्ज माफी आहे हे मी ढोबळ मानाने सांगत आहे. पहिला टप्पा सन 2008 सालातील आहे. त्यावेळी 5800 कोटी रूपयांची आणि मग 2000 कोटी रूपयांची अशी मिळून एकूण 7800 कोटी रूपयांची कर्ज माफी देण्यात आलेली आहे. ही कर्ज माफी आपण आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या नावाने दिलेली आहे. त्यावेळी आपण सांगितले होते की, आत्महत्या मोठ्या प्रमाणावर होत आहेत, शेतकरी कर्ज बाजारी आहे, त्यामुळे आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याला मुक्त करण्याकरिता कर्ज माफी करण्यात येत आहे. दुर्दैवाने विदर्भ, मराठवाडा या विभागांना किती हिस्सा मिळाला आहे ? या विभागांना फक्त 17 टक्के हिस्सा मिळाला आहे. तर पश्चिम महाराष्ट्राला 52 टक्के कर्ज माफीचा हिस्सा मिळाला आहे. ही सगळी आकडेवारी मी पुन्हा पुन्हा सांगणार नाही. कारण ही आकडेवारी मी कालही मांडलेली आहे. पाहिजे असेल तर ती आकडेवारी मी पुन्हा मांडतो. ज्यांच्या नावाने आपण कर्ज माफी घेतली त्यांना या कर्ज माफीचा फायदाच मिळाला नाही. तो का मिळाला नाही. आत्महत्येवरचा रामबाण उपाय म्हणजे कर्जमाफी आहे असे आपण मानतात. मी आपणास सांगू इच्छितो की, आपल्या सरकारने कर्ज माफी दिल्यानंतर सन 2009 मध्ये 1605 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. सन 2010 मध्ये 1741 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. 2009 ते 2014 या कालावधीमध्ये 9614 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. हा रामबाण उपाय होता तर मग या आत्महत्या का थांबल्या नाहीत. याचे कारण असे होते की, या चार समित्यांचे अहवाल न वाचता किंवा जाणीव पूर्वक या समित्यांनी ज्या उपाययोजना सुचविल्या होत्या त्यावर कधीच कारवाई करण्याचा प्रयत्न केलेला नाही. आपण वास्तविकता समजून घ्यावी. विदर्भामध्ये 29 लाख शेतकरी आहेत. मराठवाड्यामध्ये 31 लाख शेतकरी आहेत. आपण विदर्भ, मराठवाडा या मागास भागाचा विचार करतो. उत्तर महाराष्ट्र व पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळी भाग देखील यात आहेत. आज आपण आत्महत्येचा जास्त विचार करत असल्याने मी जाणीव पूर्वक विदर्भ आणि मराठवाड्यातील आकडेवारी आपल्या समोर ठेवत आहे. त्यातील भीषण सत्य काय आहे हे आपण समजून घेतले पाहिजे. विदर्भामध्ये 29 लाख शेतकरी आहेत. मराठवाड्यामध्ये 31 लाख शेतकरी आहेत. असे एकूण 60 लाख शेतकरी आहेत. आपल्याला आश्चर्य वाटेल की, 60 लाख

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस...

शेतकऱ्यांपैकी कधी तरी कर्ज मिळाले आहे अशा शेतकऱ्यांची संख्या फक्त 25 लाख इतकी आहे. म्हणजे 35 लाख शेतकरी असे आहेत की, 60 टक्के शेतकरी असे आहेत की, त्यांना श्री.तटकरे साहेब तुमच्या व्यवस्थेतून कधीच कर्ज मिळालेले नाही. या समित्यांनी हेच सांगितले आहे. त्यांनी कर्ज माफी करावे हे सांगितले नाही. त्यांनी सांगितले की, तुमच्या इन्स्टिटयुशनल नेटवर्कच्या बाहेरील जे शेतकरी आहेत त्यांना जो पर्यंत कर्ज देणार नाहीत, या शेतकऱ्यांना इन्स्टिटयुशनल फायनान्सच्या परिघामध्ये आणणार नाहीत तो पर्यंत खऱ्या अर्थाने आपण शेतीवरचे संकट दूर करू शकणार नाही. आता आपण कर्ज माफी कोणाची करणार आहोत ? 35 लाख शेतकरी म्हणजे 60 टक्के शेतकरी यांना कधीच कर्ज मिळालेले नाही. त्यांची कर्ज माफी कशी करणार आहात ? 60 टक्के लोकांना डावलून कर्ज माफी केली तर त्याचा नेमका उपयोग हा या 60 टक्के लोकांना कसा होणार आहे. त्यामुळे आपण दुसरा आकडा लक्षात घेतला पाहिजे. विदर्भात मागच्या खरीपाच्या हंगामामध्ये 6 लाख शेतकऱ्यांना कर्ज मिळाले होते. आता या हंगामामध्ये 7 लाख शेतकऱ्यांना कर्ज मिळाले आहे. मराठवाड्यामध्ये मागच्या हंगामामध्ये 3.25 लाख शेतकऱ्यांना कर्ज मिळाले होते. आता 7.63 लक्ष शेतकऱ्यांना कर्ज मिळाले आहे. म्हणजे दुपटीने कर्ज मिळाले आहे.

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय,...

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे आपण ज्येष्ठ सदस्य आहात. मुख्यमंत्र्यांच्या पदाचा आपल्याला मान ठेवावयास पाहिजे. राईट ऑफ रिप्लायमध्ये आपल्याला बोलण्याची संधी दिली जाईल. आता आपण जे काही बोलत आहात ते बरोबर नाही.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मुख्यमंत्र्यांनी यावर्षी मागच्या वर्षापेक्षा जास्त कर्ज दिले अशी माहिती दिलेली आहे. परंतु सन 2008 व 2009 मध्ये कर्जमाफी दिली होती त्याच्या दुसऱ्या वर्षी किती शेतकऱ्यांनी कर्ज घेतले होते याची माहिती दिली तर अधिक चांगले होईल.

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांना समजले पाहिजे म्हणून मी सांगू इच्छितो की, सर्व मिळून आपण 25 लाख शेतकऱ्यांवर कर्ज माफी देऊ शकत नाही. आजपर्यंत केवळ 25 लाख शेतकऱ्यांनी कर्ज घेतलेले आहे. 35 लाख शेतकऱ्यांना तुम्ही कर्जच दिलेले नाही. आजपर्यंत 60 टक्के शेतकऱ्यांना तुम्ही कर्जच दिलेले नाही. सत्य कटू असले तरी ऐकून घ्यावे लागत असते व कटू सत्य ऐकून घेण्याची हिंमत ठेवावी लागत असते. माझे म्हणणे खोटे असेल तर उद्या सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी दुसरा हक्कभंग माझ्या विरुध्द आणावा. मी हक्कभंगाला उत्तर देण्यास तयार आहे.(अडथळा)

श्री. माणिकराव ठाकरे : हक्कभंगाचा विषय येतोच कोठे ?

सभापती : मुख्यमंत्री महोदय, आपण विषय कंन्टीन्यू करा. सदस्यांनी कृपया खाली बसावे. आपण जे काही बोलला आहात ते चुकीचे बोलला आहात. या विषयामध्ये आपण जवळपास 4.5 दिवस घालवले आहेत. या विषयाच्या संदर्भात आपण माननीय मुख्यमंत्र्यांकडून काही अपेक्षा केलेल्या आहेत. माननीय श्री. ठाकरे साहेब आपण ज्येष्ठ सदस्य आहात. सभागृहाची परंपरा आपल्याला पूर्णपणे माहिती आहे. राज्याचे मुख्यमंत्री बोलत असताना कोणीही उभे राहू नये. माननीय मंत्री महोदयांचे भाषण पूर्ण झाल्यानंतर आपल्याला बोलण्याची संधी मिळणार आहे. कृपया मुख्यमंत्र्यांच्या भाषणाची लिंक तोडू नका.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, मागच्या वर्षी विदर्भामध्ये 3925 कोटी रुपयांचे कर्ज वाटप झाले होते परंतु यावर्षी 4743 कोटी रुपयांचे कर्ज वाटप झालेले आहे. मागील वर्षी मराठवाडयामध्ये 1749 कोटी रुपयांचे कर्जवाटप झाले होते, यावर्षी ते 3495 कोटी रुपयांचे झाले आहे. नव्याने कर्ज कधी मिळते ? एक तर जुने कर्ज परत केले असेल तेव्हा नवीन कर्ज मिळते किंवा कर्ज रि शेडयुअल केले असेल तेव्हाच नवीन कर्ज मिळते. शेतकरी मोठया प्रमाणात कर्ज घेत असून शेतकरी ऑगस्ट महिन्यापर्यंत कर्ज घेणार आहेत. खरे म्हणजे 60 टक्के शेतकरी कर्ज घेत नसल्यामुळे ते बाहेर आहेत. अशा परिस्थितीमध्ये आपण नेमकी कर्जमाफी कोणासाठी मागत आहात ? हा प्रश्न या ठिकाणी उपस्थित होतो. कर्जमाफी केली तर ज्याने कर्ज घेतलेले असते त्याला बरेच वाटते. कर्जमाफी केली तर कर्ज घेणाऱ्याला वाईट वाटत नाही. ज्यावेळेस एखादे साधन आपण वापरतो त्यावेळेस त्या साधनाचा वापर कोणासाठी केला जातो याचा देखील विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, मला राष्ट्रीयकृत बँकावर कर्ज देण्याच्या संदर्भात सक्ती का करावी लागली ? मी सहकारी बँकाच्या बाजूचा आहे. परंतु दुर्दैवाने विदर्भ, मराठवाडयातील सहकारी बँका काही लोकांनी खाऊन टाकल्या, लुटून टाकल्या आहेत. आज बुलडाण्याची बँक, नागपूरची बँक, वर्ध्याची बँक, बीडची बँक लुटून टाकण्यात आल्या आहेत. या बँकाची आज काय अवस्था आहे याची आपल्याला माहिती आहे. आज सहकारी बँका कर्ज देऊ शकत नाही अशी परिस्थिती. आपण एक गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे की, बँकाच्या संदर्भात आपल्या राज्यात आणि इतर राज्यात फरक काय आहे ? इतर राज्यांमध्ये जास्त कर्ज पुरवठा नॅश्नलाईज आणि कमर्शिअल बँका करीत असतात व कमी कर्ज पुरवठा सहकारी बँका करीत असतात. आपल्या राज्यामध्ये सहकाराचे जाळे आपण मजबूत केले होते त्यामुळे आपल्या राज्यात कमर्शिअल आणि नॅन्शलाईल बँकाचे जाळे ग्रामीण क्षेत्रात उभे राहू शकले नाही. आपले सर्व फंडींग,लँडींग सहकारी बँकाच्या माध्यमातून होत होते. तटकरे साहेब आपण म्हणता की, कारवाई करा, कारवाई करा. मी आपल्याला सांगू इच्छितो की, कारवाई होईलच, पण कारवाई करुन देखील आज शेतकऱ्यांवर जी अवस्था आली आहे ती फार वाईट आहे. एक बँक उध्वस्त झाल्यानंतर एका दिवसात त्या ठिकाणी दुसरी बँक ऊभी राहू शकत नाही. त्या ठिकाणी एका दिवसात राष्ट्रीयकृत बँकेची शाखा उघडता येत नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस .....

एका दिवसामध्ये त्या ठिकाणी वेगळी व्यवस्था उभी राहू शकत नाही. ही सर्व व्यवस्था आपण उध्वस्त करुन टाकली आहे. आज शेतकऱ्यांची जी अवस्था झाली आहे त्याला केवळ निसर्ग जबाबदार नाही, हे अस्मानी संकट नाही तर ते सुलतानी संकट देखील आहे. बँका उध्वस्त केल्यामुळे आज शेतकऱ्यांवर ही अवस्था आली आहे.

सभापती महोदय, ज्या राष्ट्रीयकृत बँका शेतकऱ्यांना कर्ज देत नाहीत अशा बँकावर एफआयआर दाखल करण्याचे मी आदेश दिल्यामुळे या बँकावर एफआयआर दाखल झाले आहेत. यासंदर्भात आरबीआयने आम्हाला पत्र पाठवले की, "आम्ही चांगले काम करीत असल्यामुळे आमच्यावर एफआयआर दाखल करु नका." आम्ही त्यांना सांगितले की, "चांगल्या काम करणाऱ्या बँकाच्या विरुध्द आम्ही एफआयआर दाखल करणार नाही." परंतु बुलडाणा,वर्धा या भागातील बँका शेतकऱ्यांना काहीच कर्ज देण्यास तयार नाहीत. आज यवतमाळ सारख्या भागातील बँका शेतकऱ्यांना कर्ज देत नाहीत. अशा अवस्थेमध्ये नॅश्नलाईज बँकानी तरी कर्ज दिले पाहिजे म्हणून आम्ही या बँकावर एफआयआर दाखल करण्याचा निर्णय घेतल्यामुळे मागील वर्षापेक्षा या वर्षी जास्त शेतकऱ्यांना कर्ज मिळू शकले. खरे म्हणजे शेतकऱ्यांना अजून कर्ज मिळाले पाहिजे. आम्ही अजून समाधानी नाही. या बँका अडचणीत असताना एमएस कोऑपरेटीव्ह बँकेने अट टाकली की, जर या बँकाना रि-फायनांसचे पैसे द्यावयाचे असतील तर, राज्य सरकारने हमी दिली पाहिजे. यासंदर्भात आम्ही तातडीने कॅबिनेटची बैठक बोलावून त्यामध्ये 500 कोटी रुपयांची हमी दिली व त्यांना सांगितले की, तुम्ही बँकाना पैसे द्या. खरे म्हणजे आमच्या सहकारी बँकाच आमच्या शेतकऱ्यांच्या पाठीशी उभ्या राहतात नॅश्नलाईज बँका आमच्या शेतकऱ्यांच्या पाठीशी उभ्या राहत नाहीत. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात आपण आत्मचिंतन करणार आहोत की, नाही ?

सभापती महोदय, कर्ज माफीच्या संदर्भात या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. मी फार डिटेलमध्ये जाणार नाही. परंतु मागच्या कर्जमाफीमध्ये नेमके काय झाले होते ? मी अगोदरच सांगितले आहे की, गरीब शेतकऱ्याला किंवा विदर्भ, मराठवाडयातील गरीब शेतकऱ्याला एकंदर किती फायदा मिळाला हे आपण बघितले आहे. परंतु या योजनेचे नेमके काय झाले ? या विषयाच्या संदर्भात कॅगने रिपोर्ट सादर केला असून त्यामध्ये

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस .....

त्यांनी म्हटले आहे की, "केंद्रशासन कृषी कर्ज माफी योजना 2008, महाराष्ट्र शासन कृषी कर्जमाफी योजना 2009 मध्ये पात्र लाभार्थ्यांना कर्जमाफी न देणे किंवा कर्जमाफीचा लाभ न देणे. अपात्र व्यक्तींना कर्जमाफीचा लाभ देणे." मी असे सांगू इच्छितो की, कर्जमाफीमध्ये काही लोकांनी आपली घरे भरण्याचे काम केले आहे. कॅगच्या रिपोर्टमध्ये पुढे असे म्हटले आहे की, "शेतकऱ्यांना थेट कर्जमाफी देत असतांना संस्थांना कर्जमाफी दिली गेली. कर्जाच्या कागदपत्रामध्ये खोडतोड, दुरुस्ती तसेच आवश्यक ते कागदपत्र न घेता अपूर्ण कागदपत्राच्या आधारे काही लोकांना कर्जमाफी देण्यात आली. काही वित्तीय संस्थांनी लिगल चार्जेस सारखी अपात्र रक्कम तसेच वसूल न झालेल्या व्याजाच्या रक्कमेवरही कर्जमाफी देऊन टाकली. काही बँकांनी लाभार्थ्यांना दुहेरी लाभ दिला.

यानंतर श्री.अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

श्री.देवेंद्र फडणवीस....

एकाच वित्तीय संस्थेमार्फत एकाच लाभार्थ्याला दोनवेळा लाभ देण्यात आला. पीक विमा योजनेंतर्गत जी काही रक्कम मिळाली होती, ती वजा न करता कर्जमाफी देण्यात आली. 20 हजार रुपयांवरील आवश्यक असलेली रक्कम भरणा करणे आवश्यक होते ती रक्कम भरणा न केलेल्यांना देखील कर्जमाफी दिली. एवढेच नाही तर खतावणीनुसार कर्ज बाकी कमी असताना जास्त रक्कम दाखवून खतावणीमध्ये खाडाफोड करुन कर्जमाफी देण्यात आली. बँकांनी शेतकऱ्यांना, सहकारी संस्थांना कर्ज दिलेले नसताना कर्ज दिल्याचे दर्शवून कर्जमाफी दिली आहे. तापी खोऱ्यातील उपसा जलसिंचन सहकारी संस्थाना दिलेल्या कर्जमाफीमध्ये व्याजाच्या रकमेचे मुदलीकरण करणे अपेक्षित नसताना तसा जमाखर्च करुन कर्जमाफी दिलेली आहे. ग्रीन हाऊस योजनेंतर्गत ज्यांना नुकतेच कर्ज मिळाले होते, त्यांनी एकही हप्ता भरला नव्हता, त्याचे कर्ज थकीतही नव्हते ,त्यांना देखील थकीत कर्ज दाखवून कर्जमाफी देण्यात आली आहे. कॅगचा रिपोर्ट आपल्या सर्वांसमोर मांडण्यात आलेला आहे. एकट्या कोल्हापूर सहकारी बँकेचा 120 कोटी रुपयांचा घोटाळा आहे. कोल्हापूरमध्ये दोन गुंठ्यावर 20 लाख रुपयांची कर्जमाफी करण्यात आली. असे हजारो कोटी रुपये आहेत. एकीकडे घोटाळे करुन सहकारी बँका, सहकारी संस्था तोट्यात आणायच्या आणि कर्जमाफीच्या माध्यमातून आपल्या संस्थांना पैसा पुरवावयाचा. अशाप्रकारच्या कर्जमाफीच्या माध्यमातून 60 टक्के शेतकऱ्यांना कोणताही उपयोग नाही. म्हणून आपण कर्जमाफीच्या अगोदर सर्वांनी पहिली मागणी केली पाहिजे की, हे जे 60 टक्के लोक आहेत, ज्यांना आम्ही कर्ज देऊ शकत नाही, त्यांना कर्ज कसे मिळेल या संदर्भात तरतूद करणे आवश्यक आहे. कारण आपण बँका संपविल्या आहेत, सोसायट्या संपविल्या आहेत.

सभापतीम महोदय, शेतकऱ्यांना नवीन कर्जाला पात्र करण्यासाठी आम्ही त्यांच्या कर्जाचे पुनर्गठन केले. हे पुनर्गठन करताना त्यामध्ये काही बदल केला. पूर्वी तीन वर्षासाठी पुनर्गठन केले जात होते. पहिल्या वर्षी 12 टक्के व्याज आकारले जात होते म्हणजे शेतकरी अजून अडचणीत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

यायचा. आम्ही तीन वर्षाऐवजी पाच वर्षाचे पुनर्गठन केले. पहिल्या वर्षाचे 12 टक्के व्याज राज्य सरकार भरेल. तर पुढील चार वर्षाचे सहा टक्के व्याज राज्य सरकार भरेल. 20 लाख शेतकऱ्यांनी.. (अडथळा). सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना मी सांगू इच्छितो की, मी, माहिती घेतल्याशिवाय बोलत नाही. आपण तोंडघशी पडाल.

सभापती महोदय, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री.रघुराम राजन ज्यांची नियुक्ती तत्कालीन माननीय पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांनी केली. ते काय म्हणाले ते मी वाचून दाखवितो.

"Farm loan waiver, a tool time and again used by politicians to appease the poor farmers on the pretext of helping them. Rajan asked a pertinent question, how effective these debt waivers have been, in fact the studies have typically showed that they have been ineffective, in fact they have constrained the credit flow post waiver to the farmers."

तेलंगणा राज्याने एक कर्जमाफीची योजना घोषित केली त्या संदर्भात त्यांचे हे वक्तव्य आहे. त्या योजनेचे नंतर काय झाले ते देखील सांगतो. कर्जमाफीची योजना घोषित केल्यानंतर तो खर्च 25 हजार कोटीच्या घरात आहे असे लक्षात आल्यावर सांगण्यात आले की, 1 लाख रुपयांपर्यंत कर्जमाफ करण्यात येईल. तरी देखील ते दायीत्व मोठे आहे असे लक्षात आल्यानंतर एका वर्षाकरिता माफ करण्यात येईल असे सांगण्यात आले. परंतु अजूनही ती कर्जमाफी होऊ शकली नाही. तेलंगणा राज्याने जी कर्जमाफी घोषणा केली त्यावर श्री.रघुराम राजन यांनी वरील प्रमाणे सांगितलेले आहे. या ठिकाणी काही सन्माननीय सदस्यांनी तेलंगणा राज्याचे उदाहरण दिले.

सभापती महोदय, खरे म्हणजे शेतीची अर्थव्यवस्था ही क्रेडीट बेस कर्ज पुरवठ्याची आहे. आपणाला गुंतवणूक आधारित अर्थव्यवस्थेकडे गेले पाहिजे. आपण शेतीतील गुंतवणूक करीत नाही. आपण शेतकऱ्यांना सक्षम करीत नाही. आपण त्यांना फक्त कर्ज पुरवठा करतो. मी या ठिकाणी ज्या समित्यांचे अहवाल सांगितले, त्या समित्यांनी देखील सर्वप्रथम या सर्व व्यवस्था उभ्या केल्या पाहिजेत असे सांगितले

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

सभापती महोदय, माननीय पंतप्रधान या ठिकाणी आले. त्यानंतर त्यांनी श्री.आदर्श मेश्राम यांना भेट देण्यासाठी पाठविले. श्री.मेश्राम यांनी जो रिपोर्ट दिला त्यामध्ये प्रामुख्याने दोन गोष्टी आहेत. पहिली गोष्ट म्हणजे आत्महत्याग्रस्त भागामध्ये सिंचनाच्या सोयी केल्या पाहिजेत. त्यासाठी माननीय पंतप्रधानांनी 5 हजार 857 कोटी रुपयांचा कार्यक्रम दिला. 88 सिंचन प्रकल्प पूर्ण करुन 1 लाख 15 हजार 740 हेक्टर क्षेत्राला सिंचन देणे अपेक्षित होते. यातील काही एक-दोन प्रकल्प पूर्ण झाले तर काही प्रकल्पांचे काम अर्धवट राहिले. ही परिस्थिती 2008 मधील आहे. आज 2015 सुरु आहे. इतक्या वर्षामध्ये फक्त 20 हजार हेक्टर क्षेत्रावर सिंचन झाले म्हणजे फक्त 13 टक्के सिंचन झाले. आपण शेतकऱ्यांना पाणी देणार नाही, वीज देणार नाही, मग शेतकरी खऱ्या अर्थाने समृद्ध कसा होईल ?

सभापती महोदय, आपण विदर्भ आणि मराठवाड्याला उर्वरित महाराष्ट्राच्या लेव्हलवर आणू शकलो नाही. आपण त्या विभागाला 20 वर्षे मागे ठेवले आहे. आपण 1994 चा अनुशेष पूर्ण करु शकलो नाही. त्यावेळी हा पैसा शेतकऱ्यांना पाणी देण्याकरिता वापरला असता तर शेतकरी कर्जमाफी मागायला आला नसता. आमच्या शेतकऱ्याला पाणी द्या, वीज द्या, तो आपली भूमी सुजलाम, सुफलाम करुन दाखवील इतकी ताकद त्याच्यामध्ये आहे आणि तो स्वतःच्या पायावर उभा देखील राहील. आपण ज्या भागात पैसे दिले त्या भागातील शेतकरी सक्षम आहे. त्या भागातील शेतकरी आत्महत्या करीत नाहीत.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

सभापती महोदय, या ठिकाणी मागणी करण्यापूर्वी जर सन्माननीय सदस्यांनी हा अहवाल वाचला असता तर अधिक चांगले झाले असते. आता आमच्या सरकारने शाश्वत सिंचनावर भर देण्याचे ठरविले आहे. त्यानुसार येत्या तीन वर्षात 14 आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांत 132 प्रकल्पांचे काम करणार असून, त्यातून 2.17 लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करणार आहोत. मागच्या सरकारने अनेक प्रश्न उभे करून ठेवले आहेत. नवीन सरकारने आठ महिन्यांत सर्व प्रश्न सोडविले पाहिजे, असे विरोधी बाजूच्या सन्माननीय सदस्यांचे मत आहे. परंतु गेल्या 15 वर्षांत तुम्ही उभे केलेले प्रश्न सोपे आहेत काय ? राज्य सरकार कर्ज काढून शेतकऱ्यांना पैसे देऊ शकते. राज्याला कोठूनही कर्ज मिळेल. जर कर्ज मिळाले नाही तर आम्ही माननीय पंतप्रधानांकडे मदत मागू. परंतु मागच्या सरकारने सिंचन प्रकल्पांच्या कामांची अशी परिस्थिती करून ठेवली आहे की, चार-चार वर्षे प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता दिलेली नाही. मी आणि माननीय मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार ज्यावेळी या प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यासाठी बसतो त्यावेळी कोणकोणत्या बाबी समोर येतात त्याच्या सुरस आणि चमत्कारीक कथा नंतर सांगतो. मागचे सरकार कसे चालले हे मला समजत नाही. प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याची शासनाची इच्छा आहे. परंतु मागच्या सरकारने प्रकल्पाच्या व्याप्तीमध्ये मोठ्या प्रमाणावर बदल केलेले आहेत. गायीचा बैल करावयाचा ठरविले तर कसे शक्य आहे ? परंतु मागच्या सरकारने गायीचा बैल आणि बैलाची म्हैस केली आहे. महोदय, या सर्व बाबी क्विक फिक्स नाहीत. सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित या गोष्टी एका दिवसात फिक्स करता येत नाहीत. आज पैसा देऊन सिंचनाची व्यवस्था उभी करण्याचे ठरविले तरी, या सरकारने प्रकल्पांची अशी अवस्था करून ठेवली आहे की, सर्वप्रथम ती अवस्था ठीक करावी लागेल. त्यानंतर प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता द्यावी लागेल आणि त्यानंतर ही कामे करावी लागतील. परंतु ही कामे एका दिवसात होणार नाहीत. मुळात मागच्या सरकारने त्यांच्या 15 वर्षांच्या कार्यकाळात ही कामे नीट करावयास हवी होती. विदर्भ आणि मराठवाडा हा विभाग आपल्याच संयुक्त महाराष्ट्रातील महत्त्वाचा घटक आहे असा विचार त्या सरकारने करावयास पाहिजे होता. तसेच या भागातील सिंचन वाढविण्यासाठी योग्य प्रकारचे नियोजन करून व निधीची योग्यप्रकारे तरतूद करून कामे केली असती तर आज शेतकऱ्यांवर ही अवस्था निश्चितपणे आली नसती. ..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे मी मोठ्या धरणाच्या विरोधात नाही. मोठी धरणे होणे आवश्यक आहे. परंतु त्या बरोबरच महाराष्ट्राची जिऑलॉजी, हायड्रॉलॉजी आणि टोपोग्राफी या तिन्ही गोष्टी लक्षात घेणे आवश्यक आहे. केवळ मोठ्या धरणांच्या भरवशावर संरक्षित सिंचन महाराष्ट्रात देता येत नाही. सुदैवाने वसंतराव नाईक यांनी हे ओळखले होते. जलसंधारणाच्या माध्यमातून महाराष्ट्रात परिवर्तन घडू शकते हे समजणारा द्रष्टा नेता महाराष्ट्रात वसंतरावजीच्या रूपाने होता. परंतु नंतरच्या काळात आपण केवळ मोठ्या धरणांच्याच मागे लागलो आणि ती सर्व कामे संपवून टाकली, किंबहुना हे विभाग डिफंक्ट करून टाकले. त्यामुळेच आज महाराष्ट्राची अशी अवस्था झाली आहे.

सन्माननीय श्री.सुनील तटकरेजी, आपण मंत्री असताना आपल्याकडे जल आणि सिंचन आयोगाचा अहवाल अनेक वेळा आला असेल. त्या अहवालावरून आपल्या लक्षात आले असेल की, महाराष्ट्रातील सर्व धरणे पूर्ण केली तरी महाराष्ट्राला 50 टक्के प्रवाही सिंचन देऊ शकत नाही. आज महाराष्ट्राची अवस्था काय आहे ? देशातील 40 टक्के मोठी धरणे एकट्या महाराष्ट्रात आहेत, असे सांगितले जाते. तरी सुध्दा राज्यातील 82 टक्के शेती ही कोरडवाहू आहे. देशाच्या प्रगत राज्यातील 82 टक्के शेती आजही कोरडवाहू आहे. यावर अनेक उपाय आहेत. आपल्याला ते उपाय माहीत होते. परंतु ते उपाय मागच्या सरकारने केले नाहीत. जोपर्यंत जलसंधारणाच्या माध्यमातून विकेंद्रीत पाण्याचे स्ट्रक्चर तयार करणार नाही तोपर्यंत ही परिस्थिती संपवू शकत नाही.

सभापती महोदय, आमच्या सरकारने जलयुक्त शिवार अभियान ही योजना सुरु केली आहे. विरोधी पक्षाचे सदस्य म्हणतात की, पाऊस आला नाही तर हे अभियान राबवून काय उपयोग होणार ? मी सांगू इच्छितो की, पाऊस पडला नाही तर धरणात आणि शिवारात सुध्दा पाणी राहणार नाही. जलयुक्त शिवाराची कामे ज्या ठिकाणी झाली त्या ठिकाणी पहिल्या पावसात 80 टक्के शिवार तुडूंब भरली आहेत. मला सांगताना आनंद वाटतो की, आमचे सरकार येऊन आठ महिने झाले. गेल्या सहा महिन्यात जलयुक्त शिवार अभियानाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर कामे झाली आहेत. परंतु या कामाचे श्रेय मी शासनाकडे घेत नाही. जनता जेव्हा एखाद्या गोष्टीला

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

आपली चळवळ म्हणून स्वीकारते किंवा शेतकऱ्यांना मनातून वाटते की, परिवर्तन केले पाहिजे. त्यावेळी जनता काय परिवर्तन करु शकते याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे जलयुक्त शिवार अभियानाची योजना होय. मला सांगताना आनंद वाटतो की, जल तज्ज्ञ श्री.राजेंद्र सिंह यांनी अनेक ठिकाणी राज्याच्या जलयुक्त शिवार अभियानाच्या बाबतीत गौरवोद्गार काढले आहेत. त्यांनी मला दोनदा फोन करुन सांगितले की, महाराष्ट्राच्या शाश्वत सिंचनाकडे जाण्याचा रस्ता कोणता असेल तर तो म्हणजे जलयुक्त शिवार अभियान होय. हे त्यांनी स्वतःच्या सत्कारप्रसंगी सांगितले. श्री.राजेंद्र सिंह गेले तीन महिने कोणाच्या निमंत्रणावरुन नव्हे तर स्वतःहून राज्यातील 17 जिल्ह्यात फिरले आणि जलयुक्त शिवार अभियानाची कामे बघितली. त्या जिल्ह्यातील लोकांनी, प्रशासनाने त्यांना बोलविले आणि त्यांचे वर्कशॉप घेतले.

सभापती महोदय, जलयुक्त शिवार अभियानांतर्गत पहिल्या टप्प्यात 1,19,882 कामे हाती घेण्यात आली. त्यापैकी 88,657 कामे पूर्ण झाली आहेत. प्रामुख्याने माथा ते पायथा या तत्त्वानुसार ही कामे करण्यात आली आहेत. तसेच 3,51,999 हेक्टरवर कंपारमेंट बंडींग, 75,971 हेक्टरवर डीप सीसीटी, 1060 माती नाला बांध, 1097 सीएनबी दुरुस्ती, 84 केटी वेअर दुरुस्ती, 2229 पाझर तलाव दुरुस्ती, 92 नवीन पाझर तलाव, 132 केटी वेअर, 4,339 शेत तळी, 821 रिचार्ज शार्प ही कामे घेण्यात आली. या बरोबरच 32,829 हेक्टरवर ठिबक सिंचन आणि 6,173 हेक्टरवर तुषार सिंचनाचे काम करण्यात आले आहे. आज 6 हजार गावांतील परिस्थिती झपाट्याने बदलत आहे. मार्चपर्यंत ही कामे पूर्ण करणार आहोत. यासाठी विदर्भ, पश्चिम विदर्भ आणि मराठवाड्यासाठी अतिरिक्त 619 कोटी रुपये निधी दिला आहे. आता पुरवणी मागण्यांमध्ये सुध्दा निधी दिला आहे. जवळपास 51,588 कामे हाती घेऊन, त्यातील 36,304 कामे पूर्ण केली आहेत. ज्यावेळी समाजातून 250 कोटी रुपयांचा लोकसहभाग येतो त्यावेळी या योजनेची महती आणि व्याप्ती काय आहे हे लक्षात घेतले पाहिजे. मी पुन्हा एकदा सांगू इच्छितो की, दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी या प्रकरणी उत्तम काम करुन दाखविले आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी आपल्या आमदार निधीतून 50 लाख रुपये दिले आहेत. जी दिशा माननीय पंतप्रधान

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

साहेबांच्या समितीने त्या काळात दाखविली ती दिशा स्वीकारण्याचे काम आम्ही आज करीत आहोत.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी मिळाले पाहिजे म्हणून 5 हजार गावांमध्ये या वर्षी कामे हाती घेण्यात येतील. या 5 हजार गावांव्यतिरिक्त जे गाव लोकसहभाग देण्यास तयार असेल ते गाव कोणत्याही निकषात बसो अगर नसो, त्या गावाचा सुध्दा यामध्ये समाविष्ट करण्यात येईल. मोठ्या प्रमाणावर हा कार्यक्रम हाती घेतला आहे. या माध्यमातून खऱ्या अर्थाने शाश्वत सिंचन शेतकऱ्यांना देण्याचा प्रयत्न करीत आहोत. ही एकप्रकारे गुंतवणूक आधारित शेती अर्थव्यवस्था आहे. शेतकऱ्यांना केवळ कर्ज देऊन चालणार नाही. त्याला आपल्या पायावर उभे करावयाचे असेल तर त्याला पाणी आणि वीज द्यावी लागणार आहे. त्यामुळे राज्य सरकारने निर्णय घेतला आहे की, पुढील 3 वर्षात प्रत्येक वर्षी 50 लाख या प्रमाणे दीड लाख शेत तळी करण्यात येतील. दीड लाख शेत तळ्यांतून 5 लाख एकर क्षेत्र सिंचनाखाली येईल. या बरोबरच पुढील तीन वर्षात 1 लाख विहिरी पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस ....

मी यवतमाळ तसेच इतर अनेक जिल्ह्यांतील आत्महत्याग्रस्त कुटुंबांमध्ये गेलो. मी तेथे आत्महत्या केलेल्या व्यक्तिच्या कुटुंबियांना तेथील शाळेत बोलवायचो आणि विचारायचो की, तुम्हाला काही मिळाले आहे का ? 2-3 प्रकरणे सोडली तर बहुतांश लोकांना 1 लाख रुपये मिळाले होते. मी त्यांना विचारायचो की, तुमच्या शेतीत विहीर आहे का, तर उत्तर 'नाही; असे यायचे. एखादा सांगायचा विहीर आहे. त्यावेळी मी विचारायचो की, तुला पंप मिळाला आहे का, तर 'नाही; असे उत्तर यायचे. शेतकऱ्याने आत्महत्या करून 5 वर्षे होऊन देखील त्याच्या कुटुंबाला विहीर, पंप मिळालेला नाही. प्रल्हाद ताजणे यांचा उल्लेख करण्यात आला. मी त्यांच्या पिंप्री-बुटी या गावात गेलो. आपल्याला आश्चर्य वाटेल. मला त्या ठिकाणी किमान 4-5 कुटुंबे अशी मिळाली की, ज्यांच्या घरामध्ये आत्महत्या होऊन 5 वर्षे झाली तरी सुध्दा त्यांना साधी विहीर मिळाली नाही. मी सांगितले की, त्यांना विहीर द्या. हे खरे आहे की, मी त्या महिलेला भेटलो. ती अतिशय निराशेमध्ये होती. आत्महत्या केली त्यावेळी त्यांच्या खात्यामध्ये 70 हजार रुपये होते. मी भेटलो त्यावेळी त्यांना संगितले की, तुम्हाला काय हवे आहे ते आम्ही देण्यास तयार आहोत. विहीर नसेल तर विहीर देऊ, पंप नसेल तर पंप देऊ. जिल्हाधिकाऱ्यांना .... पण ती महिला दोन महिने नातेवाईकांकडे गेली. ती अत्यंत निरोशेमध्ये होती. तिने आत्महत्या केली हे भूषणावह नाही. मुख्यमंत्र्यांना भेटल्यानंतर तिने आत्महत्या केली हे मी बिलकूल भूषणावह मानत नाही. हे चुकीचेच आहे. मात्र याचा अर्थ हा आहे की, शेतकऱ्यांना भेटणे सोडून द्यायचे ? शेतकऱ्यांमध्ये विश्वास तयार करावा लागेल. ही अवस्था, निराशा का आहे ? कारण आत्म्हत्या केल्यानंतर 5-6 वर्षे आत्महत्याग्रस्त कुटुंबाला साधी विहीर मिळणार नसेल तर ते योग्य नाही. शेतकरी कसा आत्मसन्मानाने उभा राहील ? ती महिला एकटीच राहत होती. तिच्या मुलाने सांगितले की, तिच्या आरोग्यावर पुष्कळ पैसा खर्च केला. परंतु ती बरीच डिप्रेशनमध्ये होती. डिप्रेशनमध्ये असणाऱ्यांची अनेक उदाहरणे आहेत. आपण या भागात जाऊन पाहिले तर दिसेल. शेतकऱ्यांच्या मनात उत्साह निर्माण करण्याची, जगण्याची उमेद तयार करण्याची आवश्यकता आहे. आपण निगेटिव्ह गोष्टी खूप करू, एकमेकांवर टीकाही खूप करू, माध्यमेही करतील. मात्र शेतकऱ्यांना आत्महत्यांतून बाहेर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस ....

काढायचे असेल तर आपल्या सर्वांना एकमुखी सांगावे लागेल की, तुम्ही काळजी करू नका, आम्ही परिवर्तन घडवित आहोत. आपण तेथे जाऊन निगेटिव्ह गोष्टी केल्या तर ते योग्य नाही. गावामध्ये जाऊन काही लोकांनी आंदोलन करण्याचा प्रयत्न केला. गावांतील लोकांनी प्रेस घेऊन सांगितले की, आमच्या गावात येऊन राजकारण करू नका. काही गोष्टी तरी राजकारणाच्या पलीकडे असल्या पाहिजेत. (अडथळा)

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मला बोलावयाचे आहे.

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, हा निकष असू शकत नाही. सन्माननीय राहुल गांधी यांना भेटलेल्या शेतकऱ्याने आत्महत्या केली. त्यामुळे हा काही निकष असू शकत नाही. आपल्याला हेही सांगितले पाहिजे. (अडथळा)

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मला बोलावयाचे आहे.

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, आपण कर्जमाफीच्या गोष्टी करता. मी एक गोष्ट अजून सांगतो की, आपण पंतप्रधान पॅकेजमध्ये जाहीर केलेल्या विहिरी 8 वर्षे करू शकला नाहीत. आपण त्या विहिरी का केल्या नाहीत ? पंतप्रधान पॅकेजमधील विहिरी करण्याकरिता किती तरतूद पाहिजे होती ? आज या सर्व विहिरी आम्ही करण्याचे ठरविले आहे. आम्हाला 500 कोटी रूपये लागले आहेत. 500 कोटी रूपये देऊन पंतप्रधान पॅकेजमधील 10320 विहिरी ज्या आपण 6 वर्षांत केल्या नाहीत त्या आम्ही करीत आहोत. आम्ही याकरिता निधी दिलेला आहे. (अडथळा) आपण निधी का दिला नाही ? (अडथळा) या विहिरी मनरेगातून नाही तर धडक योजनेत टाकल्या आहेत आणि त्यासाठी शासन 435 कोटी रूपये देत आहे. (अडथळा) आपला हाच प्रॉब्लेम आहे. आपण कर्ज घ्या असे सांगता. आपण घोषणा केल्या आणि त्याची पूर्तता आम्ही करीत आहोत. शेतकऱ्यांना विहिर मिळाली असती तर तो समृध्द नसता का झाला ? आपल्याला काय कमी होती, 2 लाख 20 हजार कोटी रूपयांचा अर्थसंकल्प होता. शेतकऱ्यांना वाचविण्याकरिता धडक योजनेकरिता 500 कोटी रूपये दिले असते तर वाया गेले असते का ? आम्हाला तुम्ही शिकविता. मात्र तुम्ही केले नाही. तुम्ही केले नाही ते आम्ही केले. आम्ही या सर्व विहिरी केल्या. मला

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस ....

सांगताना आनंद वाटतो की, आम्ही या कामांची सुरूवात देखील केली आहे. 3000 विहिरी लवकरच पूर्ण करीत आहोत. सर्व 10 हजार विहिरींची कामे करणार आहोत. (अडथळा) आपण स्वत:ला उत्तर स्वत:ला मागा. 15 वर्षांत का झाले नाही ? आपण आठव्या महिन्यात मला विचारता, ते 15 वर्षांत तुम्ही का केले नाही याचे उत्तर द्या आणि मग उत्तर मागा. गेल्या 3 वर्षांत तुम्ही ठिंबक सिंचनाचे पैसे दिले नाहीत, ते आम्ही दिले. शेतकऱ्याला सांगायचे की, तू संच लाव आणि 3 वर्षे सबसिडीचे पैसे द्यायचे नाहीत हे योग्य नाही. हे 3 वर्षांचे पैसे आमचे माननीय वित्त मंत्री श्री. सुधीरभाऊ मुनगंटीवार यानी बजेटच्या माध्यमातून दिले. आपण दाखवित असलेले प्रेम कृतीतून व्यक्त झाले असते तर ते खरे प्रेम असते. (अडथळा) मी पंतप्रधान पॅकेजचे सांगू का ? कॅगचा रिपोर्ट आहे. कोणला गायी मिळाल्या, त्यांची नावे आलेली आहेत. मी सांगितले तर पुन्हा म्हणाल की, सभागृहात नाहीत त्यांची नावे का घेता, दिवंगत झाले आहेत त्याची नावे का घेता ? शेवटी डिलिव्हरी सिस्टिम महत्त्वाची आहे. पंतप्रधान पॅकेज जाहीर झाल्यानंतर त्यातील गायी काही नेत्यांनी लुटून खाल्ल्यामुळे शेतकऱ्यांवर ही अवस्था आली आहे. (अडथळा) सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांच्याच जिल्ह्यात झाले आहे. कॅगच्या रिपोर्टमध्ये आहे. (अडथळा)

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मला बोलायचे आहे. (अडथळा)

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, प्रत्येक गावात 5 डिझेल पंप, लाईन स्प्रिंकलर अनुदानावर प्रस्तावित केले. 138 कोटी रूपयांच्या योजनेंतर्गत प्रत्येक गावातील हे 5 संच असतील आणि त्या माध्यमातून 25 हजार मुलांना रोजगार मिळेल. 17 लाख 50 हजार एकर जमीन या माध्यमातून ओलिताखाली आणण्याचा प्रयत्न करू पहिला प्रयत्न हा आहे की, शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी मिळाले पाहिजे, त्यांना शाश्वत सिंचन मिळाले पाहिजे. 4 समित्यांनी संगितले होते, त्यातील पहिला प्रयत्न आम्ही सुरू केला आहे. (अडथळा) जे केले ते सांगत आहे. नुसते पाणी देऊन चालणार नाही, शेतकऱ्यांना विजेचे कनेक्शन देखील दिले पाहिजे. (अडथळा) पेडपेंडिंग आहेत. डिमांड नोट मिळाली, पैसेही भरले. परंतु कनेक्शन मिळाले नाही. डिमांड नोट इश्यू झाली नाही

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस ....

तेही तेवढेच आहेत. ऑक्टोबर, 2014 अखेर विदर्भात 55,466 आणि मराठवाड्यात 37,750 असे एकूण 1 लाख शेतकरी होते की, ज्यांना विजेचे कनेक्शन मिळाले नाही.

(नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे (बसून) : सन 1991 ते सन 1994 या कालावधीत किती कनेक्शन दिली, तेही एकदा सांगा, म्हणजे लक्षात येईल.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, खरे म्हणजे, मला आनंद वाटतो की, सन्माननीय गट नेते श्री.माणिकराव ठाकरे यांनी सन 1994 पर्यंतची माहिती विचारली, सन 1960 मधील माहिती विचारली नाही.

सभापती महोदय, हे पेडपेंडिंग सन 1994 चे नाहीत. शेतकऱ्यांनी सन 2009, 2010, 2011 मध्ये पैसे भरले आहेत. परंतु, कितीही माहिती झोंबली तरी माहिती ही माहितीच असते. आकडेवारीच सांगायची झाली तर मराठवाड्याची जी एकूण प्रकरणे आहेत त्यामधील 13215 प्रकरणे ही 3 ते 5 वर्षांपासून पेंडिंग होती, विदर्भातील 20884 प्रकरणे ही 3 ते 5 वर्षांपासून पेंडिंग होती. मला आपण सांगा की, 5-5 वर्षे जर शेतकऱ्याला पैसे भरुनही विजेचे कनेक्शन देणार नसाल तर त्यांच्याकडून आपण काय अपेक्षा करणार आहोत ? आपणही अनेक आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली आहे, मी देखील घेतली आहे. त्यांना आपण विचारले तर ते असे सांगतात की, 3 वर्षांपासून पैसे भरले आहेत, विजेचे कनेक्शन मिळाले नाही. 30 वर्षाच्या एका मुलाने आत्महत्या केली. 2 वर्षांपासून कनेक्शन मागतो आहे, मिळाले नाही, डिझेलचा पंप विकत घेतला, डिझेलच्या पंपावर शेती करणे किती कठीण आहे, याची आपल्याला कल्पना आहे, त्यामुळे तो कर्जबाजारी झाला, चिठ्ठी लिहून ठेवली आणि आत्महत्या केली. जर तुम्ही विदर्भ, मराठवाड्यातील 2-2 लाख शेतकऱ्यांना 5-5 वर्षे विजेचे पंप देणार नसाल तर आपण त्यांच्याकडून कोणती अपेक्षा करणार आहोत ? हे नवीन सरकार आल्यानंतर आमच्या अर्थ मंत्री महोदयांनी थेट 1 हजार कोटी रुपयांची तरतूद करुन दिली. त्याचा परिणाम असा आहे की, आत्महत्याग्रस्त 14 जिल्ह्यांमध्ये 47277 कनेक्शन आम्ही देऊन टाकली आहेत. सन्माननीय श्री.माणिकराव ठाकरे साहेब मार्च, 2016 पर्यंत जी 5-5 वर्षांपासून पेड पेंडिंग प्रकरणे आपण ठेवली आहेत, त्या सर्वांना आम्ही विजेचे कनेक्शन देऊ आणि पाणीही देऊ. (अडथळा.....) मूळ मुद्यावरच चर्चा सुरु आहे. तुमचा हाच प्रॉब्लेम आहे की, तुम्हाला तो मूळ मुद्दा कळला नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस.....

सभापती महोदय, या राज्यात इफ्रा-2 ची योजना आली. खरे तर इन्फ्रा-1 मध्येच विदर्भ आणि मराठवाड्यावर अन्याय झाला होता. इन्फ्रा-2 च्या योजनेमध्ये नेटवर्क किती उभे करावयाचे होते ? आत्महत्याग्रस्त भागात कनेक्शन द्यावयाची होती, सबस्टेशन्स उभी करावयाची होती. यासाठी तुम्ही 8 हजार कोटी रुपयांची योजना तयार केली. या योजनेअंतर्गत विदर्भाला 961 कोटी रुपये, मराठवाड्याला 1040 कोटी रुपये आणि एकट्या बारामतीला 1054 कोटी रुपये देण्यात आले. (अडथळा.....) बारामती मंडळ हे अडीच जिल्ह्याचे मंडळ आहे. ही सर्व योजना तयार करीत असताना सन्माननीय श्री.माणिकराव ठाकरे साहेब आपले बाजूच्यांकडे लक्षच नव्हते. ही योजना बँकेच्या कर्जाला लिंक करण्यात आली. त्यामुळे प्रगत भागात फायनान्स मिळाला आणि तेथील कामाची टेंडर्स निघाली. मागास भागात मात्र फायनान्स न मिळाल्यामुळे टेंडर निघाली नाहीत. 1000 कोटी रुपये दिले असले तरी आजतागायत तेथील कामे आपण करु शकलेलो नाही. आज आम्ही हा निर्णय घेतला आहे की, बँकेचे लिंकेंज वगैरे काही नाही, आवश्यकता असेल तर महावितरणने स्वत:च्या निधीतून पैसे द्यावेत, अडचण असेल तर राज्य शासनाचा निधी देऊ पण इन्फ्रा-2 ची कामे पूर्ण करु एक गोष्ट लक्षात घ्या की, विजेची कामे ही काही एका दिवसात होत नाहीत. चार-चार वर्ष तुम्ही विजेची कामे करीत नाही, त्यावेळी त्या शेतकऱ्यावर अन्याय होतो. आज आम्ही ठरविले तरी एक काम पूर्ण करण्याकरिता 2 वर्षाचा, दीड वर्षांचा कालावधी लागतो लगेच तुम्ही विचारायला तयार आहात की, तुम्ही सत्तेवर येऊन 8 महिने झाले, कामे का झाली नाहीत ? नियोजनाची दिशा योग्य प्रकारे लक्षात आली असती आणि तुम्ही या भागांवर अन्याय केला नसता तर शेतकऱ्याला पाणी मिळाले असते, वीज मिळाली असती आणि त्याच्या भरवशावर शेतकरी सुजलाम-सुफलाम झाला असता.

सभापती महोदय, किमान आधारभूत किमतीबाबत सन्माननीय गटनेते श्री.सुनील तटकरे आणि अन्य काही सन्माननीय सदस्यांनी मुद्दा उपस्थित केला आहे. खरी गोष्ट आहे की, किमान आधारभूत किंमतीमुळे शेतकरी जगतो. अन्यथा, व्यापारी शेतकऱ्याला अडचणीत आणतो. त्यामुळे आपल्या सर्वांची किमान आधारभूत किमतीबाबतची भावना किती चांगली आहे. पण हीच आपली

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस.....

भावना सन 2013 च्या डिसेंबरमध्ये कुठे गेली होती ? सन 2013 च्या डिसेंबर महिन्यात बाली येथे वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशनच्या बैठकीमध्ये ट्रेड फॅसिलिटेशनच्या ॲग्रिमेंटवर आपण सर्वांनी सह्या केल्या. माननीय डॉ.मनमोहन सिंगजींच्या नेतृत्वाखाली जे युपीअेचे सरकार होते, ज्यांच्यामध्ये आदरणीय जाणते राजे, देशाचे कृषी मंत्री श्री.शरद पवार एक महत्वाचे मंत्री होते, या सरकारने या ट्रेड फॅसिलिटेशन ॲग्रिमेंटरवर स्वाक्षऱ्या केल्या. या स्वाक्षऱ्या करून आपण काय मान्य केले ? आपण असे मान्य केले की, आम्ही मार्च, 2016 पासून किमान आधारभूत किंमत देणार नाही. (अडथळा.....)

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना मी सांगू इच्छितो की, आपण नंतर बोलावे किंवा सन्माननीय गट नेते श्री.माणिकराव ठाकरे बोलतील त्यावेळी त्यांनी हा मुद्दा मांडावा. मुख्यमंत्री महोदयांना त्यांचे उत्तर पूर्ण करु द्यावे.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना मी एका मिनिटात खुलासा देतो. आपण हे मान्य केले की, फुड सिक्युरिटी आम्ही लागू करणार नाही. माझ्याजवळ सर्व कागदपत्रे आहेत. (अडथळा....) माझ्या जवळही सरकारचीच कागदपत्रे आहेत. आपण ऐकून घ्या. आपण हे मान्य केले आणि त्यानंतर सन 2016 च्या मार्च पासून आपल्याला एम.एस.पी. देता येणार नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली. पुढे काय झाले ? (अडथळा...) आपण ऐकून घ्यावे. त्यानंतर सन 2014 मध्ये जिनेव्हात पुन्हा वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशनची बैठक झाली. त्यावेळी भारताचे माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वाखाली असे सांगितले गेले की, हे ट्रेड फॅसिलिटेशन ॲग्रिमेंट आम्हाला मान्य नाही. (अडथळा....) मग सह्या करताना आपण झोपला होता का ? आपण सह्या करताना झोपला होता का ? त्यानंतर त्या दोन दिवसात तेथे उपस्थित असलेल्या सर्व देशांनी सांगितले की, आम्ही भारताला बहिष्कृत करु व्यापारामध्ये ठेवणार नाही. सरकारने स्पष्टपणे सांगितले की, तुम्हाला ठेवायचे असेल तर ठेवा किंवा ठेऊ नका, पण आम्हाला हे ॲग्रिमेंट मान्य नाही, आम्ही या ॲग्रिमेंटमधून बाहेर पडणार आहोत आणि त्यामुळे आपण ट्रेड फॅसिलिटेशन ॲग्रिमेंटमधून बाहेर पडलो आणि आज या ठिकाणी एम.एस.पी.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस.....

देऊ शकत आहोत. (अडथळा.....) सन्माननीय श्री.माणिकराव ठाकरे साहेब तुमच्यासारखी आम्हाला सवय नाही. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना मी सांगू इच्छितो की, लोकसभेमध्ये या संदर्भात चर्चा झाली आणि त्या डिबेटमध्ये माननीय श्री.आनंद शर्मा यांनी काय सांगितले, त्यानंतर आमच्या मंत्री महोदयांनी काय उत्तर दिले, हे आपण वाचा. या संदर्भातील सर्व प्रोसिडिंग आपण वाचा. "जो बुंद से गई वो हौद से नही आती"

यानंतर श्री.बोरले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस.....

सभापती महोदय, आज दुधाच्या संदर्भात अडचणीची स्थिती निर्माण झालेली आहे. (....अडथळा....) सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये, आपण नागपूरचे आहात. आपले हिंदी चुकू शकत नाही. आपण माझे मित्र आहात. त्यामुळे तुम्ही मला चुकीचा सल्ला देऊ नका. आज दुधाच्या संदर्भात अडचणीची स्थिती आहे. खऱ्या अर्थाने दूध उत्पादक शेतकरी अडचणीत आहे. मुंबई शहरात 55 रुपये प्रती लिटर दराने दुधाची विक्री केली जाते. नेस्टलेच्या दुधाची 70 रुपये प्रती लिटर दराने विक्री केली जाते. मग आमच्या शेतकऱ्याला प्रती लिटर 17 रुपयेच भाव का मिळतो ? आपली पहिली चूक काय झाली ? आपण राज्यात एकही ब्रॅन्ड तयार केला नाही. आपल्याला जो ब्रॅन्ड तयार करावयाचा होता आणि आपण आज आपल्या शासकीय दूध शाळांची अवस्था काय केली, हे सांगण्याची आवश्यकता नाही. आपल्याकडे अमूल सारखा एखादा ब्रॅन्ड असता तर आज आपल्यावर ही वेळ आली नसती. परंतु, आपण ब्रॅन्डच तयार केला नाही. भाई, दुधाच्या संदर्भातील कोणते घोटाळे आहेत, हे मी सांगण्याची आवश्यकता नाही. तुम्हाला देखील ते माहीत आहेत. आज एकीकडे दूध उत्पादक शेतकऱ्याला भाव मिळत नाही आणि दुसरीकडे दुधात मोठ्या प्रमाणात नफेखोरी होत आहे. म्हणून राज्य शासनाने हा केंद्र शासनाचा कायदा असल्यामुळे दुधासाठी आधारभूत किंमत जाहीर केली पाहिजे, अशी केंद्र शासनाकडे शिफारस करण्याचा निर्णय घेतलेला आहे. याच बरोबर, जे कन्झुमर आयटेम आहेत त्यामध्ये नफा किती असला पाहिजे, या संदर्भात काही नियम आहेत आणि एमआरपी कशी ठरवायची, हे देखील ठरले आहे. परंतु, ते दुधासाठी लागू होत नाही. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर नफेखोरी होत आहे. जोपर्यंत आपण सप्लाय साईड मॅनेजमेंट करणार नाही तोपर्यंत दुधाची खपतही वाढणार नाही. म्हणून दोन्ही बाजूने म्हणजे एकीकडे लोकांना लुटता नाही आले पाहिजे आणि दुसरीकडे शेतकऱ्याला देखील लुटता नाही आले पाहिजे, अशा प्रकारची व्यवस्था आपल्याला करावी लागेल. खरे म्हणजे मागील काळात ज्यावेळी राज्यात अशा प्रकारचा प्रश्न निर्माण झाला होता त्यावेळी सन 2012-13 मध्ये राज्य सरकारने दूध भुकटी तयार करण्यासाठी 32 कोटी रुपयांचे अनुदान दिले होते. आमचे सरकार

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस.....

सत्तेवर आल्यानंतर, अशी अवस्था निर्माण झाल्यानंतर आम्ही जास्त किंमतीने दूध खरेदी करण्याचा निर्णय घेतला आणि 15 जुलै पर्यंत 551 लक्ष लिटर दूध राज्य सरकारने खरेदी केले आणि त्यापोटी आम्ही जास्तीचे 117 कोटी रुपये दिलेले आहेत. त्यामुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या पाठीशी... (...अडथळा...) मी ते देखील सांगतो. भाव कसा मिळेल ? भाई, मी आपल्याला तेच सांगत आहे. आपण ऐकून घ्यावे. आता अडचण कोठे होते ? मी सांगू इच्छितो की, आपला बारामती दुधसंघ आहे. तो दुधसंघ अतिशय उत्तम काम करीत आहे, तो दुधसंघ नफ्यात आहे. दुधसंघ चांगल्या प्रकारेच चालविला पाहिजे. तो दुधसंघ चांगल्या प्रकारे चालविला जात आहे. बारामती दुधसंघ शेतकऱ्यांकडून 17 रुपये 50 पैसे दराने दूध विकत घेतो आणि डायनॅमिक्स डेअरीला 21 रुपये 50 पैसे दराने दुधाची विक्री करतो. यामध्ये कोणतेही प्रोसेसिंग नाही, ते प्रोसेसिंग डायनॅमिक्स डेअरी करते. त्यांना प्रती लिटर 4 रुपये नफा मिळतो. हे चांगले आहे, नफा मिळाला पाहिजे. डायनॅमिक्स डेअरी तेच दूध नेस्टलेचे एजंट म्हणून 70 रुपये प्रती लिटर दराने विकते. समजा बारामती दुधसंघाने असा निर्णय घेतला की, आपण 4 रुपये नफा कमविण्याऐवजी त्यातील 2 रुपये शेतकऱ्यांना द्यावेत. (...अडथळा...) डिव्हिडन्ट कोणाला मिळतो, दुधाचे संकलन कोणाकडून होते, सर्व सदस्यांकडून दूध संकलन होते काय ? (...अडथळा...) आपण माझे म्हणणे ऐकून घ्यावे आणि त्यानंतर बोलावे.

श्री.सुनील तटकरे : मुख्यमंत्री महोदय या पद्धतीने दूध क्रांती झाली हे तुम्ही नाकारत आहात ?

श्री.देवेंद्र फडणवीस : मी बारामती दुधसंघाची तारीफ केली तर तुम्हाला का वाईट वाटते ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, दूध उत्पादक शेतकऱ्यांनाही डिव्हिडन्ट मिळतो हे पाठीमागे बसलेल्या सन्माननीय सदस्यांना माहीत आहे.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, समजा बारामती दूध उत्पादक संघाने असे ठरविले की, आम्ही शेतकऱ्याला 2 रुपये जास्त देऊ आणि डायनॅमिक्स डेअरीला 2 रुपयांनी महाग दूध देऊ

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस.....

तर जे 70 रुपये दराने दुधाची विक्री करतात ते दूध घेणार नाहीत काय ? ते दूध घेणारच आहेत. माननीय श्री.राजू शेट्टी साहेबांची दूध डेअरी शेतकऱ्यांकडून 23 रुपये 50 पैसे दराने दूध विकत घेते. त्यांची डेअरी कधीही तोट्यात आलेली नाही. मागील तीन वर्षापासून ते नफा कमवित आहेत. म्हणून शेवटी प्रश्न असा आहे की, हा जो संपूर्ण व्यवसाय सुरु आहे हा अनरेग्युलेटेड आहे आणि आपण जर यावर योग्य प्रकारचे रेग्युलेशन आणले नाही तर अशाच प्रकारे शेतकऱ्यांची पिळवणूक होत राहील. त्यांनी 70 रुपये दराने दूध विकायचे आणि शेतकऱ्यांना 17 रुपये भाव द्यायचा, ही परिस्थिती आपल्याला बदलली पाहिजे याकरिता मी हे उदाहरण दिले. मला कोणावर आरोप करावयाचा आहे याकरिता मी हे उदाहरण दिलेले नाही.

सभापती महोदय, कृषी मालावर प्रक्रिया झाली पाहिजे. कृषी मालावर प्रक्रिया झाली पाहिजे, हे आम्ही अनेक वर्षापासून सांगत होतो. परंतु, ही प्रक्रिया होऊ शकली नाही. म्हणून आपण आता कापसाच्या संदर्भात इन्टिग्रेटेड टेक्सटाईल पार्क्स तयार करण्याचा निर्णय घेतला. जे 9 कापूस उत्पादक जिल्हे आहेत, मग ते जिल्हे तुमचे आहेत, का आमचे आहेत, याचा आम्ही विचार केला नाही. जे टॉपचे 9 जिल्हे आहेत त्या ठिकाणी आम्ही इन्टिग्रेटेड टेक्सटाईल पार्क्स तयार करण्याचा निर्णय घेतला. आपण अमरावती येथे पार्क सुरु केलेला आहे. आज त्या ठिकाणी 8 प्रस्ताव आलेले आहेत. आता जवळपास 2 ठिकाणी उत्पादन सुरु होत आहे. वर्धा येथे 20 प्रस्ताव आलेले आहेत. नंदुरबार येथे 9 प्रस्ताव आलेले आहेत. आपण यवतमाळ, बीड, बुलढाणा येथेही पार्क सुरु करीत आहोत. जोपर्यंत आपण कापसाचे व्हॅल्युॲडिशन करणार नाही, आपण अनेक वेळा गुजरात राज्याचे उदाहरण देतो. गुजरात राज्यात शेतकरी थेट टेक्सटाईल मिलला कापूस देतात. त्यामुळे तेथील शेतकऱ्यांवर ही अडचणीची वेळ येत नाही. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे साहेब, मी काल जे उदाहरण दिले ते आपण पुन्हा नीट ऐकावे. म्हणजे तुम्हाला उद्या माझ्यावर हक्कभंगाची सूचना दाखल करता येईल.

श्री.माणिकराव ठाकरे : माझा संसार चालविण्यासाठी उपयोगात कसे येते, तेवढे आपण सांगावे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, मी तसे बोललो नाही. आपण रेकॉर्ड बघावे. तुमचा संसार चालविण्यासाठी ते कामी येते, असे मी बोललो नाही.

श्री.माणिकराव ठाकरे : मी आता राजीनामा देतो, तुम्ही तुमच्या पदाचा राजीनामा द्यावा.

श्री.देवेंद्र फडणवीस : माझा राजीनामा तुम्हाला एवढ्या सहजासहजी मिळविता येणार नाही. मी येथे 5 वर्षे राहणार आहे. तुम्ही जर मला असेच सांगणार असाल तर मी सर्वच सांगेल, आपण त्याची काळजी करु नका. मी सर्व आव्हाने स्वीकारायला तयार आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदयांनी अशा प्रकारे धमकीवजा बोलणे योग्य नाही. मग राज्याच्या प्रमुखांकडून आम्ही काय अपेक्षा करायची, आम्ही अशी अपेक्षा करायची काय ? कामालच झाली.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप, आपण कृपया जागेवर बसावे. माननीय मुख्यमंत्री महोदय आपण बोलावे.

श्री.देवेंद्र फडणवीस : सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे साहेब, मी पुन्हा सांगतो. मी आताच स्पष्टीकरण देतो. तुम्ही तुमच्या घरी पैसा वापरला, असा माझा आरोप नाही. मी असे सांगितले होते की, जर 24-24 वर्षे बँकांच्या खात्यात पैसे राहतील आणि त्यावर व्याज मिळत राहील याकरिता हे पैसे दिलेले नाहीत. मी माननीय श्री.नसीम खान साहेबांना विचारले की, तुम्ही याकरिता हे पैसे दिले होते काय ? (...अडथळा...) मी तेही सांगतो, सर्वच सांगतो. आपल्याला माझ्या विरुद्ध हक्कभंगाची सूचना मांडता यावी यासाठी मी जे बोललो होतो ते मी पुन्हा नीट वाचून दाखविणार आहे. शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, दारव्हा, जि.यवतमाळ, राज्यातील सहकारी सूत गिरण्यांना त्यांच्या प्रकल्पाच्या उभारणीसाठी शासकीय भागभांडवल मंजूर करण्याची योजना राज्यात राबविण्यात येते.

यानंतर श्री.खर्चे वि.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस...

या सूत गिरण्यांना शासकीय भाग भांडवल म्हणून रक्कम उपलब्ध करुन देण्यात येत असते. शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित द्वारव्हा ही 1991 मध्ये म्हणजे 24 वर्षापूर्वी नोंदणीकृत झालेली आहे. सूत गिरणीने मंजूर प्रकल्प अहवालानुसार सभासद भाग भांडवल 304.50 लाख रुपये जमा करावयाचे असताना 31 मार्च 2015 अखेरपर्यंत केवळ 65.66 लाख रुपये जमा केले आहेत. योजनेच्या आकृतिबंधानुसार जमा सभासद भाग भांडवलाचे 1/9 या प्रमाणे 590.94 लाख रुपये शासकीय भाग भांडवलास सूत गिरणी पात्र होती. ही सूत गिरणी 5 कोटी 90 लाख रुपयांना पात्र असताना शासनाने मात्र 14 कोटी 86 लाख रुपये शासकीय भाग भांडवल सूत गिरणीस उपलब्ध करुन दिले आहेत, यावर लेखा परीक्षणाचा आक्षेप आलेला आहे. गिरणीच्या 12500 जात्यांकरिता बांधकाम पूर्ण झाले असून गिरणी प्रकल्पावर 482 लाख रुपये खर्च करण्यात आले आहेत. गिरणीसाठी 14 कोटी 86 लाख रुपये मिळाले असून त्यापैकी आतापर्यंत 4 कोटी 82 लाख रुपये खर्च करण्यात आले आहेत. या गिरणीची नोंदणी 1991 मध्ये करण्यात आलेली आहे. प्राप्त भाग भांडवलाची रक्कम प्रकल्पावर खर्च न करता उर्वरित रक्कम गिरणीने विविध बँकामध्ये ठेवी स्वरुपात जमा केलेली आहे. गिरणीने दीर्घ मुदतीच्या कर्जाची उभारणी केलेली नाही. वित्तीय संस्थाकडे पाठपुरावा देखील केलेला नाही. सन 2011-2012 पर्यंतच लेखा परीक्षण झाले आहे. त्यानंतर लेखा परीक्षण झाले नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे आपण म्हणाला आहात की, खाते गोठविली आहेत, ही खाते कधी गोठविली व का गोठविली ते देखील मी सांगतो. वस्त्रोद्योग संचालनालयात सहा वेळा आढावा सभा घेण्यात आल्या होत्या. त्यापैकी केवळ एका सभेला गिरणीचे उपाध्यक्ष उपस्थित होते. त्यांना पुढील नियोजन करण्यास सांगूनही त्यांनी ते केले नाही. त्यामुळे 29 नोव्हेंबर 2014 रोजी म्हणजे 24 वर्षानंतर गिरणीचे विविध बँकामध्ये असलेली खाती गोठविण्यात आली आहेत. डिसेंबर, 2014 मध्ये हे पत्र परत घेण्याची विनंती गिरणीने केली आहे.

....2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस...

सभापती महोदय, हे मी या करिता सांगितले आहे की, कापूस उत्पादक क्षेत्रामध्ये कापसावर प्रक्रिया करणारे उद्योग उभे करावयाचे आहेत. 24 वर्षात जर एक उद्योग उभा केला जात नसेल तर....

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मी शेतकरी सहकारी सूत गिरणीचा अध्यक्ष आहे. हे खरे आहे की, या सूत गिरणीला 1991 मध्ये परवाना मिळाला होता. गिरणीची उभारणी करण्याच्या कामास उशिर झाला हे मी मान्य करतो. 25 वर्षे अशा प्रकारे पैसा उचलला व तो वापरला असा विषय नाही. जो पैसा सुरुवातीला गिरणीला प्राप्त झाला तो पैसा इमारत उभारणी व मशिनरीची ऑर्डर देणे, त्याकरिता इलेक्ट्रीफिकेशन करणे व इतर बाबींसाठी तो वापरण्यात आला आहे. गिरणीकडे पुरेसा पैसा असल्याशिवाय मशिनरी उचलता येत नाही. पुरेसा पैसा जमा होईपर्यंत मी राष्ट्रीयकृत बँकेमध्ये हा पैसा मुदत ठेवीत ठेवला आहे. या पैशाचा गैरव्यवहार होऊ नये. हा पैसा बचत खात्यात आहे म्हणून कोणीही खर्च करु नये व डायरेक्टरने हा पैसा खर्च करण्याच्या सूचना देऊ नयेत म्हणून एकत्रितपणे हा पैसा राष्ट्रीयकृत बँकेत ठेवण्यात आला आहे. मी गिरणीचा भत्ता घेतला नाही, मी गिरणीची गाडी वापरीत नाही. मी प्रवासासाठी त्यामधून कधीही खर्च केलेला नाही. मला याचे दु:ख झाले की, इतक्या चांगल्या पध्दतीने मी सूत गिरणीचा कारभार करीत असताना मुख्यमंत्री महोदयांकडून माझ्यावर आरोप होणे योग्य नाही. सूत गिरणीमध्ये किती स्पिन्डल तयार होणार व मशिनरी उचलण्यासाठी मला पैसा पाहिजे होता, डायरेक्टरकडून मशिनरी उचलण्याची परवानगी द्यावी, यासाठी मी कंपन्याची नावे दिली, त्यासाठी किती पैसा लागेल याची माहिती दिली, पूर्ण प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करुन दिला होता. इतक्या पैशात सूत गिरणी उभारु शकतो, असा प्रोजेक्ट रिपोर्ट सादर केल्यानंतर शासनाने अशा प्रकारे तेथील खाते गोठविण्याचा निर्णय राजकीय हेतूने घेतला असावा असे मला वाटते. माझ्यावर मुख्यमंत्री महोदयांनी आरोप केलेला आहे, विधानसभेच्या प्रोसिडिंगची प्रत मुख्यमंत्री महोदयांच्या हाती येण्यापूर्वी मी सुदैवाने काढून घेतली आहे. त्यामध्ये दोन वेळा संसार, संसार असा उल्लेख करण्यात आलेला आहे. म्हणून याचे मला दु:ख झाले आहे. या पैशांचा गैरव्यवहार होऊ नये यासाठी मी प्रयत्न केले

....3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे....

आहेत. कोणतेही कारण नसताना या गिरणीचे खाते गोठविण्यात आले आहे. अशा प्रकारे माझ्यावर अन्यायकारक आरोप होत असतील तर ते योग्य नाही. मुख्यमंत्री महोदयांनी यासंदर्भातील सत्य परिस्थिती जाणून घ्यावी. सूत गिरणी सुरु होते किंवा नाही ते पहावे. त्यानंतर यासंदर्भात काय निर्णय घ्यावयाचा तो आपण घ्यावा. याबाबत काही गैरव्यवहार झाला असेल किंवा माझ्या विषयी काही तक्रार आली असेल तर माझ्यावर जरूर कारवाई करावी. विदर्भात सूत गिरणी उभारण्यात येत असताना अशा प्रकारे तिला थांबविण्यात येऊ नये किंवा त्यासंदर्भात अशा प्रकारची भूमिका घेऊ नये.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे आपल्यावर या सरकारला कोणताही अन्याय करायचा नाही. मी पुन्हा सांगतो की, आपण स्वत:च्या घराकरिता हा पैसा वापरला असे मी म्हटलेले नाही. ही बाब आपण पहिल्यांदा लक्षात घ्यावी. हे उदाहरण देण्याचे कारण इतकेच आहे की, विदर्भामध्ये 25 वर्षात एक सूत गिरणी आपण उभारु शकत नाही तर शेती मालावर प्रोसेसिंग करण्याचे आपण कितीही बोललो तरी त्याचा काहीही फायदा होणार नाही.

सभापती महोदय, ज्या भागात कापसाचे बोंड तयार होत नाही, त्या भागात लोकांनी सूत गिरण्या उभारल्या आहेत, आपल्याकडे उत्पादित होणाऱ्या कापसावर तेथे कामे सुरु झाली आहेत. विदर्भात तसे आपणाला करता आले नाही. नियोजनाची दिशा कोठे चुकली ते दाखविण्याचा मी प्रयत्न करीत आहे. 25 वर्षात आम्ही एक सूत गिरणी उभारु शकलो नाही येथे आमची नियोजनाची दिशा चुकली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवर अशा प्रकारची परिस्थिती आली आहे. आता इंटिग्रेटेड टेक्सटाईल्स पार्कच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या जीवनात आम्ही बदल घडवीत आहोत.

सभापती महोदय, पीपीपी व आयआयडी प्रकल्पाअंतर्गत व्हॅल्यू चेन करण्याचा प्रयत्न करीत आहोत. सोयाबीनच्या दोन लाख शेतकऱ्यांची व्हॅल्यू चेन तयार करण्यात येत आहे. अनेक ठिकाणी फार्मर प्रोड्युसर कंपन्या सुरु करण्यात आल्या आहेत. यातील काही कंपन्याना शेतीची अवजारे देण्यात आली आहेत. या माध्यमातून ते इतर शेतकऱ्यांना मदत करु शकतील. अशा प्रकारे वेगवेगळे कार्यक्रम शासनाने हाती घेतले आहेत. माननीय पंतप्रधान यांनी नेमलेल्या आदर्श मिश्रा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस...

समितीने सांगितले आहे की, शेतकऱ्यांना पाणी व वीज द्या, शेती मालाच्या प्रोसेसिंगची व्यवस्था करा, पणनची व्यवस्था करा त्यानुसार या सर्व बाबी करण्याचा शासन प्रयत्न करीत आहे. ऊस उत्पादक शेतकरी देखील अडचणीत आलेला आहे, महाराष्ट्रात आतापर्यंत एफआरपी 86 टक्के देण्यात आली आहे, 14 टक्के एफआरपी देण्यात आली नाही. केंद्र सरकारने जे पॅकेज दिले त्या पॅकेजनुसार एक वर्षाचे व्याज केंद्र सरकार भरणार आहे, याबाबत राज्य सरकारने असा निर्णय घेतला आहे की, पाच वर्षासाठी हे पॅकेज देण्यात येणार आहे, उर्वरित चार वर्षाचे व्याज राज्य सरकार भरणार आहे, या व्याजापोटी 400 कोटी रुपये राज्य सरकारने दिले आहेत. पॅकेजच्या माध्यमातून 2700 कोटी रुपयांचे शुगर पेमेंट बाकी आहे. यातील जवळपास 2000 कोटी रुपये पॅकेजच्या माध्यमातून देण्यात येतील. हा प्रश्न यावर्षी सुटला असला तरी पुढील वर्षात हा प्रश्न निर्माण होणार आहे. एफआरपीचा कायदा तयार करण्यात आला आहे, तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी सांगितले की, हा कायदा तयार करताना थोडी चूक झाली आहे. हा कायदा तयार करताना साखरेचे दर मार्केटशी लिंक करण्यात आले नाही. हे दर फोरकॉस्टवर आधारित आहेत. आता साखरेचे दर 1900 रुपयांपर्यंत खाली आले आहेत. पुढील वर्षासाठी फोरकॉस्टवर दर आधारित केल्यामुळे 3400 रुपये दर करण्यात आले आहेत. त्याच्या आधारे 100 रुपयांनी एफआरपी वाढविण्यात आली आहे. हे वर्ष आपण निभावून नेऊ शकतो. परंतु पुढच्या वर्षी काय करावे हा प्रश्न सरकार समोर उभा ठाकला आहे.

या नंतर श्री.भोगले..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस.....

म्हणून आमचा ऊस उत्पादक शेतकरी जगला पाहिजे, त्याला त्याच्या मेहनतीचा पैसा मिळाला पाहिजे. ही जी साखर कारखानदारी आपण उभी केली ती जिवंत राहिली पाहिजे. या दृष्टीने या सभागृहाने कुठे तरी चिंतन करण्याची आवश्यकता आहे. अशा प्रकारच्या कायद्याच्या माध्यमातून रॉ मटेरियलवर निर्बंध लावले आणि फिनिश प्रॉडक्ट मार्केटवर सोडून दिले. त्यातून ही अवस्था तयार झाली आहे. त्या संदर्भात गांभीर्याने काम करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, शेतीसोबत जोडधंदे उभे करण्याची आवश्यकता आहे. माननीय पंतप्रधानांनी सांगितले होते, त्यानंतर पॅकेज दिले गेले. मग जोडधंद्याच्या नावाने गायी दिल्या गेल्या. याबाबत कॅगने स्पष्टपणे अहवालामध्ये सांगितले आहे. मी त्याबाबत पुन्हा बोलून सभागृहाचा वेळ घेणार नाही.

सभापती महोदय, विदर्भ आणि मराठवाडयातील 14 जिल्हयांमध्ये दूध उत्पादनासाठी प्राथमिक दूध संस्थांचे बळकटीकरण आणि स्वच्छ दूध निर्मितीकरिता आपण 24 कोटी रुपयांचा कार्यक्रम हाती घेतला आहे. दोन वर्षात 350 दूध संस्थांना प्रशिक्षण देणे, स्वच्छ दूध उत्पादनाकरिता साहित्य या गोष्टींचा त्यामध्ये अंतर्भाव आहे. दोन वर्षात विदर्भ आणि मराठवाडयातील 14 जिल्हयांमध्ये ब्रॉयलर पालनाचा कार्यक्रम हाती घेऊन त्याचे क्लस्टर तयार करणार आहोत. यासाठी 100 कोटी रुपयांचा नियतव्यय देण्याचे ठरविले आहे. त्याच बरोबर शेततळ्यांमध्ये मत्स्यबीज, कोळंबी संवर्धनाचा कार्यक्रम आणि मासळी विक्रीकरिता फिरते वाहन उपलब्ध करुन देण्याचा कार्यक्रम हाती घेत आहोत. जोडधंद्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांना उचित दिशा मिळाली पाहिजे. यासोबत राज्य सरकारने हाही निर्णय घेतला आहे की, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या सर्व मुलांच्या शिक्षणाचा खर्च राज्य सरकार उचलणार आहे. अशा प्रकारचा निर्णय आपण घेतला आहे. ज्यावेळी स्वावलंबन मिशन सुरु झाले त्यावेळी सरकारने सर्वेक्षण सुरु केले. 1 लाखापेक्षा जास्त घरांमध्ये सर्वेक्ष्ज्ञण करण्यात आले. त्यातून असे दिसून आले की, अन्नदात्याची अवस्था अशी आहे की, त्याला दोन वेळचे खायला अन्न नाही. त्याला अन्न सुरक्षा योजनेमध्ये आणून 2 रुपये किलो दराने गहू व 3 रुपये किलो दराने तांदूळ देण्याची योजना सुरु करणार आहोत. आघाडी सरकारने योजना आखली होती, त्यामधून त्या शेतकऱ्याला इकॉनॉमिक कॉस्टवर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस...

अन्नधान्य दिले जात होते. बीपीएल अंतर्गत जे लाभार्थी शेतकरी होते त्यांना फायदा मिळत होता. परंतु पांढऱ्या रंगाची शिधापत्रिका धारण करणाऱ्या लोकांना 7 रुपये किलो दराने गहू आणि 8 रुपये किलो दराने तांदूळ दिला जात होता. आघाडी सरकारने केलेल्या सर्वेक्षणातून ही आकडेवारी तयार केलेली आहे. जे अन्नसुरक्षा योजनेच्या अंतर्गत येत नाहीत अशा 23 लाख शेतकऱ्यांना 2 रुपये किलो दराने गहू आणि 3 रुपये किलो दराने तांदूळ दिला पाहिजे. तुमचे शासन 7 रुपये किलो दराने गहू आणि 8 रुपये किलो दराने तांदूळ देत होते. तुमच्याच मिशनने जे सांगितले ते तुम्ही केले नाही. आम्ही ते करण्याचा निर्णय घेतला आहे. 21.69 लाख शेतकऱ्यांना या योजनेंतर्गत आणण्यासाठी दरमहा 24 कोटी रुपये खर्च येणार आहे. म्हणजे वार्षिक 280 कोटी रुपये लागणार आहेत. पैशाचा प्रश्न नाही. 3-3 समित्यांनी सांगूनही तुम्ही हे केले नाही हा महत्वाचा प्रश्न आहे.

सभापती महोदय, दुसऱ्या समितीने असे सुचविले होते की, शेतकऱ्यांना आरोग्यासाठी ॲक्सेस नाही. म्हणून राजीव गांधी जीवनदायी योजना आपण सुरु केली. मला या ठिकाणी सांगावेसे वाटते की, या 14 जिल्हयांमध्ये फक्त 114 हॉस्पिटल्स या योजनेंतर्गत आहेत. आतापर्यंत राज्यात एकूण शस्त्रक्रिया आणि इतर उपचाराच्या गोष्टी झाल्या त्यापैकी केवळ 25 टक्के या भागामध्ये झाल्या आहेत. त्यातही ही जी नोंदणीकृत हॉस्पिटल्स आहेत त्यापैकी अधिकाधिक हॉस्पिटल्स प्रामुख्याने औरंगाबाद, अमरावती आणि वर्धा या तीन शहरातील आहेत.

सभापती महोदय, डॉ.नरेंद्र जाधव समितीने जी शिफारस केली त्यानुसार या 14 जिल्हयातील शेतकऱ्यांना कुठल्याही अटी ठेवण्यात येणार नाहीत. सर्वांना या योजनेसाठी पात्र ठरविले जाईल. त्याकरिता जे 330 रुपये अतिरिक्त प्रिमियम भरावे लागेल, ते भरण्यात येईल. अतिरिक्त हॉस्पिटल्स एमपॅनल करण्यात येतील. करारानुसार 500 पेक्षा अधिक हॉस्पिटल्स एमपॅनल करु शकत नाही. करावयाची झाल्यास जास्त पैसे द्यावे लागतात. ते देण्याची राज्य सरकारची मानसिकता झालेली आहे. त्यामध्ये अधिक हॉस्पिटल्स आणून ती नोंदणीकृत करण्यात येऊन 108 क्रमांकावरील ॲम्ब्युलन्स सेवेची जोड याला देणार आहोत. या सर्व शेतकऱ्यांना

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

आरोग्य सेवेकरिता ॲक्सेस मिळाला पाहिजे, यासाठी प्रयत्न करणार आहोत. झोपलेल्याला जागे करता येते, परंतु झोपेचे सोंग घेतलेल्याला जागे करता येत नाही.

..3...

21-07-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) CC.3

SGB/ ST/ AKN/ 15:20

श्री.देवेंद्र फडणवीस....

सभापती महोदय, याचे मॉनिटरिंग करण्याकरिता मिशन मोडवर काम करणार आहोत. मिशन मोडवर या गोष्टी पाहण्याचे ठरविले आहे. यवतमाळ आणि उस्मानाबाद या दोन जिल्हयांमध्ये पथदर्शी प्रकल्प आहे. मी त्यातील सर्व गोष्टी सांगून पुनरुक्ती करणार नाही. परंतु योजनांचे सॅच्युरेशन करण्याचे ठरविले आहे. सचिव या ठिकाणी नेमण्याचे कारण काय असा प्रश्न उपस्थित करण्यात आला. अनेकदा योजना आली की, डिलिव्हरी मेकॅनिझम मधील लोक योजना खातात. म्हणून सचिवांना सांगितले की, तुम्ही या डिलिव्हरी मेकॅनिझमवर लक्ष द्या. सचिव त्या ठिकाणी गेले, त्या ठिकाणी शेतकरी कुटुंबांना भेटले. सचिवांनी अहवाल दिला की, शेतकऱ्यांनी आत्महत्या करण्यामागे त्यांची व्यसनाधिनता कारणीभूत आहे अशी बातमी वृत्तपत्रात आल्याचे सांगण्यात आले. कोणत्याही सचिवांनी अशा प्रकारचा अहवाल दिलेला नाही. एका सचिवांनी अहवालात असे नमूद केले की, मी सहा घरांमध्ये गेलो. या 6 पैकी 5 लोकांनी शेतीच्या कारणाने आत्महत्या केली होती. एका घरच्या लोकांनी सांगितले की, खूप व्यसने होती म्हणून त्यांनी आत्महत्या केली. मग या 5 लोकांनी आत्महत्या का केली, त्याची सगळी कारणे अहवालात लिहिली आहेत.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, शासनाकडे सर्व यंत्रणा आहे. गावचे पोलीस पाटील, तलाठी, सरपंच आहेत. सचिवांनी त्या ठिकाणी जाण्यापेक्षा सरकारी यंत्रणांच्या दरबारी आत्महत्याची नोंद होते. म्हणून आमचा आक्षेप होता.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सचिव आत्महत्यांची नोंद घेण्यास गेले नव्हते. माननीय सदस्य श्री.भाई जगताप समजून घेत नाहीत. ते हुशार आहेत. इतकी वर्षे मी त्यांना ओळखतो. इतकी छोटी गोष्ट त्यांना समजणार नाही असे नाही.

नंतर 2 डी.1..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस...

आपण समजून घ्यायचे नाही असे ठरविले आहे. तो सचिव काय नोंद घेण्याकरिता गेला होता काय ? तलाठ्याच्या भरवशावर आत्महत्या का होतात हे समजले असते तर आता पर्यंत चार कमिट्या बनविण्याची आवश्यकता का भासली ? डिलिव्हरी सिस्टीममध्ये काय प्रॉब्लेम आहेत हे पाहण्यासाठी सचिव तेथे गेले होते. त्यांनी प्रामाणिकपणे तेथे भेटी दिल्या आणि डिलिव्हरी सिस्टीम का पोहोचली नाही हे समजून घेतले. विहिरी का मिळाल्या नाहीत हे समजून घेतले. आज आपण योजनांचे कन्व्हर्जन करणार आहोत. प्रत्येक शेतकऱ्याला किमान एक लाख रुपया पर्यंतची योजना मिळाली पाहिजे अशा प्रकारचा प्रयत्न आपण करणार आहोत. वेगवेगळ्या योजनांचा त्याला लाभ मिळाला पाहिजे. त्याचे मी स्वतंत्र निवेदन करीन. खूप मोठी योजना तयार केली आहे. ही योजना कशी चालते हे वर्षभर पाहिल्यानंतर त्याचे शॉर्ट कमिंग्ज काय आहेत हे आपण लक्षात घेणार आहोत. ते शॉर्ट कमिंग्ज दूर करण्यात येतील आणि त्यानंतर इतर जिल्ह्यांमध्ये ही योजना राबविण्यात येणार आहे. त्यामुळे एक पथदर्शी प्रकल्प आपण सुरू केलेला आहे.

खरे म्हणजे गेल्या आठ महिन्यांमध्ये या सरकारने काय काय केले आहे याची सगळी यादी माझ्याकडे असून मी येथे ठेवणार नाही. पण एकच गोष्ट सांगणार आहे. कोणी तरी म्हणाले की, आपण सांगून देखील चार हजार कोटी रुपये दिले नाहीत. खरीपाचे 90 लाख रुपये शेतकऱ्यांना देण्यात आले आहेत. त्यानंतर फेब्रुवारी मध्ये गारपीट झाली झाल्यामुळे 7 लाख शेतकऱ्यांना मदत केली आहे. पुन्हा झालेल्या गारपिटीमुळे 6 लाख शेतकऱ्यांना पैसे देण्यात आले आहेत. जे राहिले आहेत त्यातील अनेक शेतकरी असे आहेत की, जे शेती करीत नाही. त्यांची फक्त खाती आहेत. ते क्लेमच करायला येत नाहीत. ते शहरांमध्ये आहेत. असे अनेक लोक आहेत. आम्ही आता पर्यंत 1 कोटी 3 लाख शेतकऱ्यांना मदत केलेली आहे. 4785.00 कोटी रुपयांची मदत ही थेट शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये गेली आहे. त्या व्यतिरिक्त इन्श्युरन्सचे 1600 कोटी रुपये आपण दिले आहेत. त्यातील 750 कोटी रुपयांचा वाटा राज्य शासनाने आपल्या बजेटमधून दिलेला आहे. त्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

व्यतिरिक्त दुसरी इन्श्युरन्सची योजना होती त्यात 200 कोटी रूपये आपण दिले आहेत. या व्यतिरिक्त 3 बँकांना 350 कोटी रूपये आपण दिले आहेत. गेल्या आठ महिन्यांमध्ये आम्ही कशा-कशासाठी निधी दिला आहे त्यासंबंधातील तीन पानांची यादीच माझ्याकडे उपलब्ध आहे. या निमित्ताने माझे एवढेच सांगणे आहे की, रोग काय आहे आणि उपाय काय आहे हे आपण समजून घेतले नाही तर रोग कधीच बरा होऊ शकत नाही. मी पहिल्या दिवशी सांगितले की, कर्ज माफीला आमचा विरोध नाही. आमचे मत एवढेच आहे की, कर्ज माफी हा एकमेव उपाय नाही.

सभापती महोदय, आपण सत्तेमध्ये असताना सन 2008 मध्ये कर्ज माफी केली व त्यानंतर सहाव्या वर्षी पुन्हा कर्ज माफी मागावी लागते याचा अर्थ नियोजनामध्ये काही तरी चूक होत आहे. एकदा कर्ज माफी केल्यानंतर शेतकरी कर्ज मुक्त झाला पाहिजे, पुन्हा त्याच्यावर कर्ज माफी मागण्याची वेळ येता कामा नये अशा प्रकारे त्याला आपण उभे केले पाहिजे. आपण 7 ते 8 हजार कोटी रूपये कर्ज माफीसाठी खर्च केले. त्यातील 4 हजार कोटी रूपये कृषी विकासासाठी खर्च केले असते तर आपल्याला बरेच परिवर्तन झाल्याचे दिसले असते. आपण मागच्या काळात 8 हजार कोटी रूपये रिलीफ वर खर्च केले. ते आवश्यकच होते. कृषी विकासावर आपण एक हजार कोटी रूपये खर्च केले. रिलीफ आपल्या ठिकाणी आहेच. तो असलाच पाहिजे. आपली कर्जावर आधारित कृषी अर्थ व्यवस्था आहे. ती गुंतवणुकीवर आधारित कृषी अर्थ व्यवस्था तयार करीत नाही तो पर्यंत यामध्ये परिवर्तन होऊ शकत नाही. म्हणून आम्ही दर वर्षी पाच हजार कोटी या प्रमाणे 25 हजार कोटी रूपयांची अतिरिक्त तरतूद वेगवेगळ्या योजनांच्या माध्यमातून उभा करण्याचा निर्णय घेतला आहे. आम्ही कर्ज नव्हे तर कृषी विकासावर निधी खर्च करणार आहोत. आम्ही कृषी इन्व्हेस्टमेंट म्हणून खर्च करणार आहोत. 52 टक्के लोक हे शेतीवर अवलंबून आहेत. शेतकऱ्याला पाणी दिले, वीज दिली, पणनची व्यवस्था केली तर तो पुन्हा कर्ज बाजारी होणार नाही, तो पुन्हा कर्ज माफी मागणार नाही. तो कर्ज मुक्त होईल. त्यामुळे 52 टक्के कृषीवर जीवन जगणाऱ्या लोकांना दिलासा देण्यासाठी आवश्यकता पडली तर संसाधन वाढविण्याचा देखील प्रयत्न करण्याचा निर्णय

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस...

आम्ही घेतला आहे. आज संसाधन कमी असल्यामुळे ॲडिशनल टॅक्स लावण्यास देखील आम्ही तयार आहोत. 25000 कोटी रूपये शेतकऱ्याला सक्षम बनविण्याकरिता राज्य सरकार खर्च करणार आहे. हा खर्च बँकांना सक्षम करण्यासाठी करणार नाही. बँकांना सक्षम करण्यासाठी आम्ही दुसरा उपाय केला आहे. त्या उपायाने बँकांना आम्ही सक्षम करू. हे पैसे शेतकऱ्यांच्या हातामध्ये देऊ. शेतकऱ्याला सक्षम करू आणि त्यातून तुमच्या आमच्या स्वप्नातील महाराष्ट्र उभा करू एवढेच या ठिकाणी बोलतो आणि माझे बोलणे संपवितो.

.....

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय,....

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी कृपा करून थांबावे. कृपया आपण सर्वांनी गांभीर्याने घ्यावे. मुंबईत जरी दुष्काळ नसला तरी आमच्या भागात दुष्काळ आहे याची आपण नोंद घ्यावी. आता राईट टु रिप्लाय होईल. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांच्या घरात दु:खद घटना घडल्यामुळे ते काही येऊ शकत नाही. त्यामुळे मी आता राईट टु रिप्लाययवर बोलण्यासाठी सनमाननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांना संधी देत आहे. त्यानंतर अपवादात्मक बाब म्हणून मी सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना बोलण्यास संधी देणार आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, आताच सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर बोलत असताना कर्ज माफी बद्दल इतर पर्याय कसे आहेत यासंबंधी आपले मत मांडले आहे. आपल्या भाषणाच्या सुरूवातीला ते वेदर फोरकास्टवर बोलले आहेत. कर्ज माफी ऐवजी पर्याय काय आहेत हे देखील त्यांनी सांगितले. हा प्रस्ताव फक्त कर्ज माफी पुरता मर्यादित नव्हता. या प्रस्तावामध्ये सूचना व मुद्दे होते. आपल्या उत्तरामध्ये आपण विदर्भाचा देखील उल्लेख केला आहे. आज मराठवाडा सातत्याने चौथ्या वर्षी दुष्काळाला सामोरे जात असताना अनेक सन्माननीय सदस्यांनी आपापली मत त्यावर मांडली आहेत. त्यामुळे हा प्रस्ताव केवळ कर्ज माफी पुरता मर्यादित होता अशातला भाग नाही. माननीय मुख्यमंत्र्यांच्या उत्तरातून आम्हाला अपेक्षा होती. माननीय मुख्यमंत्री गृहीत धरून चालले होते की, काही ठिकाणी कमी जास्त पाऊस पडेल. मराठवाड्यामध्ये पावसाची सर येईल. झुळूक येईल. या सर्व गोष्टींचा उल्लेख करीत असताना जणू काही आता पाऊस पडणार आहे आणि दुष्काळ येणारच नाही अशा भ्रमात माननीय मुख्यमंत्री होते. नव्हे तशा प्रकारच्या कल्पनेतील आपले भाषण मी ऐकत होतो. या दुष्काळाला सामोरे जात असताना त्याची दाहकता किती असते हे आम्ही सातत्याने तीन वर्षे अनुभवत आहोत. त्यामुळे यावरच्या उपाययोजनांवर बोलणे अधिक महत्त्वाचे होते असे मला वाटते. मराठवाड्यातील बीड जिल्ह्यात 50 दिवस पुरेल एवढाच चारा शिल्लक आहे. कडबा बाजारात आलेला नाही. त्यामुळेच आपल्याला 1200 ते 1500 रूपयाने कडबा दिसत आहे. कारण आज कडबाच्या स्वरूपात ऊस बाहेर चालला आहे. साधारणपणे बीड जिल्ह्यात 12 ते 13 लाख टन ऊस उभा आहे. तो सगळा ऊस पश्चिम महाराष्ट्रातील नगर जिल्ह्यामध्ये कडबा वैरण म्हणून चालला आहे. त्याला 2200 ते 2300 रूपये क्विंटल भाव मिळत आहे. त्यामुळे कडबा बाजारात येताना दिसत नाही. आज कडबा अल्पशा प्रमाणात शिल्लक आहे. आज बीड जिल्ह्यात 50 दिवस पुरेल एवढेच वैरण उपलब्ध आहे. त्यामुळे यासंबंधातील आपले मत मांडणे आवश्यक होते. आज आपण वैरण कुठून आणणार आहात, आपण पाणी कुठून आणणार आहात ? आमचे जायकवाडीवरचे अवलंबत्व 62 टक्के आहे. पिण्याचे सर्व पाणी जायकवाडी प्रकल्पातून येते. बीड शहराला माजलगावचे बँक वॉटरचे पाणी येते. गेवराई

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित....

शहराला जायकवाडी धरणातून पाणी येते. जेथे आमचे अवलंबत्व 62 टक्के पेक्षा अधिकचे आहे तेथे आता पाणी नाही. आता पर्यंत आम्ही पाणी रेल्वेच्या वॅगनमधून आणणार आहोत हे भाषणातून ऐकत आलो आहोत. आपण पिण्याच्या पाण्याचे टँकर्स लावत आहात. परंतु, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता अधिक काळ राहील अशी परिस्थिती आज आमच्याकडे नाही. त्यामुळे मुख्यमंत्र्यांच्या उत्तरामध्ये त्यासंबंधातील अपेक्षा होती. पण ती काही आलेली नाही.

माननीय मुख्यमंत्र्यांनी शाश्वत शेतीचा देखील उल्लेख केला आहे. मी देखील त्याचा काल उल्लेख केला होता. यदाकदाचित दुष्काळ विदर्भ व मराठवाड्यातून नाहीसा करावयाचा असेल तर शाश्वत शेती संबंधात माननीय मुख्यमंत्र्यांनी विचार मांडावेत असे माझे मत व्यक्त केले होते.

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित .....

आज आमच्याकडे पिण्याचे पाणी नाही तर आमच्या शेतीला कसे पाणी देणार ? मी काल परवा माननीय पवार साहेबांकडे मराठवाडयाच्या पाण्याच्या संदर्भात आपल्याकडे प्रतिनिधीत्व करावे यासाठी बैठक घेण्याचा प्रयत्न केला होता. आमच्या मराठवाडयाच्या 18 टीएमसी पाण्याच्या संदर्भात मी या सभागृहात सतत उल्लेख करीत असतो. परंतु या संदर्भात आजही तोडगा निघत नाही. 18 टीएमसी पाण्याचे खाते आमच्या बीड जिल्हयाकडे आहे. परंतु दुर्दैवाने अधिकाऱ्यांनी आम्हाला जे 18 टीएमसी पाणी उपलब्ध करुन दिले आहे ते आम्हाला हैड्रॉलॉजीने उपलब्ध करुन दिले आहे. नॉन फंक्शनल जे प्रोजेक्ट आहेत, केटी वेअर आहेत, जे प्रोजेक्ट अर्धवट अवस्थेत पडलेले आहेत त्यातून आम्हाला 18 टीएमसी पाणी उपलब्ध झाले आहे. जायकवाडीचे तुटीचे खोरे 22 टीएमसीचे आहे. त्याच्या अगेन्स्ट हे 18 टीएमसी पाणी आम्हाला उपलब्ध झालेले आहे. या प्रश्नाच्या संदर्भात काहीही मार्ग निघालेला नाही. मराठवाडयाला तुम्ही कागदोपत्री पाणी दिलेले आहे. परंतु त्यातून मुर्तस्वरुपात निकाल मिळत नाही. ज्या ज्या वेळेस आम्ही या प्रश्नाच्या संदर्भात बोलतो त्या त्या वेळेस तुमच्याकडून एकच उत्तर येत असते ते म्हणजे या 18 टीएमसी पाण्याच्या संदर्भात माननीय राज्यपाल महोदयांनी स्थगिती दिल्यामुळे मराठवाडयातील हे प्रकल्प पूर्ण होऊ शकत नाही. परंतु आम्हाला काल-परवा माहिती मिळाली आहे की, बीड जिल्हयातील 123 प्रकल्पांपैकी 67 प्रकल्प अधिकारीस्तरावर रद्दबातल ठरवले गेले आहेत. 67 प्रकल्प रद्दबातल ठरवण्यामागील कारण असे देण्यात आले आहे की, प्रतिकूल परिस्थितीमध्ये माजलगावचे धरण भरत नाही, मध्य गोदावरी मधील मोठया प्रकल्पांना पाणी मिळत नाही म्हणून 67 लहान लहान प्रकल्प रद्दबातल ठरविले गेले आहेत. या प्रकल्पासाठी भुसंपादन करावे लागणार नव्हते, या प्रकल्पांना दीड दोन कोटी रुपयांपेक्षा अधिकचा खर्चही येणार नव्हता. परंतु हे छोटे छोटे बीड जिल्हयातील प्रकल्प अधिकाऱ्यांनी रद्दबातल ठरविले आहेत. हे 67 प्रकल्प रद्दबातल ठरविले गेले याची माहिती बहुतेक मंत्री महोदयांना सुध्दा नसेल असे मला वाटते. या प्रकल्पाच्या संदर्भातील डिटेल प्रोजेक्ट तयार करीत असताना 67 प्रकल्पांना वगळण्यात आले. असे जर असेल तर आमचा शेतकरी शाश्वत शेती कशी काय करु शकेल ? आमचे शाश्वत सिंचन होणार कसे ?

...2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित .....

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यानी या चर्चेला उत्तर देत असताना शेती मालाच्या भावाबद्दल विचार व्यक्त केले. आपण मिनिमम सपोर्ट प्राईजचा मुद्दा मांडला होता. आता मिनिमम सपोर्ट प्राईजच्या संदर्भात वारंवार विषय उपस्थित होत असतो. आज आपण कापसाला फक्त 4050/- रुपये प्रति क्विंटल भाव दिलेला आहे. एवढया कमी दरावर आम्ही आमचे जीवन जगावयाचे काय ? शेती मालाला भाव देणे हे मिनिमम सपोर्ट प्राईजवर अवलंबून नाही, तर तुमचे कृषीच्या संदर्भातील धोरण महत्वाचे आहे. तुमचे कृषी क्षेत्रातील धोरण यदाकदाचित बदलले तर बाजारभाव वाढल्याशिवाय राहणार नाही. तुमचा कापसाचा मिनिमम सपोर्ट प्राईज 4000/- रुपये. होता. परंतु सन 2012-2013 मध्ये कापसाचे दर 6800 ते 7200 रुपयांपर्यंत गेले होते. असे असताना तुम्ही मिनिमम सपोर्ट प्राईज घेऊन बसलात ? आज कापसाचा दर 4050 रुपये आहे आणि या दराने आम्ही आमचा कापूस विकावयाचा ? सोयाबीन, तुरच्या मिनिमम सपोर्ट प्राईजवर आम्ही आमचा माल विकावयाचा ? सोयाबीनचा भाव 4200 रुपये होता तो आता 2500-2600 रुपयांवर आला आहे. मला आपल्याला सांगावयाचे आहे की, तुमचा मिनिमम सपोर्ट प्राईज महत्वाचा नसून तुमचे शेती विषयक धोरण जोपर्यंत बदलत नाही तोपर्यंत शेतीमालाचे बाजारभाव वाढणार नाही. बाजारभाव तुमच्या धोरणावर अवलंबून आहे. ऊसाचे आणि साखरेचे दर त्यावरच अवलंबून आहे. त्यामुळे या शासनाचे शेतीचे धोरण महत्वाचे आहे.

सभापती महोदय, मराठवाडा गेल्या चार वर्षापासून दुष्काळाला सामोरे जात असून या भागातील एक प्रतिनिधी म्हणून मी सांगू इच्छितो की, 60 टक्के शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध होत नाही अशी माहिती माननीय मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी दिली आहे. या 60 टक्के शेतकऱ्यांना कर्ज न मिळण्याचे कारण असे आहे की, हे 60 टक्के शेतकरी आता शेती करण्यास लायक राहिलेले नाहीत, या शेतकऱ्यांकडे साधनांचा,सोयी-सुविधांचा अभाव असल्यामुळे या शेतकऱ्यांना कर्ज मिळत नाही. या विषयाच्या संदर्भात आम्ही आमच्या भाषणात उल्लेख केला होता. या विषयाच्या संदर्भात मुख्यमंत्र्यांनी उल्लेख केला आहे परंतु आपण त्यासंदर्भातील उपाययोजनांचा उल्लेख आपल्या भाषणात करणे गरजेचे होते असे मला वाटते. आज आमच्याकडील शेती करण्यालायक राहिलेली नाही. आमच्याकडील सर्व शेती पडीक आहे. त्यामुळे या शेतीसाठी आपण कोणती उपाययोजना

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित .....

करणार आहात ? या दुष्काळाला सामोरे जात असताना मुख्यमंत्र्यांनी विहिरींचा उल्लेख केला आहे परंतु त्या विहिरींचे निकष काय राहणार आहेत ? आमची जी शेती पडीक झालेली आहे ती पुन्हा लागवडीखाली आणण्यासाठी आपण कोणती उपाययोजना करणार आहात यासंदर्भातील उल्लेख माननीय मुख्यमंत्र्यांनी या चर्चेच्या माध्यमातून करणे गरजेचे होते असे माझे व्यक्तिगत मत आहे.

सभापती महोदय, मराठवाडा दुष्काळाला सामोरे जात असून मराठवाड्यातील शेतकऱ्यांना तुम्हाला सावरावयाचे असेल तर दुष्काळाच्या संदर्भातील उपाययोजना महत्वाच्या असून त्यासंदर्भातील उल्लेख महत्वाचा नाही. शेती ही शेती लायक करण्यासाठी शासनाचे धोरण महत्वाचे राहणार असून या मुद्यांचा उल्लेख माननीय मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणात करावयास पाहिजे होता एवढेच मला राईट ऑफ रिप्लायच्या निमित्ताने नमूद करावेसे वाटते.

धन्यवाद.

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, संपूर्ण राज्यातील शेतकऱ्यांचे लक्ष विधानमंडळाकडे लागले असून गेल्या तीन साडेतीन दिवस पासून दोन्ही सभागृहातील सर्व पक्षीय सदस्यांनी राज्यातील शेतकऱ्यांची कर्जमाफी माफ व्हावी या संदर्भात आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. कर्जमाफीच्या चर्चेवर विरोधी पक्षाने तसेच सत्ताधारी पक्षातील शिवसेनेच्या सन्माननीय सदस्यांनी तसेच बीजेपीच्या सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त करीत असताना या राज्यातील शेतकऱ्यांच्या होत असलेल्या आत्महत्या थांबवायच्या असेल तर कर्जमाफी झाली तरच शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबू शकतील असे पोडतिडकीने दोन्ही सदनात सर्व पक्षीय सदस्यांनी विचार व्यक्त केले आहेत. कर्जमाफीच्या चर्चेला उत्तर देत असताना खालच्या सभागृहात माननीय मुख्यमंत्र्यांनी दोन तास भाषण केले व या सभागृहात देखील जवळ जवळ पावणेदोन तास उत्तर दिले. माननीय मुख्यमंत्र्यांनी या चर्चेच्या उत्तराला अधिक वेळ घेण्याचे एकच कारण होते की, शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या संदर्भात आम्ही निर्णय घेऊ शकत नाही, घेणार नाही हे सांगण्याकरिता त्यांनी अवांतर विषयावर भाष्य केले. माननीय मुख्यमंत्र्यांनी या विषयाच्या संदर्भात विकासाच्या मुद्याच्या संदर्भातील माहिती दिली ती माहिती त्यांना वेगळया विषयावर सुध्दा देता आली असती, निवेदने करता आली असती परंतु कर्जमाफी करता येत नाही किंवा शेतकऱ्यांना कर्जमाफी करावयाची नाही हे सांगण्यासाठी तुम्ही काही केले नाही म्हणून आम्ही काही तरी करतो हे सांगण्यासाठी राज्यातील दोन्ही सदनाला चुकीची आकडेवारी देण्याचा प्रयत्न माननीय मुख्यमंत्र्यांनी केला असून ती अतिशय दुर्दैवाची बाब आहे. चर्चेच्या माध्यमातून माननीय मुख्यमंत्री कर्जमाफीच्या संदर्भात काही तरी बोलतील अशी आमची अपेक्षा होती. परंतु त्यांनी उत्तराला अशी सुरुवात केली की, मागची कर्जमाफी दिली त्यावेळी शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबल्या होत्या ? त्यांच्या सचिवांना अहवाल तयार करण्यास सांगण्यात आले होते. शेतकऱ्यांच्या आत्महत्या कर्जबाजारीपणामुळे झालेल्या आहेत याची माहिती सचिवांच्या रिपोर्टमध्ये नाही परंतु ही माहिती शासनाच्या रिपोर्टमध्ये आहे. अशी परिस्थिती असताना काही तरी वेगळया पध्दतीची मागणी करावयाची, विदर्भात आम्हाला कमी मिळाले, तुम्हाला जास्त मिळाले असे सांगून विदर्भातील जनतेला भडकावयाचे. मराठवाडयातील लोकांना सांगावयाचे की, तुम्हाला मागच्या वर्षी 17 टक्के कर्ज माफी मिळाली होती. विदर्भातील

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. माणिकराव ठाकरे .....

जेवढया शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत त्या केवळ कर्जबाजारीपणामुळेच केल्या आहेत. आमच्या शेतकऱ्यावर 10-20 लाखाचे कर्ज नव्हते तर ते केवळ 30-40 हजाराचे होते व त्यामधून त्यांची उपजीविका चालत होती.

यानंतर श्री. अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे...

शेतकऱ्यांची कर्जमाफी न दिल्यामुळे त्यांचा उदरनिर्वाह चालू शकत नाही. आज विदर्भ आणि मराठवाड्यातील 25 लाख शेतकऱ्यांना माननीय मुख्यमंत्र्यांनी वाऱ्यावर सोडले आहे, त्यांना तरी कर्जमाफी द्यायची होती. माननीय मुख्यमंत्री विदर्भातील आहेत. त्यांना शेतकऱ्यांबद्दल काही वाटत असते तर त्यांनी विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांना काही न्याय देण्याचा प्रयत्न केला असता. पण त्यांनी आम्ही मागील वर्षी किती कर्ज दिले हे दाखविण्याचा प्रयत्न केला. मागील वर्षी किती कर्ज दिले हे सर्वांना माहीत आहे.

सभापती महोदय, मी या ठिकाणी यवतमाळ जिल्हा बँकेचे उदाहरण देतो. राज्य बँकेने हमी घेतली नाही म्हणून यवतमाळ जिल्हा बँक शेतकऱ्यांना 125 कोटी रुपयांचे कर्ज देऊ शकले नाही. परंतु ज्यावेळी कर्जमाफ झाले त्यावेळी त्या बँकेने 600 कोटी रुपयांची कर्जमाफी केली. जे शेतकरी कर्ज मिळण्यापासून वंचित राहिले आहेत त्यांच्या संदर्भात काही भूमिका घ्यायची नाही आणि मोठा आव आणून कोणत्याही बँकेने 15 जुलैच्या आत कर्ज दिले नाही तर आम्ही त्यांच्यावर कारवाई करू असे सांगायचे.

सभापती : मी सन्माननीय सदस्य यांना सांगू इच्छितो की, मी आपणास अपवाद म्हणून बोलण्याची संधी दिलेली आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय विरोधी पक्ष नेते उपस्थित नाहीत. राईट ऑफ रिप्लायवर तीन तीन सदस्य बोलत असतील तर त्याला माझी काही हरकत नाही. त्यांनी आणखी एक तास बोलावे. पण सरकारच्या वतीने माझी भूमिका एक तास मांडेन आणि त्यानंतर माननीय मुख्यमंत्री एक तास भूमिका मांडतील. आपण आम्हाला ती परवानगी द्यावी, अशी विनंती आहे. आपण चांगले पायंडे पाडले आहेत, त्यांना बोलण्याची संधी आहे. या नवीन पायंड्याचे मी स्वागत करतो.

सभापती : मी पायंडा हा शब्द वापरलेला नाही. मी अपवाद हा शब्द वापरलेला आहे. अपवादाचा पायंडा होऊ शकत नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी राष्ट्रीयकृत बँकांना शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करण्यास सांगितले. पण केंद्रीय वित्त सचिव डॉ.हसमुख अडिया यांनी दिनांक 6 जुलै रोजीच्या पत्रान्वये राज्याच्या मुख्य सचिवांना कळविले की, शेतकऱ्यांना कर्ज देण्यासाठी आमच्या बँकावर दबाव आणू नका. एकीकडे राष्ट्रीयकृत बँकांना कर्ज देण्यासाठी सांगायचे आणि दुसरीकडे केंद्रीय वित्त सचिवांनी शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करु नका असे सांगायचे. मी जर चुकीचे काही सांगत असेल तर आपण आपल्या उत्तरात सांगावे.

सभापती महोदय, या ठिकाणी WTO चा उल्लेख झाला. दिनांक 3 आणि 7 डिसेंबर रोजी WTOची दिल्लीला मिटींग झाली. बाली येथे मिटींग झाली. त्या बैठकीचे इतिवृत्त केंद्राकडून पब्लिश केले जाते. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, " भारत सरकार के सदस्य देशों से दो टूक लहज में कह दिया है कि खाद्य सुरक्षा के मसले पर कोई समझौता नहीं किया जाएगा." भारत सरकारच्या वतीने अशी स्पष्टपणे भूमिका घेतली..(अडथळा).. माननीय मुख्यमंत्री बसून बोलत आहेत हे बरोबर आहे काय ? भारतीय वाणिज्य मंत्री श्री आनंद शर्मा ने डब्ल्यूटीओ के नववे मंत्रिमंडल की बैठक को संबोधित करते हुए कहा कि विकासशील और गरीब देशों के चार अरब से ज्यादा आबादी के लिए खाद्य सुरक्षा अहम मसला है. कृषि क्षेत्र पर करोड़ों किसानों की जीविका निर्भर है. इनके हित सुरक्षित होने चाहिए, ऐसे में भारत की खाद्य सुरक्षा व्यवस्था पर कोई समझौता भारत नहीं करेगा."

सभापती : हे बरोबर नाही. मी आपणास अपवाद म्हणून राईट ऑफ रिप्लायवर बोलण्याची संधी दिलेली आहे. आपण एक-दोन पॉईंट मांडावेत.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, त्या बैठकीत इतकी स्पष्टपणे चर्चा झाल्यानंतर माननीय मुख्यमंत्री सांगत आहेत की, WTO च्या संदर्भामध्ये मागच्या सरकारने मान्य केले. आम्ही हे मान्य केलेले नाही.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी यवतमाळ जिल्ह्यातील पिंपरी-बुटी गावाला भेट दिली. त्या गावाची लोकसंख्या 1700 आहे. तेथील 11 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. माननीय मुख्यमंत्री एखाद्या गावात गेल्यानंतर तेथील लोकांना विश्वास वाटला पाहिजे. आम्ही

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे...

शेतकरी वर्गाच्या पाठीमागे आहोत, कोणीही आत्महत्या करु नये असा विश्वास मुख्यमंत्री महोदयांनी द्यायचा असतो आणि त्यांनी ते काम पिंपरी-बुटी गावात जाऊन केले. माननीय मुख्यमंत्री त्या ठिकाणी मुक्काम केला. त्यांनी एका शेतकऱ्याच्या घरी जेवण केले. परंतु माननीय मुख्यमंत्री ज्या शेतकऱ्यांच्या घरी गेले त्यांना ते विश्वास देऊ शकले काय ? माननीय मुख्यमंत्री भेट देऊन गेल्यानंतर त्या ठिकाणी प्रशासनातील एकही अधिकारी तेथे तीन महिने ो फिरकला नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी भेटीच्या वेळी अधिकाऱ्यांना ज्या काही सूचना दिल्या होत्या त्याचेही पालन तीन महिन्यात झालेले नाही. श्रीमती शांताबाई काजणे या महिलेवर आत्महत्या करण्याचा प्रसंग आला. माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांना मदत करण्यात येईल असे सांगितले. पण तीन महिने त्या महिलेला कोणतीही मदत मिळाली नाही. मी स्वत: तेथे गेलो होतो. मी तेथे भेट दिल्याचे हे अधिकाऱ्यांना कळले, त्याच्या दुसऱ्या दिवशी दुसऱ्या दिवशी सर्व अधिकारी आले आणि त्या महिलेला एक लाख रुपये दिले व सांगू लागले की, आम्ही तुमच्या पाठीमागे आहोत. परंतु माननीय मुख्यमंत्र्यांनी भेट दिल्यानंतर तीन महिने तेथे कोणीही गेले नाही. त्या ठिकाणी अधिकारी का गेले नाहीत याची चौकशी करावी. शासनाचा अधिकाऱ्यांवर दबाव नसेल तर...

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, या ठिकाणी काही सन्माननीय सदस्यांनी मुद्दे उपस्थित केले त्याची मला थोडक्यात उत्तरे दिली पाहिजेत. सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी सांगितले की,

सभापती : माझी माननीय मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे की, सन्माननीय सदस्यांचे राईट ऑफ रिप्लायवरील भाषण पूर्ण होऊ द्यावे. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी शेवटचा मुद्दा मांडावा.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, या सरकारने राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी अवांतर भाषण करुन सदनाची दिशाभूल केली. अशा नाकर्त्या शासनाचा आम्ही निषेध करतो.

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे....

जोपर्यंत शासन शेतकऱ्यांची कर्जमाफी करणार नाही तोपर्यंत आम्ही विधान भवनात आणि विधानसभेच्या बाहेर सुध्दा आंदोलन पुकारु शासनाला कर्जमाफी करण्यास आम्ही भाग पाडू. माननीय मुख्यमंत्री दोन तासाच्या उत्तराच्या भाषणात काही बोलले नाही. जर आता ते शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची घोषणा करणार असतील तरच त्यांनी बोलावे. अन्यथा, त्यांना बोलण्याचा अधिकार नाही.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, आता मी यांची पोल उघडतो. महोदय, पिंपरी बुटीमध्ये हे राजकारण करण्यासाठी गेले होते. त्या गावातील लोकांनी प्रेस कॉन्फरन्स घेऊन सांगितले की, आमच्या गावात तुम्ही येऊ नका आणि या ठिकाणी राजकारण करु नका. त्याच पिंपरी बुटी गावातील संजय बोंडे या शेतकऱ्याने दिनांक 6 मार्च, 2012 रोजी आत्महत्या केली. त्या शेतकऱ्याला मदतीचा चेक मी गेल्यानंतर मिळाला. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे, तुमच्या सरकारच्या काळात त्या शेतकऱ्याला मदतीचा चेक मिळाला नाही. शेतकऱ्याला 50 हजार रुपयांकरिता आत्महत्या का करावी लागते ? कारण त्याला तुम्ही पाणी देत नाही, वीज देत नाही. 25-25 वर्षे एक सूत गिरणी तुम्ही तयार करीत नाही, त्यामुळे शेतकऱ्यांना आत्महत्या करावी लागते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी मराठवाड्याच्या पाण्याचा प्रश्न मांडला. मी त्यांना सांगू इच्छितो की, माननीय राज्यपालांनी 18 टीएमसी पाण्याच्या बाबतीत नुकतीच परवानगी दिली आहे. माननीय राज्यपालांनी 500 हेक्टरपर्यंत परवानगी दिलेली आहे. परंतु यामध्ये त्यांनी दोन अटी टाकल्या आहेत. पहिली अट अशी की, एखादा प्रकल्प हाती घेतल्यानंतर ते काम पहिल्या तीन वर्षात पूर्ण केले पाहिजे. तसेच दुसरे म्हणजे कामांना अतिरिक्त निधी दिला पाहिजे. ऑन गोईंग कामांव्यतिरिक्त त्या कामांना निधी दिला पाहिजे. राज्य सरकारचा या दृष्टीने कार्यवाही करण्याचा पूर्ण मानस आहे. राज्य सरकारने माननीय राज्यपालांनी दिलेल्या सूचनेनुसार काम केले आहे.

तसेच विरोधी पक्षाच्या सदस्यांना कर्जमाफी कशासाठी पाहिजे हे आम्हाला माहीत आहे. सन्माननीय सदस्य श्री.माणिकरावजी ठाकरे, आपण बँकांच्या बँका खाऊन टाकल्या आणि आता

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

कर्जमाफी मागत आहात. शेतकऱ्यांबद्दल यांचे प्रेम बेगडी आहे. विरोधी पक्षाच्या 15 वर्षाच्या कामकाजामुळेच शेतकऱ्यांवर ही परिस्थिती आली आहे. त्यामुळे यांना शेतकऱ्यांच्या बाबतीत बोलण्याचा अधिकार नाही.

सभापती : सभागृहाने दोन्ही प्रस्तावांवर विचार केला आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 4.03 ते 4.18 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. दीपकराव साळुंखे)

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन मोठ्याने घोषणा देत असतात.)

(गोंधळ)

तालिका सभापती : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. बुधवार, दिनांक 22 जुलै, 2015 रोजी सभागृहाची विशेष बैठक सकाळी 10.00 ते 11.30 या वेळेत घेण्यात येईल. या बैठकीत लक्षवेधी सूचना घेण्यात येतील. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 04 वाजून 18 मिनिटांनी बुधवार, दिनांक 22 जुलै, 2015 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION